

# कळंबचा सोपान संभू साळवे


माणूस

४ ऑगस्ट ७३ / ५० पैसे

श्री. ग. माजगावकर

४ ऑगस्ट १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : दहावा

## सप्रेम नमस्कार....

२६ जुलै, ७३

◻ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक श्रीगुरुजी यांच्या निधनानंतर संघाच्या संपूर्ण विचारप्रणालीविषयी देशभर एक वैचारिक मंथन होत आहे. माणूसमध्येही श्री. ग. मा. यांच्या 'श्रीगुरुजी' या लेखापासून एका तात्त्विक वादविवादास प्रारंभ झाला आहे. ज्याचा प्रतिपक्ष साम्यवादी विचारसरणीचे एक अभ्यासक श्री. सुधीर बेडेकर करीत आहेत. रा. स्व. संघ हा एक 'विचार' आहे व अशा तऱ्हेच्या वैचारिक लढ्यातूनच त्याचे वैशिष्टय उठून दिसणार आहे.

रा. स्व. संघाच्या सध्याच्या स्वरूपाविषयी श्री. बेडेकर यांची जी काही कल्पना आहे त्यावरून त्यांना संघ या देशात क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणू शकणार नाही असे वाटते. मला वाटते, याचे उत्तर काळच देईल! पण एक गोष्ट मात्र निश्चित आवर्जून सांगावीशी वाटते की, संघाची जडणघडण अशी आहे, की ज्यावेळी संघाला आपले अस्तित्व हे राष्ट्राच्या भविष्याला वा समाजाच्या प्रगतीला धोकादायक ठरत आहे असे वाटेल त्यावेळी संघ स्वहस्ते स्वतःला विसर्जित करावयास मागेपुढे पहाणार नाही. कै. गुरुजी यांनी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नजीकच्याच काळात अशा तऱ्हेचा धाडसी निर्णय घेऊन ब्रिटिशांसारख्या कुटिल राजनीतिज्ञांचे अंदाज धुळीला मिळविण्याचा विक्रम केल्याचा इतिहास सुप्रसिद्धच आहे.

मला वाटते, ध्येयप्राप्तीसाठी स्वतःच्या अस्तित्वाच्याच त्यागाला तयार असणाऱ्या संघाच्या प्रामाणिक पण निश्चयी भावनेमुळेच श्री. ग. मां. सारख्या त्रयस्थ विचारवंतालाही संघाकडून काही अपेक्षा करावीशी वाटते. श्री. सुधीर बेडेकर यांनी त्यांच्या साम्यवादी विचारसरणीची एखादी तरी व्यक्ती वा संघटना या आधुनिक दधिची ऋषीच्या तुलनेत असल्यास सांगावे.

**सुहास बाक्रे**, ठाणे

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

## श्री. स. गो. नखाते यांचा खुलासा

श्री. संपादक माणूस यांसी,

सप्रेम सा. न.

महोदय

आपल्या दिनांक २ जून १९७३ चे माणूस साप्ताहिकात ' १५ वर्षातील कर्तृत्व ' या शीर्षकाखाली निळू दामले नामक लेखकाकडून दिनांक २०–५–७३ रोजी झालेल्या माझे मुलीचे लग्न सोहळ्याचा एकंदर वृत्तांत आणि तसेच माझ्या एकंदर स्थावर व जंगम मालमत्तेबद्दलचा मजकूर प्रकाशित करण्यात आला आहे. या संबंधी खरी वस्तुस्थिती आपले निदर्शनास आणून द्यावी. म्हणून मी खुलासा प्रकाशनार्थ आपणाकडे पाठविला आहे.

दिनांक २०–५–१९७३ ला परभणी मुक्कामी माझे मुलीचे लग्न झाले. ते सर्वसामान्य लोकांप्रमाणेच झाले. त्यात कसल्याही प्रकारचा भडकपणा थाटमाट किंवा झगझगाट मुळीच नव्हता.

महाराष्ट्रातील एकंदर विद्यमान दुष्काळी परिस्थिती लक्षात घेवूनच मी अत्यंत दक्षतापूर्वक साधेपणाने माझे मुलीचे लग्न समारंभाची आखणी केली होती व त्यानुसारच तो लग्नसोहळा उरकण्यात आला. ज्या मंडपात मुलीचे लग्न झाले ते तंबू मी जिल्हा परिषद किंवा दळणवळण खात्याकडून तसेच न आणता येथील नगर परिषद–ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी व पोलीसखाते यांचेकडून रितसर पैशाचा भरणा करून आणले होते. त्याच्या पावत्याही मजपाशी उपलब्ध आहेत. तसेच विजेसाठी येथील महाराष्ट्र राज्य विद्युतमंडळ खात्यात मी रितसर व पैशाचा भरणा करून परवाना काढला होता. व त्यानंतरच लग्नसमारंभासाठी विजेचे कनेक्शन सर्वसामान्य नागरिकाप्रमाणे नियमानुसार मला देण्यात आले होते. त्यासाठी मी कोणावरही दडपण आणले नाही किंवा कायद्याला बगल दिली नाही. कारण परभणी शहरात एप्रिल-मे व जून ७३ या महिन्यात अनेक नागरिक पुढारी व अधिकारी यांचे घरी लग्नकार्ये झाली व त्यांनाही विद्युत मंडळाकडून नियमानुसार वीज कनेक्शन देण्यात आली होती. त्या नियमानुसार मलाही देण्यात आली. तद्वतच मंडपात फक्त ८ ते १० ट्यूबलाईट बारा पंखे व दोन कूलर होते. ते पंखे व कूलर मी केवळ लग्नसमारंभासाठी तात्पुरते म्हणून माझे मित्र पुनमचंद हेमराज जैन यांचेकडून उसने आणले. फेडरेशनमधून एकही पंखा व कूलर आणण्यात आला नाही.

लग्नासाठी नवरदेवाबरोबर जे वऱ्हाड आले ते केवळ १२० लोकांचे होते व ते फक्त दोन एस. टी. बसेसमधून आले होते. वरातीमधे एकूण २–३ शे लोक होते.

लग्नासाठी फक्त साधा पन्नास किलो तांदूळ परभणीच्या बाजारातून खरेदी

पृष्ठ ६१ वर

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

भास्कर जोशी

१९४० साली डॉ. हेडगेवारांचे निधन झाले. त्यानंतर जवळ जवळ ३३ वर्षे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेतृत्व गोळवलकर गुरुजींच्याकडे आले. डॉ. हेडगेवारांच्या काळात संघ बाल्यावस्थेत होता, गोळवलकर गुरुजींनी संघाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढविला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हीच भारतातील सर्वात मोठी युवक संघटना आहे, हे शत्रूनाही कबूल करावे लागल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांना व कार्यकर्त्यांना गांधीवधाच्या वेळी त्रास झाला. कित्येकांचे संसार उध्वस्त झाले. पण या साऱ्या परिस्थितीचा संघावर म्हणावा तसा परिणाम झाला नाही. उलट आजही संघाच्या शाखा मोठ्या प्रमाणावर निघत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या अनेक युवक संघटना आज देशामध्ये कार्य करीत आहेत. महाराष्ट्रामध्ये राष्ट्र सेवादलाने चांगल्या प्रमाणात कार्य केलेले आहे. पण अलिकडे सेवादलाचे कार्य बऱ्याच प्रमाणात थंडावलेले आहे.

या देशातील तरुणांना योग्य दिशा दाखविणारी संघटना आज तरी या देशात दिसत नाही. या देशातला तरुणवर्ग दिशाहीन बनलेला आहे. पाश्चात्यांचे अनुकरण करण्यामध्ये गुंतलेला आहे. या देशाचे भवितव्य ज्या युवकांच्या हातात जाणार आहे त्यांची राजकीय, सामाजिक, वैचारिक बैठक कमकुवत आहे. आजच्या या नैराश्याचा विचार करताना राष्ट्रीय स्वयंसेवकसंघटनेकडे आशेने पहावेसे वाटते.

गोळवलकरांच्यानंतर सरसंघचालकपदाची वस्त्रे बाळासाहेब देवरस यांच्याकडे आलेली आहेत. म. गांधींच्या काँग्रेसमध्ये आणि आजच्या काँग्रेसमध्ये फार मोठे बदल झालेले आहेत. बदलत्या काळाची पावले संघाने ओळखली पाहिजेत. संघाच्या वैचारिक भूमिकेत बदल झाले पाहिजेत. या बाबतीत दिनांक १६ जूनच्या 'माणूस'च्या अंकातील श्री. ग. माजगावकरांचे विचार लक्षात घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर 'जातीय संघटना' अशा प्रकारचा आरोप कर-

ण्यात येतो. काही दिवसापूर्वी गोळवलकरांनी चातुर्वर्ण्याबाबत जे विचार व्यक्त केले त्यावरून हा आरोप बळकटपणे सिद्ध होतो. गोळवलकरगुरुजींच्या या भूमिकेमुळे बरेच कार्यकर्ते अडचणीत येणे साहजिक आहे. दि. ४ जुलैला श्री. गुरुजींच्या मासिक श्राद्धदिनाच्या दिवशी सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांनी संघाची भूमिका व कार्याची दिशा सांगितली. 'गोळवलकरांचे विचार हेच संघाचे विचार' अशा प्रकारची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

सरसंघचालकांनी आपली भूमिका विशद करताना भारतीय मुसलमानांबाबत सांगितले 'इस्लामच्या प्राचीन काळात त्याचे जे स्वरूप होते असे ते मानतात, ते तसेच कायम टिकविण्याची जबाबदारी साऱ्या जगात त्यांच्यावरच येऊन पडली आहे.' या त्यांच्या भूमिकेबाबत दुमत होण्याचे कारण नाही. पण हीच भूमिका हिंदुंच्याबाबत ते घेणार नाहीत. प्राचीन परंपरा, वैभव हे जतन करण्यात संघाला धन्यता वाटते. गोळवलकर गुरुजींनी ज्यावेळी चातुर्वर्ण्य भूमिकेचा पुरस्कार केला त्यावेळी सारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शांत होता. जगद्गुरु शंकराचार्य यांनीही चातुर्वर्ण्य भूमिकेवर शिक्कामोर्तब केले त्यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची याबाबत नेमकी भूमिका कोणती होती, याचा आजपर्यंत उलगडा होत नाही. मात्र 'दादूमिया' या लेखकांनी दै. 'लोकसत्ता'मध्ये गोळवलकरांची दलित विषयक भूमिका मांडण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला आहे. ज्यावेळी डॉ. आंबेडकर आणि श्री. गुरुजी हे दोघेही अस्तित्वात नाहीत त्यावेळी ही भूमिका मांडण्यात काय अर्थ ? दादूमियांनी हीच भूमिका गुरुजी असताना प्रसिद्ध करावयास हवी होती. पण हे घडले नाही.

'संघकार्यातून समाजाचे सर्व प्रश्न सोडवू' अशा प्रकारचा निर्धार नव्या सरसंघचालकांनी व्यक्त केला आहे. हे विधान पुन्हा एकदा त्यांनी तपासून पहावयास पाहिजे. संघ आजपर्यंत सामाजिक कार्यापासून अलिप्त राहिलेला आहे. महाराष्ट्रातल्या दुष्काळात संघाने काम केले तो अपवाद मानावा लागेल. समाजाचे प्रश्न सोडवावयाचे झाल्यास त्यांना राजकारणात पडावे लागेल. काँग्रेसच्या 'गरिबी हटाव' सारखी ही घोषणा आहे.

संघापासून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. संघाच्या भूमिकेमध्ये काळाची पावले ओळखून बदल झाले पाहिजेत. तरच संघ जिवंत राहू शकेल. अन्यथा बदलत्या काळात त्याला जगता येणार नाही. लोकशाही मार्गाचा अवलंब संघाने केला पाहिजे. नव्या सरसंघचालकांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धोरण पुन्हा एकदा विज्ञानाचे निकष लावून तपासले पाहिजे.

● ● ●

# कोंडा । कोंडा

प्रा. पां. शं. माईणकर

गव्हाचे उत्पन्न बंगालमधे मुळीच होत नाही. पण मध्यवर्ती सरकारतर्फे बंगालमधे पाठविल्या जाणाऱ्या गव्हापैकी फार मोठा भाग तेथे असलेल्या पिठाच्या गिरण्यांना सरकारतर्फे पुरविला जातो आणि या गिरण्यात निर्माण झालेला आटा, मैदा, रवा वगैरे पदार्थांचे वाटप ग्राहकांना केले जाते. गव्हाच्या पिठाचे उत्पादन होत असताना या गिरण्यांमध कोंडाही निर्माण होतो. सरकारी आकडयांप्रमाणे या गिरण्यांमधून दर महिन्यात चवतीसशे ते पसतीसशे टन गव्हाचा कोंडा उपलब्ध होत असतो.

या कोंडयाचा उपयोग जनावरांचे व कोंबडयांचे खाद्य म्हणून होतो. एकूण कोंडयापैकी अर्धा हिस्सा शासनातर्फे चालविल्या जाणाऱ्या डेअरीज आणि पोल्ट्री फार्मस् यांना पुरविला जातो तर उरलेला अर्धा हिस्सा शासनातर्फे विक्रीकरिता ठराविक किंमतीत व्यापाऱ्यांमधे वाटला जातो. कोंडयाची जी भानगड आता बंगालमधे उघडकीस आली आहे ती आहे या परमिट वाटपा संबंधीचीच.

हे परमिट वाटपाचे कार्य बंगालमधे काँग्रेस पक्ष अधिकारारूढ होईपर्यंत म्हणजेच गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यापर्यंत सरकारी अधिकाऱ्यांमार्फत होत असे. परंतु नोकरशाहीच्या हाती हे परमिट वाटपाचे कार्य राहू दिल्यास त्यामुळे काळ्या बाजाराला वाव मिळेल असे बहुसंख्य आमदारांचे मत पडल्यामुळे हे कार्य या अधिकाऱ्यांकडून काढून आमदारांच्या एका समितीकडे सोपविले गेले. या समितीने एकूण सत्तर नावे शासनास सुचविली व या सत्तर व्यक्तींना दर महिन्याला ठराविक प्रमाणात परमिटवर कोंडयाचे वाटप सुरू झाले. या सत्तर परमिटधारकात सतरा एकटया कलकत्त्याचे तर बारा नाडिया या जिल्ह्याचे रहिवासी होते. या सर्वांना परमिट देण्यापूर्वी त्यांची वास्तविक आवश्यकता व इतर गोष्टींची पूर्व पहाणी केली जावी अशी समितीला सूचना करण्यात आली होती. पण हे तपासणीचे कार्य कधीच झाले नाही.

या संपूर्ण प्रकरणात काळा पैसा फार मोठ्या प्रमाणात कार्य करीत असून बडया बडया व्यक्ती त्यात गुरफटलेल्या

आहेत व त्या सर्वांचे स्वतंत्र हितसंबंध निर्माण झाले आहेत अशा अर्थाच्या बातम्या बंगालमधील काही वृत्तपत्रात प्रथम थडकल्या. मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थशंकर रे यांनी मात्र इतर मुख्य मंत्र्यांप्रमाणे त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले नाही तर उलट या संपूर्ण प्रकरणी ताबडतोब आणि नि:पक्षपाती चौकशी करण्यात येऊन संबंधित गुन्हेगारांना योग्य ते शासन करण्यात यावे असा त्यांनी आदेश दिला. गुप्त पोलीसखात्याकडे हे प्रकरण सोपविल्यापासून आजतागायत याबद्दलच्या अनेक भानगडी बाहेर आल्या आहेत; आणि याहीपेक्षा काही आणखी नवीन चमत्कार बाहेर येऊ शकतील असा जाणकारांचा अंदाज आहे. पोलिसांकडे हे प्रकरण सोपविल्यापासूनच्या गेल्या एक दीड महिन्यात पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधीत अशा जवळ जवळ दोनशे फाईल्स तपासल्या आहेत. पन्नास पंचावन्न व्यक्तींच्या जबान्या घेतल्या आहेत आणि इतरही बरीचशी माहिती विविध ठिकाणाहून जमवली आहे.

ज्या त्रेचाळीस व्यक्तींना पोलिसांनी आतापर्यंत अटक केली आहे त्यात अन्नखात्याचे एक डायरेक्टर श्री. पी. के. सेनगुप्ता, मुख्यमंत्री श्री. रे यांचे जवळचे आप्त आणि सुप्रसिद्ध टेनीस खेळाडू जयदीप मुखर्जी यांचे वडील श्री. अदीप मुखर्जी यांचाही समावेश आहे. बंगालमधील एक धनाढ्य उद्योगपती श्री. प्रभुदयाळ गुप्ता यांचा या संपूर्ण प्रकरणात फार मोठा भाग असल्याचे उघडकीस आल्यामुळे त्यांच्यावरही पकड वॉरंट काढण्यात आले होते पण ते लगेच फरार झाल्यामुळे पोलीस आतापर्यंत तरी त्यांना अटक करू शकलेले नाहीत. मुख्यमंत्र्यांनी श्री. गुप्ता यांची मालमत्ता जप्त करण्याचा हुकूम पोलिसांना दिला आहे. या प्रकरणात अन्नमंत्री श्री. काशीकांत मैत्र यांचा हात असल्याच्या तक्रारी सर्व डाव्या विरोधी पक्षांनी आणि अनेक वृत्तपत्रांनीही केल्या आहेत. परंतु श्री. रे यांनी मात्र अशा प्रकारचा कोणताही पुरावा आपणासमोर अद्याप आलेला नाही असे नि:संदिग्धपणे स्पष्ट केले आहे. असे असले तरी अन्नमंत्र्यांचे खास गोपनीय सहाय्यक श्री. अरुण एस. गुप्ता यांच्यापर्यंत पोलीस जाऊन पोहोचले आहेत; एवढेच नव्हे तर श्री. एस. गुप्ता यांना या प्रकरणात त्वरित अटक करणे पोलिसांना आवश्यक वाटत होते पण असे म्हणतात, की मुख्यमंत्र्यांनी स्वत: यात लक्ष घालून ही अटक तात्पुरत्या कालावधीकरिता का होईना, पुढे ढकलली आहे.

वास्तविक ही भानगड काही आजच निर्माण झालेली नाही. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चाचणीत असे आढळून आले की सरकारी भावाने कमी किंमतीत कोंडा घेऊन नंतर भरमसाठ भावाने तो काळ्या बाजारात विकण्याची ही पद्धती गेल्या २४-२५ वर्षापासून तरी बंगालमध्ये सुरळीतपणे चालू आहे. तिचे धागेदोरे बंगालमधील प्रत्येक जिल्ह्यात पसरले आहेत, एवढेच

नव्हे तर ते ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश वगैरे दूरदूरच्या राज्यापर्यंतही पोहोचले आहेत. सुरुवातीच्या काळात कोंडयाचा भाव होता क्विंटलमागे फक्त दहा रुपये. काही दिवसांपूर्वी त्यात वाढ करून तो आता करण्यात आला आहे चव्वेचाळीस रुपये क्विंटल. पण काळ्या बाजारात मात्र त्याला भाव मिळतो नव्वद ते एकशे दहा रुपयापर्यंत. या हिशेबाने पाहता कोटयावधी रुपयांचा व्यवहार या भानगडीत गेल्या वीस पंचवीस वर्षांच्या काळात झाला असेल असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

ते काहीही असो. हे एवढे अगडबंब प्रकरण शेवटी आता तरी उघडकीस आले यातच आनंद मानायला हरकत नाही. मुख्यमंत्री श्री. सिद्धार्थ शंकर रे यांनी मात्र या संपूर्ण प्रकरणात सुरुवातीपासून स्वीकारलेले धोरण वाखाणण्यासारखेच नव्हे तर अनुकरणीयही आहे. बंगालमधील प्रत्येक जिल्ह्यातील कोणत्या ना कोणत्या मोठ्या धेंडाचाच यात हात होता असे नाही तर त्याचबरोबर अधिकारपक्षातील काही आमदार, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि काही लक्षाधीश हेही त्यात गुंतलेले आहेत. परंतु कोणत्याही प्रकारच्या दडपणाला बळी न पडता आतापर्यंत तरी श्री. रे या प्रकरणात ज्या रीतीने वागले त्यामुळे त्यांची वैयक्तिक प्रतिष्ठा उंचावली आहे. जुनी परमिट समिती त्यांनी त्वरित बरखास्त केली आणि त्या समितीने जाता जाता दिलेली ऐंशी परमिटसही रद्द केली. यापुढील काळात हे काम निःपक्षपातीपणे व्हावे यासाठी श्री. संतोष रे व जयनल अबेडीन या दोन मंत्र्यांचा समावेश असलेली आठ सदस्यांची एक नवीन समिती त्यांनी लगेच नेमली आणि जनतेच्या मनात विश्वास निर्माण व्हावा यासाठी विरोधी पक्षापैकी अजय मुखर्जी, विश्वनाथ मुखर्जी, ए. एम. ओ. धनी, एस. आर. दासगुप्ता वगैरे व्यक्तींचा त्यात समावेश केला.

लवकरच या प्रकरणातील पोलीस चौकशी पूर्ण होईल. आतापर्यंत ज्या वेगाने या प्रकरणातील चक्रे फिरली आहेत तोच वेग कायम ठेवण्यात आला तर येत्या तीन चार महिन्यांच्या अवकाशातच हे प्रकरण निकालात निघावयासही हरकत नाही.

आतापर्यंत झालेल्या चौकशीत यातून एक नवीनच प्रकरण उघडीला आले आहे व त्याचीही चौकशी सूरू झाली आहे. ते अशाच प्रकारचे असून त्यात गव्हाच्या कोंडयाऐवजी तुरीच्या डाळीचा संबंध आहे व त्यांत गुंतलेली रक्कमही दोन अडीच कोटींच्यावरच आहे.

या प्रकरणाची चौकशी पोलीस खात्याने फार वेगाने पूर्ण करीत आणली असली तरी त्या खात्यावरही या बाबतीत ठपका ठेवायला वाव आहे. कारण परमिट समितीतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रत्येक परमिटची एकेक प्रत पोलीस खात्याच्या एनफोर्समेंट ब्रँचकडे नेहमी पाठविण्यात येत असे. परमिटचा खरेंखोटेपणा पहाणे व परमिट ज्या

व्यक्तीच्या नावावर देण्यात आलेले आहे तीच व्यक्ती योग्य कामासाठीच माल घेंत आहे. किंवा नाही हे पहाणे व जर ते परमिट चिल्लर विक्रीकरिता देण्यात आले असेल तर वाजवी भावातच ती विक्री होत आहे किंवा नाही यावर लक्ष ठेवणे हे कार्य पोलीस खात्याकडून अपेक्षिलेले होते. आणि जर हे बरोबर झाले असते तर हे प्रकरणच निर्माण होऊ शकले नसते.

पोलीस खात्याने ज्या वेगाने केवळ एक दीड महिन्याच्या आतच त्या संपूर्ण प्रकरणातील चौकशी पूर्ण करीत आणली त्यावेगाबद्दल पोलीस खात्यास शाबासकी देत असतानाच म्हणूनच त्याच खात्याने आतापर्यंत या प्रकरणात केलेल्या हलगर्जीपणाबद्दल त्याची कान उघडणी होणेही जरूर आहे. ● ● ●

---

# चार अपघात !

## मुक्काम मुंबई

शनिवार दि. १४ जुलै १९७३. एक कामगार श्री. नामदेव पवार, कॉस्टिक सोडा टँकर भरताना रेलिंग तुटून खाली पडला. जवळ जवळ कपाळ-मोक्षच झाला. पाय तुटला. १०–१२ मैलावर हॉस्पिटलमध्ये नेताना तो मरण पावला. (ह्या कंपनीतल्या कामगारांचे, त्यांच्या नेत्यांचे म्हणणे मात्र असे की तो जागच्या जागीच ठार झाला.)

सोमवार दि. १६ जुलै १९७३. दुसरा एक. ह्याच कॉस्टिक सोडा विभागात वायरिंग चेक करण्याचे दुरुस्तीच काम करत होता. सुटचा वायरिंगमुळे त्याला जबरदस्त शॉक बसला. ४४० व्होल्ट्स् ! तो जवळ जवळ ४–५ तास बेशुद्ध होता. अजूनही हा कर्मचारी म. गांधी हॉस्पिटलमध्ये पडून आहे.

मंगळवार दि. १७ जुलै १९७३. ह्याच विभागात एक कंत्राटी मजूर, छपरावर डागडुजीचे काम करत होता. तिथून तो खाली कोसळला. जवळजवळ ३५–४० फूट जमिनीवर. रक्तबंबाळ झाला तो. आजही तो अत्यवस्थ अवस्थेत म. गांधी हॉस्पिटलमध्ये पडून आहे.

ह्याच मंगळवारी. कार्बाईड विभागात मशिनमध्ये एकाचा हात सापडला. चार बोटं कापली गेली. हाही कामगार वरील हॉस्पिटलमध्येच गंभीर अवस्थेत पडून आहे.

अंगावर शहारे आणणारे हे चार

अपघात एकाच कंपनीत ओळीने घडून आले. चेंबूर येथे अस्ताव्यस्त पसरलेल्या कॅलिको केमिकलसमध्ये कॉस्टिक सोडा विभागात व कार्बाईड विभागात हे अपघात घडले. पण तीन हजाराहून अधिक कामगार असणाऱ्या ह्या प्रचंड कारखान्यात, कुठल्याही वैद्यकीय सोयी उपलब्ध नाहीत, अद्यावत अपघात निरोधक सुविधा (Safety measwres) उपलब्ध नाहीत. ह्या गोष्टी ह्या अपघाताहूनही भयानक आहेत. ह्या कारखान्यातले कर्मचारी माझ्याशी ह्या प्रकाराबाबत बोलताना म्हणाले, '...अपघात झालेल्यांना इथे कुठल्याही प्रकारचे प्रथमोपचार तर मिळत नाही-तच पण, चेंबूरहून परळच्या म. गांधी हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी (तिथपर्यंत पोचायलाच अर्धापाऊण तास लागतो.) वाहनाची सोय देखील अर्धा अर्धा तास होत नाही...कित्येकदा तर अशी परिस्थिती असते की साधारण गंभीर जखमी कामगार हॉस्पिटलमध्ये पोचेपर्यंत कंपनीच्या ह्या दिरंगाईपायी अत्यवस्थ होऊन जातो....'

वास्तविक अशा प्रकारच्या मोठाल्या, आधुनिक कारखान्यातून पूर्णवेळ डॉक्टर्स उपलब्ध असतात. निदान कंपाऊंडर्स वगैरेद्वारे पूर्णवेळ वैद्यकीय सेवा तरी उपलब्ध असतात. पण इथे त्यातला कुठलाही प्रकार नाही. सुरक्षिततेसंबंधी ह्या कंपनीची मॅनेजमेंट पूर्णपणे उदासीन असते असे मला सांगण्यात आले. फॅक्टरी इन्स्पेक्टर्स व मेडिकल इन्स्पेक्टर्स अशा कंपन्यांबाबत काहीच कडक कारवाई करत नाहीत का? 'सीटू'च्या नेतृत्वाखाली नव्यानेच ह्या कंपनीत कामगार संघटना बलिष्ठ झाली आहे. कामगारांसाठी आवश्यक अशा ह्या मूलभूत सोयींसाठी जोरदार लढा उभारण्याचं ह्या संघटनेच्या नेत्यांनी माझ्याजवळ बोलून दाखवले.

मृत कामगाराच्या कुटुंबियांना ५०० रु. रोख मदत व त्याच्या पत्नीस दरमहा २५० रु. कंपनीने देऊ केल्याचेही मला समजले हे 'पेन्शन' कामगाराचा मुलगा सज्ञान होईपर्यंत चालू ठेवण्याचे कंपनीने मान्य केले आहे. अशाच सवलती, बरोबर वर्षापूर्वी ह्याच विभागात मृत झालेल्या आणखी एका कामगाराच्या पत्नीला देण्यात आल्याचेही मला सांगितले गेले. कंपनी ह्या सवलती देते ते वाईट नाही, पण मुळात कामगारांच्या जीवनाविषयी—त्यांच्या जीविताविषयी जी उदासीनता दाखवते ती मात्र भयानक आहे. ह्या उदासीनतेविरूद्ध आवाज उठला पाहिजे! कामगारांना किमान आवश्यक वैद्यकीय सुविधा आणि निरोधक उपाययोजना अस्तित्वात येतील ह्याचीही दखल फॅक्टरी इन्स्पेक्टर्सनी, कामगार आयोगांनी तात्काळ घ्यायला हवी!!

● ● ●

# कन्नड, वैजापूर आणि कळंब

मुक्काम कन्नड

दि. १६ जुलै.

स्थळ : कॉलेजचा हॉल.

हॉलच्या बाहेर न्यू हायस्कूलच्या मुलांचा बँड वाजतोय. काही पोरे हातात काठ्या घेऊन सज्ज आहेत. एस्. टी. स्टँडवर उतरल्यावर मी एका माणसाला विचारले,

' काय आहे हो इथे '

' कुंभमेळा आहे. '

नवशिक्या पोरांचा बँड जोरजोरात वाजायला लागला. आले. माणिकराव दादा पालोदकर आले. हे औरंगाबादचे खासदार. (काँग्रेसचे)

काठ्यांच्या कमानीमधून त्यांना आणण्यात आले. भराभरा स्टेजवर मंडळी स्थानापन्न झाली. आमदार होते, सभापती होते, इतर अनेक होते. कडक पांढऱ्या टोप्या.

मासा टिपायच्या तयारीत असलेल्या बगळ्यांसारखेच दिसत होते.

समोरच्याच रांगेत काही टारगट पोरे बसली होती. सर्वांच्या टाळ्या वाजवून झाल्यावर उगाचच टाळ्या वाजवू लागली. ' ए,. चूप ' म्हटल्यावर थांबली.

मेळावा सुरू झाला. हा शेतकऱ्यांचा मेळावा होता.

भाषणांना सुरुवात झाली.

एकेक आमदार उठून बोलायला लागले. सर्वांच्या टीकेचे लक्ष्य होते (काँग्रेसचेच) खासदार बाबुराव काळे.

: हे लोक लुच्चे आहेत. एवढा दुष्काळ पडला आहे पण ह्यांच्यापैकी कोणीही एकदाही दुष्काळी कामावर गेलेला नाही. (ही तक्रार सामान्य माणसांनी केली तेव्हा वसंतरावजी नाईकांना ते पटले नाही. आता काँग्रेसचे आमदार इतर काँग्रेसचे आमदार दुष्काळी कामावर जात नाहीत अशी तक्रार करत आहेत, तेव्हा विश्वास ठेवण्यावाचून गत्यंतरच नाही.)

दुसरे आमदार उठले : त्यांना काही तत्व नाही, निष्ठा नाही (' मायला हित तरी कोनला तत्व हाय '–फिससस्– माझ्या बाजूला बसलेला एकजण फिसकला).

—आणखी कोणी उठले : माझ्या निवडणुकीत ह्याने विरोधी प्रचार केला, मला पाडण्याचा प्रयत्न ह्याने केला. बँकेचे अधिकारी व नोकरवर्ग माझ्या विरूद्ध ह्याने वापरला. सरकारच्या यंत्रणेचा गैरवापर केला. (बाहेर जिल्हा परिषदेच्या ७-८ गाड्या उभ्या होत्या. ही मंडळी ह्याच गाड्या भरभरून इथे आली होती. ड्रायव्हर, पेट्रोल, गाडी; सर्व जिल्हा परिषदेचे होते)

आणखी एक टोपी उठली : त्या काळे–पवाराचा काय मेळावा होता ? कुठं कर्ज देतो, कुठे साकरेच्या कारखान्याला तुझा ऊस घेतो असे सांगून माणसे जमवली होती. (ह्या मेळाव्यात अनेक शेतकरी हातात तगाईचे अर्ज घेऊन आले होते. कोणाला बी-बियाणी हवी होती. कुणाला नोकरी हवी होती. अशा कागुद घेऊन आलेल्यांची संख्याच जास्त होती.)

प्रत्येक जण बोलत होता : 'आम्ही कोणा व्यक्तीचे मानत नाही. काँग्रेस पक्षाला मानतो. माणिकराव दादा आहेत म्हणूनच औरंगाबादचा विकास झाला. मी काँग्रेस पक्षाचा सेवक आहे. मला व्यक्तीशी देन घेन नाही. ना. झकेरिया व कल्याणराव पाटलांमुळेच मराठवाड्याचे कल्याण झाले. आम्हाला गटबाजी करायची न्हाई म्हणूनच बाबुराव काळे व पवारांना पक्षातून हाकलून द्या.' आणि मी वजा काँग्रेस पक्ष बरोबर शून्य असे सांगणारे नंतर माणिकरावदादा झिंदाबादच्या घोषणा देत होते.

नंतर तालुका काँग्रेसचे आसाराम भांडवलदार यांनी खा. बाबुराव काळे व आमदार बाळासाहेब पवारांना पक्षातून काढून टाकावे असा ठराव आणला. पक्षनिष्ठेवर त्यांनी जोरदार भाषण दिले. (हे आसारामजी पूर्वी काँग्रेसमध्ये होते. नंतर समाजवादी पक्षात व नंतर पुन्हा काँग्रेसमध्ये) टाळ्यांच्या कडकडाटात ठराव पास झाला.

समोरच्याच पहिल्या रांगेत एक माणूस चक्क झोपला होता. पेंगत होता आणि बाजूच्या माणसाच्या अंगावर आपटत होता, टाळ्यांचा कडकडाट झाल्यावर आणि माणिकरावदादांचा जयजयकार झाल्यावर जागा झाला. दचकून काय झाले ते पाहू लागला. बरेच लोक बोलले.

मग्गीरवार नामक एका पत्रकारांनी जोरदार भाषण केले. यशवंतराव चव्हाणांसारख्या माणसावर कोणी शितोडे उडवले तर ते आम्ही सहन करणार नाही, असे काही ते बोलले. हे महाराज काही वर्षापूर्वी जनसंघात होते. (त्यावेळी चव्हाणांना खच्चून शिव्या दिल्या असणार.) आता काँग्रेसमधे आहेत.

अशीच दे दनादन भाषणे झाली. काँग्रेसवाले कसे नालायक व भ्रष्ट आहेत ते सप्रमाण, पुराव्यासह कथन करण्यात आले. हे पुरावे ग्राह्य मानायलाच हवेत. कारण त्यावेळी ही मंडळी त्यांच्या बरोबर होतीच की !

काँग्रेसवाले भ्रष्ट आहेत असे कोणी म्हटले की ह्यांना राग येत असे. तेच स्वतःचा पक्ष कसा आहे हे सांगत होते,

ह्या ठिकाणी. आत्मनिरीक्षणाचा हा उन्मेष पाहून माझा गळा दाटून आला.

माझ्या बाजूला भूविकास बँकेचा एक अधिकार बसला होता. तो सांगत होता ह्यांच्या दोन गटात मारामारी लागल्यापासून आमच्या बँकेत बदल्या–बडतर्फीचे सत्र सुरू झाले आहे. एक गट दुसऱ्या गटाने लावलेल्या माणसांना हाकलून देतो आहे. श्रेष्ठता, योग्यता सर्व गोष्टी आता गौण ठरत आहेत. खरेखोटे गाय-वासरूच जाणे !

: असला चावटपना जनता चालू देणार नाही, त्या लोकानला शासन करल ह्याची आमाला खात्री आहे अशी समोर बसलेल्या जनतेला आवाहने होत होत शेवटी मेळावा संपला.

भराराररा गाड्या भरून सर्वजण नगरपरिषदेत गेले. टंचाई निवारण समितीने कलेक्टर सिन्हांना निरोप समारंभ केला होता. दुष्काळात कामगिरी केल्याबद्दल आणि ह्या टंचाईग्रस्त विभागात ह्यांच्यासाठी अगदी साधा समारंभ आयोजित केला होता. तो आटपून धडाधड पुन्हा आपापल्या गाड्यातून मंडळी गावाकडे रवाना.

ही सर्कस झकेरिया, पाटील, माणिकराव संगीतबारीची.

आता जरा संभावित भाषेत बोलू या. वरील बैठक माणिकराव गटाची होती. सध्या औरंगाबाद काँग्रेसमध्ये दोन गट आहेत. दुसरा गट म्हणजे खासदार बाबुराव काळे गट. ह्या गटाला ना. शंकरराव चव्हाणांचा आशिर्वाद आहे. शंकरराव पुन्हा मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पहात आहेत. तशीच स्वप्ने झकेरियांनाही पडत आहेत असे म्हणतात. गेल्यावेळी मुख्यमंत्रीपदाच्या वादाच्या वेळी शंकररावांना औरंगाबाद जिल्ह्याने दगा दिला. तेव्हापासूनच ह्या दोन गटांचे उघड वैमनस्य आहे. ही मारामारी अजून इतर जिल्ह्यात पसरलेली नाही. पण पसरण्याच्या बेतात आहे. सध्या दोन्ही गट आपापल्या बैठका घेत आहेत. जास्तीत जास्त आमदार, जि. प. सदस्य, साखर कारखाने, सोसायट्या, अशी शक्तीची केंद्रे जमवण्याचा प्रयत्न दोन्ही गट करत आहेत.

पैसा अर्थातच सरकारचा व जनतेचा वापरला जात आहे.

ही बैठक होण्यापूर्वी काही दिवस राजारामबापू पाटील कन्नडला येऊन गेले असे कन्नडातले लोक म्हणतात.
¤

आता बाळासाहेबांची संगीत वारी.
स्थळ : वैजापूर.
दि. २० जुलै.

स्वस्तिक थिएटरचा कानाकोपरा खच्चून भरला आहे. गावात कडक पोलीस बंदोबस्त आहे. (मंत्री येणार ! जाता जाता शंकररावांच्या दौऱ्याचा अधिकृत कार्यक्रम पाहिला. त्यात वैजापूरला शेतकरी मेळाव्याचे उदघाटन असा कार्यक्रम होता. हा शेतकरी मेळावा काँग्रेस पक्षाचा होता. मग ह्या खाजगी कार्यक्रमाला सरकारी गाड्या, इतमाम, पोलीस कशाला ? )

ना. शंकरराव चव्हाण आले. भराभर

इतर पुढारी मंडळी स्टेजवर आली. कोल्हापूरहून खास आलेले आमदार पाटील उजव्या हाताला. डावीकडे बाळासाहेब पवार, बाबूराव काळे व हिरूभाऊ जगताप. कन्नडला काळे पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्या दोघांच्या उपस्थितीत ना. शंकरराव चव्हाण ! बाळासाहेब पवार तर समारंभाचे अध्यक्षच ! !

औरंगाबादच्या काही विद्यार्थ्यांनी धुआँधार भाषणे केली. शंकरराव त्यांच्याकडे कौतुकाने पहात होते. (मागे एकदा शंकरराव म्हणाले होते, की विद्यार्थ्यांनी राजकारणात पडू नये ! ) सर्वांनी मराठवाड्याला मुख्यमंत्रीपद मिळालेच पाहिजे असे सातव्या पट्टीत सांगितले. सर्वांनी मराठवाडा मागासला आहे हे दाखवून महाराष्ट्र शासनावर कडाडून टीका केली.

एकजण म्हणाला : २ महिने वैजापूरच्या मजूरांना मजुरी मिळालेली नाही. वसंतराव नाईकांनी घोषणा केली होती की पैसा अपुरा पडणार नाही. काय अर्थ आहे त्यांच्या घोषणेला ?

आणखी एकजण म्हणाला : औरंगाबाद कॉंग्रेस नात्यागोत्याची, भ्रष्ट माणसांची कॉंग्रेस आहे. (ऐका : झकेरिया – कल्याणराव – माणिकरावदादा ! ) त्यांच्यात एकही सच्चा कार्यकर्ता नाही.

सर्वजण एक गोष्ट मात्र आवर्जून सांगत होते की, 'आमचा गटबाजीवर विश्वास नाही !'

(एक गोष्ट राहिलीच. ना. शंकररावजी, पवार व काळे यांना प्रत्येकी सुमारे ३५ हार घालण्यात आले.)

शंकररावजी बोलले : कॉंग्रेसच्या व इंदिराजींच्या पुरोगामी धोरणात अडथळा आणू पहाणारे बरेचजण अजून कॉंग्रेसमध्ये आहेत. त्या प्रतिगाम्यांना कॉंग्रेसमधून हाकलून दिले पाहिजे. मला व्यक्तिगत बाबतीत गटबाजीत रस नाही. कारण तसले राजकारण अडचणीचे ठरते. (हे मात्र खरे आहे बुवा) पण प्रतिगाम्यांना हाकलून देण्यासाठी जर गटबाजी करावी लागली तर मी ती करायला तयार आहे. तेवढी क्षमता माझ्यात आहे.

त्यांच्या व टी. वाय. पाटील (पन्हाळा) यांच्या भाषणात राजारामबापू पाटलांचा आदरार्थी उल्लेख बऱ्याच वेळा आला. खुजगाव लढ्याचे कौतुक त्या दोघांच्याही बोलण्यात प्रकर्षाने जाणवले.

हे कोल्हापूरचे आमदार मुद्दाम ह्या 'शेतकरी मेळाव्यासाठी' आले होते.

आधीच्या वक्त्यांनी सरकारवर केलेल्या टीकेवर चव्हाणांनी चकार शब्द काढला नाही. मुख्यमंत्रीपदाच्या वादावर गप्पच बसले. औरंगाबाद कॉंग्रेसच्या निंदेबद्दलही काहीच बोलले नाहीत. (सूज्ञांना याचा अर्थ समजतोच.)

कन्नडला झालेल्या निर्णयांना उत्तर देण्यासाठी ही सभा नव्हती असे सर्वचजण सारखे सांगत होते. पण कोणी कर्त्याकरवित्या बोलवित्या धन्याने हा सर्व कार्यक्रम घडवून आणल्याचे जाणवत होते.

मधेच एक पाटील बोलायला उठले. त्यांना बोलू नका असे पवारांनी सांगितले. त्यांनी ते ऐकले नाही. ' मी काही वाकडे-तिकडे बोलणार नाही, शिवीगाळ करणार नाही असे वचन देतो. ' असे म्हटल्यावर त्यांना बोलायला परवानगी देण्यात आली. हे पाटील बोलायला मागू लागल्यावर वातावरण एकदम तंग आणि तणावपूर्ण झाले होते. हे कशाचे द्योतक होते ?

समाजवादाचा उल्लेख बऱ्याच वेळा करण्यात आला. स्वतःच्या कर्तृत्वाचा आणि इंदिरा गांधींच्या क्षमतेचाही उल्लेख झाला. तरीही ईश्वरी कृपेच्या गोष्टीही झाल्या. म्हणजे शेवटी ह्यांच्या हातात काहीच नव्हते तर. तो ' उपर वालाच ' सर्व घडवून आणणार होता. (मार्क्सने कितीवेळा आत्महत्या करावी ? )

खासदार बाबुरावजी काळे बोलले, पण त्यांना काय म्हणायचे ते शेवटपर्यंत कळलेच नाही. अशा प्रकारे अशा तऱ्हेने गरिबी हटवावी लागणार आहे. ह्यांचा हा विचार ह्या तऱ्हेने हाणून पाडला पाहिजे; विकासाचा समतोल विकास झाला पाहिजे अशाच पद्धतीने बोलत होते. अर्थ प्रत्येकाने आपल्या सोयी व कुवतीप्रमाणे लावायचा. एकच मुद्दा नीट समजला. तो म्हणजे आम्हाला मुख्यमंत्रीपद मिळाले पाहिजे....शंकररावांचे खंबीर नेतृत्व...कॉंग्रेस मधल्या प्रतिगाम्यांना हटवून इंदिरा गांधींचे पुरोगामी धोरण पुढे चालवले पाहिजे.

शेवटी बाळासाहेब पवार बोलले. हे तरी आता तोफ डागतील, आतापर्यंत नुसती ढोलकी वाजली, अशी लोकांची अपेक्षा. दोनच दिवसांपूर्वी ह्यांनी जाहीरपणे सांगितले होते, की त्यांना कोणीच पक्षातून काढू शकत नाही, ते कोणाच्या धमक्यांना भीक घालत नाहीत. पण




पवारजींनी फार घोर निराशा केली. 'आम्ही नीतिमत्ता पाळतो. आमच्यावरच्या आरोपांना आम्ही उत्तरे निश्चित देऊ. पण हे ठिकाण त्यासाठी नाही. अन्य ठिकाणी, अन्य वेळी देऊच. (आता आली का पंचाईत! अन्य ठिकाणे शोधत आता जनतेने फिरायचे म्हणजे किती त्रास!)

वरवर पहाता फुसकाच बार निघाला.

ह्या कार्यक्रमाला बरेच शेतकी खात्याचे अधिकारी उपस्थित होते. (शंकरराव कृषीखात्याचे मंत्री आहेत. तेव्हा हा समारंभ जरी काँग्रेसपक्षाचा असला तरी त्यांना हजर राहयलाच पाहिजे!) ह्या मेळाव्याच्या प्रारंभी त्यांचे स्वागत झाले होते आणि शेवटी 'जेवणाची वेळ टळून गेल्यावरही, त्रास घेऊन ह्या मेळाव्याला हजर राहिल्याबद्दल आम्ही शेतकी अधिकाऱ्यांचे आभारी आहोत,' अशा शब्दात त्यांचे आभार मानण्यात आले.

मेळावा युवक काँग्रेस—काँग्रेस पक्षाचा होता.

□

आता धमाल चालू आहे. पालकमंत्री झकेरीयांना हटवा अशी काळे-पवारांची मागणी आहे. बाहेरचे पालक मंत्री नकोत, मग शंकरराव चव्हाण परभणीचे पालकमंत्री कसे काय चालतात असा सवाल ना. कल्याणराव पाटील विचारत आहेत. त्यांच्यामते मुख्यमंत्रीपदाचा वाद गाडला गेला आहे. त्यांचे एकमत पाहा. 'आमच्या अंतर्गत भांडणामुळे विकासावर परिणाम झालेला नाही.'

गावोगाव बैठका होत आहेत. पुन्हा २ तारखेला जालन्याला मेळावा आहे. दि. २३ जुलैला 'आम्हाला सत्तेत असलेले त्रास देत आहेत. त्या त्रासातून आम्हाला वाचवा' अशा तारा बाबुराव काळचांच्या घरी झालेल्या बैठकीनंतर इंदिरा गांधींना करण्यात आल्या. पवार-काळे गेलेत इंदिरा गांधींच्या पायाशी. पालोदकरांनी म. प्र. काँग्रेसचे पाय धरलेत.

ह्या दोन गटांचा मराठवाड्याच्या इतर जिल्ह्यात काय प्रभाव पडतो; आणि महाराष्ट्रातील सध्या दंड थोपटून असलेल्या बाळासाहेब देसाई—शंकरराव मोहिते पाटील —राजाराम बापू गटाशी संधान कसे जुळते ह्यावरच बरेच काही अवलंबून आहे. तशा हालचालीही चालू आहेत,

—निळू दामले

# मुकाम कळंब

मृग नक्षत्र म्हशीवर बसून आले. पावसाने तोंड दाखविले. आर्द्रेनें घराबाहेर पडू दिले नाही. सर्वत्र झक्कास मोसमी पाऊस झाला. शेतकरी सुखावला. खरीपाच्या पेरणीचा विचार करू लागला. मुख्यमंत्र्यांनी वाटलेल्या पेढयाच्या गोडव्याचा वास त्याला आला.

पार्श्वभूमी बदलली असे वाटत असले तरी धोका संपला नव्हता. दुष्काळ

सरला नव्हता. वेगळीच काळजी लागली होती. पाऊस पडला. पेरावयाचे काय व कसे ?

सरकारच्या संपूर्ण मदतीची व तगाईची जाहिरात ऐकली. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्याच्या हसेगाव (केज) चा सोपान संभू साळवे बैल-तगाईसाठी तहसीलमध्ये गेला. अर्ज दिला. कागदपत्र पूर्ण केले. पंचायत समितीमध्ये गेला. बी-बियाण्यांसाठी अर्ज, कागदपत्र पूर्ण केले. अल्पधारक व हरिजनांना प्रथम तगाई ! ऐकून आनंदला. घरी गेला. बायकोला सांगितले. बैलतगाई घ्यावयाची, बैल आणावयाचे. पंचायत समितीकडून बी आणावयाचे, पेरणी उरकायची. बस्सं. मनामध्ये मायबाप सरकारला धन्यवाद दिले.

चार दिवस गेले. अर्जाची छाननी झाली. सोपानचा बैलतगाईचा अर्जच सापडेना. आठ दिवस गेले. गिरदावर अधिकाऱ्यांच्या तैनातीत. गाठ पडेना. सोपान हसेगावच्या तळ्यावर कामाला होता. आपल्या जागी पोरास कामास लावून रोज हसेगाव–कळंब, तहसील–पंचायत समिती, बैल-तगाई–बी तगाई, रोज चकरा मारल्या. प्रवास संपेना. १५ दिवस गेले. सांगावांगी संपली. शेवटी एक पुढाऱ्याचा चमचा, दलाल (आमच्याकडे अशांना पैरवकार म्हणतात) भेटला. सांगू लागला–गिरदावरला पानसुपारी दे. पेशकारला भेट दे. बैल-तगाई मिळेल.

आधीच तळ्याचे काम सोडून आलेल्या सोपानच्या जागी काम करणाऱ्या पोराची हजेरी बी. एण्ड सी.च्या मुकादम, टी. एम. ने लावली नाही. कारण सोपानने स्वत:च कामास आले पाहिजे असे ओव्हरसियरने त्यांना सांगितल्याचे त्यांनी सांगितले. सोपान त्यांच्याकडे गेला. ओव्हरसियर तेलगू (किंवा दाक्षिणात्य) ह्याचे त्याला, त्याचे ह्याला कळेना. काम करून पगार नाही. वरचा अधिकारी सांगतो, मेजरमेंटप्रमाणे पैसा वाटप झाला. कोणाला ? रोजच्या चरितार्थासाठीही सोपानजवळ पैसा नव्हता. मग पानसुपारी व भेट ? सोपान वैतागला.


व्यवस्थित पाऊस झाला. थोरामोठ्यांच्या पेरण्या चालू लागल्या. सोपानच्या जिवाची घालमेल होऊ लागली. कसेबसे पंचायत समितीकडून ३ किलो पिवळी व उडीद, मूग एकदाचे मिळाले.. एवढे मोठ्ठे बियाणे तर मिळाले. दुष्काळाच्या कराल दाढेतून एक बैल तेवढा वाचलेला. पेरावे कसे ? डोके चालेना. स्वस्थ बसवेना. सोपानला आयडिया सुचली. दुसरे दिवशी बी घेतले. शेतावर गेला. टिपन तयार केली. P. U. C. पास झालेला पोरगा व नववीत शिकत असलेला पोरगा–दोघे जुंपली एकीकडे ! एकीकडे बैल ! ! टिपन चालू केली ! ! ! बायको भाकरी घेऊन आली. दोघांची दृष्टादृष्ट झाली. आसवांची वृष्टी सुरू झाली. पोटच्या लेकराला टिपनीला जुंपायची पाळी आली. बायको ओक्साबोक्सीं रडू लागली. मायबाप सरकारला व त्याच्या

शासन यंत्रणेला लाखोली वाहू लागली.

बैलाने बाजूला मान करून आपल्या जोडीदाराकडे पाहिले. मुक्या जिवाने दोन आसवे गाळली.

दुष्काळ संपला, पाऊस पडला म्हणून मुख्य मंत्र्यांनी पेढे वाटले आणि—आणि पाऊस पडला व पोटच्या गोळ्याला जुंपावयाची पाळी आली म्हणून सोपान साळवे व कुटुंबाने हुंदके देऊन आसवे गाळली.

—राजेश काटे



# सो ल क ढी

## टांग्याचा घोडा आणि शर्यतीचा घोडा

मला चिकित्सक रसिक म्हणून मिरवायला फार आवडते. पण त्यासाठी फारच काही करावे लागते हे अलीकडे माझ्या लक्षात येऊ लागले आहे. एका क्षेत्रातील रसिकता शाबित करण्यासाठी कितीतरी विविध क्षेत्रातील व्यासंगांची गरज असते. आम्ही नुसते साहित्य वाचू असे तुम्ही म्हणालात की संपलात; चिकित्सक रसिक म्हणून तुमचे नाव मागास वर्गात दाखल झालेच म्हणून समजा. आदर्श चिकित्सक रसिक कसा अष्टपैलू पाहिजे : त्याने मैफिली जागविल्या पाहिजेत; नृत्ये-नाटके-चित्रपट पाहिले पाहिजेत; उडप्याकडच्या इडली-डोशावर आणि चिन्याकडच्या स्प्रिंग रोल्सचॉप सूईवर त्याला बोलता यायला पाहिजे; क्रिकेट कसोटी सामन्याला त्याने हजेरी लावली पाहिजे. आता माझ्यासारख्या फुद्रुक माणसाला हे सारे कसे जमावे? पण हे झाले इतरांचे मत; मला स्वतःला हा प्रश्न कधीच पडलेला नाही; मी आदर्श रसिक होण्यासाठी केव्हाच पाऊल उचलले आहे.

उचललेले पाऊल मी एका खास निवडक चित्रपट दाखवणाऱ्या खासगी मंडळाच्या दारात ठेवले आणि त्या मंडळाचा सभासद झालो. मंडळाचा सभासद झाल्याबरोबर चित्रपटातले सारे मला आपोआप कळू लागले. सभासद होण्यापूर्वी मी सत्यजित रायचे पुष्कळ चित्रपट पाहिले होते; आणि तो भारतातील सर्वश्रेष्ठ दिग्दर्शक आहे, असे मी गुपचुप ठरवून टाकले होते. गेल्या एकदोन वर्षात मृणाल सेन या बंगाली-हिंदी दिग्दर्शकाचे नाव पुन्हा पुन्हा माझ्या कानावर पडायचे. सत्यजित रायपेक्षा तो कितीतरी श्रेष्ठ आहे, असेही काही रसिकलाल दर्दी आवाजात मला सांगत असत. त्यामुळे या खासगी मंडळाने गेल्या महिन्यात मृणाल सेनच्या पाच चित्रपटांची मालिका सादर केली ती मी अधाशीपणे पाहिली.

बैसे श्रावण, भुवन शोम, इंटरव्ह्यू, एक अधुरी कहाणी आणि कलकत्ता : १९७१. हे ते पाच चित्रपट. या चित्रपटातील अतिरेकी प्रतीके, समाजस्पर्शी कथानके, कला आणि वैचारिक निष्ठांचा अनोखा समन्वय, इत्यादींचे प्राध्यापकी विश्लेषण करून वाचकहो, मी तुम्हाला साला वैताग आणत नाही. (त्यासाठी 'महाराष्ट्र टाईम्स' आहेच.) मी, तुम्हाला समजेल अशा भाषेत, एवढेच सांगतो की, 'भुवन शोम'चा हृदयंगम अपवाद सोडता, बाकीचे चार चित्रपट

पाहताना कं कं कंटाळा आला. एखाद्या उग्रमंत्र्याने हरितक्रांतीचे लावावे तसे येथे दलितक्रांतीचे गुन्हाळ लावले होते. चित्रपट ही एक एकसंध कलाकृती असते ही गोष्ट पाचापैकी चार वेळा ज्याला कळत नाही त्याने सत्यजित रायशी स्पर्धा करणे म्हणजे टांग्याच्या घोड्याने शर्यतीतल्या घोड्याबरोबर पळण्यासारखे आहे.

वरील उपमा आम्ही हेतुपुरस्सर दिली आहे हे प्रिय वाचकांच्या लक्षात आलेच असेल. अहो, टांग्याचा घोडा आणि शर्यतीचा घोडा ही दोन वर्गांची प्रतीके आहेत. मृणाल सेन आहेत पुरोगामी आणि सत्यजित राय आहेत बूर्झ्वा! केवळ या कलाबाह्य कारणासाठी मृणाल सेननी सत्यजित रायपेक्षा श्रेष्ठ कलावंत ठरवण्याचा खटाटोप मंडळी मांडतात तेव्हा अंमळ गंमत वाटते. असो.

चिकित्सक रसिक होण्यासाठी पाऊल उचलले आहे खरे. पण चिकित्सक रसिक होणे सोपे नाही हे आम्ही जाणतो. त्यापेक्षाही अवघड आहे ते चिकित्सक रसिक म्हणून मिरवणे. एकवेळ आम्हाला खरोखरीचे चिकित्सक रसिक होता आले नाही तरी चालेल; पण चिकित्सक रसिक म्हणून मिरवता मात्र यायला हवे. त्यासाठी, प्रसंगी, चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगले म्हणण्याचा प्रामाणिकपणा दाखवावा लागला तरी त्याला माझी तयारी आहे.

□

## लोक मानतात तेच खरे ?

खासदार पिलु मोदी हे वस्तुतः स्थूल आणि गंभीर प्रकृतीचे गृहस्थ आहेत. परंतु ते स्थूल असल्यामुळे गंभीर असणे अशक्य आहे, अशा समजुतीने लोक त्यांच्याकडे पाहात असतात. त्यामुळे त्यांची मोठी पंचाईत होते. काही वर्षांपूर्वी, काँग्रेसची तारांबळ झाली असता, संघटना काँग्रेस–जनसंघ–स्वतंत्र पक्ष इत्यादी गोपाळकाला करून तो लोकांना खायला घालण्याचा गंभीर प्रयत्न केला; पण लोकांना तो पोरखेळच वाटला. मध्यंतरी, एक दिवस पिलु मोदी, 'मी कम्युनिस्ट नाही' असे सांगणारा बिल्ला गळ्यात अडकवून लोकसभेत आले होते. (त्यावरून काही दिवस आम्ही त्यांना 'बिल्लु मोदी' म्हणत होतो.); लोकांना मात्र तो एक वात्रटपणाचा प्रकार वाटला. पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झुल्फिकारअली भुत्तो हे पिलु मोदींचे शालुसोबती. दोघांना एकमेकांबद्दल फार आदर आणि जिव्हाळा. त्यामुळे पिलु मोदींनी भुत्तोंच्या भलाईची भलती भेलामण (कसा आहे अनुप्रास ?) केली यात चुकले कोठे ? पण लोकांना मात्र तो दिवाळखोर विनोद वाटला. इतके कशाला, पिलु मोदींजवळ वास्तुशास्त्राची पदवी आहे आणि जवळजवळ पन्नास-साठ देखण्या इमारतींची संकल्पना त्यांची आहे, ही वस्तुस्थिती (किंवा वास्तुस्थिती) आहे; पण लोकांना मात्र ही बंडलबाजी वाटते. हे असेच आहे. खरोखर खरे कसेही असो; लोक मान-

तात तेच खरे, असा लोकशाहीचा खाक्या आहे.

परवा पुन्हा पिलु मोदींबाबत तसेच घडले. लोकसभेत भाषण करताना सत्ताधारी काँग्रेसपक्षाला उद्देशून ते म्हणाले : तुम्हाला राज्य करणे जमत नसेल तर माझ्या हाती सोपवा राज्य-कारभार. खासदारांना हा विनोदच वाटला. ते हसले. वास्तविक यात हसण्यासारखे काय होते ? पिलु मोदींनी ही सूचना अत्यंत जबाबदारीने आणि गांभीर्याने केली असली पाहिजे, असा मला विश्वास वाटतो.

कारण मी स्वत: अशा प्रकारच्या सूचना कळकळीने आणि प्रामाणिकपणे करत असतो. शिक्षणक्षेत्रातील बजबज़-पुरी थांबवण्यासाठी मला शिक्षणमंत्री करणे हा एकच उपाय मला दिसतो; मला निवडसमितीचा अध्यक्ष केल्यास भारतीय क्रिकेटचा परमोत्कर्ष होईल असे मला खरोखरीच वाटते; मी मराठी रंगभूमीवर प्रवेश केला तर डॉ. श्रीराम लागूंनासुद्धा काही गोष्टी शिकण्याची संधी मिळेल असेच मी मानतो; मी शिवसेनाप्रमुख होतो तर मुंबईचा चेहरामोहराच काय पण स्वभावच पालटून टाकला असता अशी माझी मनोमन श्रद्धा आहे; फार काय, माझ्या हाती सारी सूत्रे सोपवल्यास पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेतील सुंदो-पसुंदी मी निपटून काढीन असे मला वाटते, यावरून माझ्या महत्त्वाकांक्षेची झेप तुमच्या लक्षात यायला हरकत नाही.

इतके सगळे मला वाटत असते ना, पण लोकांना वेगळेच वाटते. माझे माझ्याबद्दलचे मत आणि लोकांचे माझ्याबद्दलचे मत यात नेहमीच इतकी तफावत का पडते, लोक असा माझा 'पिलु मोदी' का करतात ? या प्रश्नाचे उत्तर मला अजून मिळालेले नाही. तोपर्यंत मी स्वत:चे खरे मानतो; लोक आपले खरे मानतात. (अडचण आहे ती इथेच.) ● ● ●

---

इंदिरा गांधी एका व्याख्यानात म्हणाल्या : या वर्षी ऑस्ट्रेलिया, आफ्रिका, नायजेरिया, आशिया आदी भागांनाही अवर्षणाचा तडाखा बसला आहे. पण भारतात या संकटाला एक उजळ बाजू आहे. राज्य सरकारांनी मोठ्या प्रमाणावर दुष्काळी कामे हाती घेतली असून एवढ्या प्रचंड प्रमाणावर दुष्काळी कामे जगात कुठेही हाती घेण्यात आलेली नाहीत.

भारताच्या या क्षेत्रातील अग्र-स्थानाला आणखी काही वर्षे तरी धोका उद्भवणार नाही, असा आमचा हिशेब आहे.

---

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित

### खा मासळी नि करा चंगळ !

बंगाली लोकांसाठी ही खास बातमी. बंधूंनो ! तुमच्यासाठी हवा तेवढा मासळीचा पुरवठा आहे. खाते रहो ! खरंच, हा मासळीचा पुरवठा होतो कुठून ? कसा ? तुम्हाला कल्पनाच नसेल पण ही मासळी—उत्कृष्ट, चवदार अशी, राजस्थानमधून खास तुमच्यासाठी येते. तिथे उत्पन्न होणारी ८० टक्के मासळी सरळ बंगालकडे रवाना होते. त्यांना पैसे मिळतात अन् तुम्हाला चांगल्या चवीची मासळी !

प्रश्नार्थक मुद्रा का हो ?... आलं लक्षात. तुमचा प्रश्न योग्यच आहे. पावसाचा थेंब पडत नाही. आणि बंगालकडे पाठवण्याइतकी मासळीची रेलचेल होते कशी, असंच ना ? कारण राजस्थान हा उंट आणि वाळवंट यांचा प्रदेश म्हणूनच अधिक डोळयासमोर येतो. पण त्याचं असं आहे—

राजस्थानमध्ये बरेच तलाव आहेत. पूर्वीच्या काळी हे सारे तलाव पिण्याच्या प्राण्यासाठी राखून ठेवीत, काही नैसर्गिक तलाव तर काही कृत्रिम. पुढे ह्या तलावात मासळी होऊ लागली. असं म्हणतात की अक्वेरियमप्रमाणे ह्या तलावांमध्येही मासा पोहताना स्पष्ट दिसू शकतो, इतके ते तलाव स्वच्छ पाण्याने तुडुंब भरलेले आहेत.

आता सामान्य माणसाला मासे पकडण्याची परवानगी नाही. सर्व कारभारभार सरकारच्या हातात आहे. फिशरीज् डिपार्टमेंट हेच वेगळे खाते उघडले आहे. उदयपूर येथे रिसर्च सेंटर असून तेथे तऱ्हतऱ्हेचे प्रयोग चालत असतात. ह्या खात्याने अलीकडे खूपच प्रगती दाखवली आहे. मासळीच्या बाबतीत भवितव्य उज्वल आहे. पुढे ह्याच राजस्थानचा मासा कित्येक पटींनी लोक वाढले तरी सर्वांना पुरून उरेल ह्यात शंका नको.

अलीकडे काही वर्षांपूर्वीच मासेमारीचा हा धंदा नियमितपणे सुरू झाला आहे. तेव्हा बंगालमध्ये मासळीचे जेवण जेवणाऱ्या सर्वांना ही खूषखबर आहे की तुम्हाला कधीही मासळीची उणीव म्हणून भासणार नाही. कारण ८० टक्के मासळी राजस्थानमधून येत राहणार ! ◻

### एक संभाषण छोटेसे

ऑफिसच्या व्हरांड्यात तो कविमाणूस उभा होता. मान उंचावून एका झाडाकडे टक लावून बघत होता. मित्राने दुरून पाहिलं. जवळ येऊन त्याची तंद्री

भंग केली. 'काय बघतो आहेस एवढं ?'

'छातीम गाछ.'

'हे ? समोरचं ?'

'होय. ह्याला छातीम वृक्ष म्हणतात. ह्याचं पान पपईच्या झाडासारखं दिसत असलं तरी ते पपईचं नाहीये. शांतिनिकेतनमध्ये ह्याच पानावर तर सर्टिफिकेट देतात पदवीदान समारंभाचे वेळी.'

'अच्छा ? हे ते पान आहे होय ?' असं म्हणून मित्रसुद्धा विशेष लक्षपूर्वक पाहू लागला. नंतर मग शांतिनिकेतनवरून गप्पा तिघाल्या. कवी म्हणाला, 'खरं म्हणजे शांतिनिकेतन अगदीच काहीतरी निर्माण केलंय गुरुदेवांनी. काय एकेक पात्र असतात तिथून बाहेर पडणारी मुलं. नुसती पुळचट. जरा त्यांच्यात आवेश दिसत नाही की पराक्रम दिसत नाही. बायकी छाप नुसते. एकतर बायकांसारखे केस वाढवतात. (धोतरावर तर ते शोभत देखील नाहीत.)...बरं, आजकाल तशी फॅशनच आहे म्हणून तो मुद्दा सोडून दिला तरी प्रवृत्तीनेसुद्धा ते बायकीच दिसतात. त्यांच्या चेहऱ्यावर भावदेखील बायकी !'

मित्राला नवल वाटलं. अशा तऱ्हेची टीका त्याने पूर्वी कधी ऐकली नव्हती, तीही एका बंगाली तरुणाच्या तोंडून आणि गुरुदेव टागोरांवर ? ज्यांच्याविषयी झाडून साऱ्या बंगाली समाजाच्या मनात अपार श्रद्धा आहे त्या ?'... ही खरेच नवल करण्यासारखी गोष्ट होती.

मित्राचे आश्चर्य ओसरते न ओसरते तोच कविमित्र पुढे म्हणाला – 'अरे, काय सांगायचं ! इतके बायकी प्रवृत्तीचे असतात हे शांतिनिकेतनचे विद्यार्थी की रस्त्यात एखादी माय आडवी आली तर तिला लागलीच नमस्कार करून म्हणतील– 'मा गोरु, तुमी आगे जाव, आमी परे जाबो !' अन् हे सांगताना त्याने तसा अभिनय करून दाखवला. मित्र तर पोट धरधरून हसू लागला. नंतर म्हणाला –'कविमित्रा, आपल्या तरुण खांद्यावर तू म्हातारे डोके वागवीत नाहीस याबद्दल मला तुझं मनापासून कौतुक वाटतं. तू तरुण आहेस, तुझ्यात नवं रक्त आहे म्हणूनच तू गुरुदेवांवरही टीका करण्याचे धारिष्ठ्य दाखवलेस खरे !' ◘

## बंध पाळून उपयोग काय ?

२७ जुलै रोजी संपूर्ण राज्यात 'बंध' पाळायचा नि हरताळ करायचा असा एक प्रस्ताव कधीचाच मांडला गेला पण त्यावर एकमत आजतागायत झालेलं नाही. आवश्यक वस्तुंच्या किमतीत भरमसाठ वाढ झाल्यामुळे निषेधार्थ हा बंध पाळायचा असं कम्युनिस्ट पार्टीने ठरविलं. आपल्या ह्या प्रस्तावाला सर्व पार्टींनी पाठिंबा द्यावा असा ह्यांचा आग्रह होता. विशेतषः CPIM व इतर डावे पक्ष यांनी पाठिंबा दिलाही.

पण परवाच म्हणजे ता १९ ला मुख्यमंत्र्यांनी सांगितले की जरी यांनी

बंध घडवून आणायचं ठरवलं असलं तरी रेल्वे, ट्राम आणि बसेस नियमितपणे चालू राहतील आणि बाजारदेखील उघडा ठेवण्यात येईल.

मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांना सांगितले की नुसता 'बंध' पाळून समस्या कधीच सुटणार नाहीत. वस्तूंचे भाव भरमसाठ वाढले आहेत ह्याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे व ह्याबाबत आम्ही कारवाई करणार आहोत. (बंध जाहीर करेपर्यंत ह्यांना भाववाढीची जाणीव का बरे झाली नाही?) पण तरीही बंध पाळण्याचा डाव्या पक्षांचा आग्रहच असला तर कुठेही अनुचित प्रकार घडणार नाहीत एवढी दक्षता काँग्रेस पार्टी अवश्य येईल.

मुख्यमंत्री म्हणाले—आतापर्यंतच्या अनुभवावरून तरी हेच दिसतं की बंध पाळून केवळ समस्या सुटू शकत नाहीत आणि भाववाढीची समस्या ही आपल्या राज्यापुरतीच मर्यादित नसून ती अखील भारतीय समस्या आहे हे विसरता येत नाही. म्हणून काळा बाजार करणारे, अनाठायी साठा करणारे वगैरे लोकांना आम्ही पकडून योग्य ते शासन करीत आहोतच. परिणामतः लवकरच आवश्यक वस्तूंचे भाव आटोक्यात येतील असा विश्वास वाटतो. या बंधमुळे तुमच्या पार्टीचे CPI शी संबंध दुणावतील काय? असे विचारले असता श्री. रे म्हणाले—आम्हाला दुरावा नकोच आहे पण इतरांकडून तो निर्माण केला गेला तर त्याला आमचा इलाज नाही.

या 'बंध'च्या निमित्ताने सर्व डाव्या पक्षांची युती घडवून आणावी असाही एक अंतस्थ हेतु होता. परंतु RSP, SVC आणि Forward Block ह्या तीन डाव्या पक्षांनी 'बंध'ला पाठिंबा देण्याचे साफ नाकारले आहे. गेल्या दीड वर्षात एकही बंध किंवा हरताळ न होता सुरळीत कारभार चालला होता त्यात ह्या बंधमुळे अडथळा उत्पन्न होणार हे स्पष्टच दिसते आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व डाव्या पक्षांचेदेखील या मुद्यावर एकमत होऊ शकत नाही.

मुख्यमंत्र्यांचे विधान 'बंध पाळून का समस्या सुटणार आहेत?' हे पटण्यासारखे आहे. पण म्हणून काहीच हालचाल न करता चुपचाप बसावे व मुकाटयाने संकटाना तोंड द्यावे हेही बरोबर नव्हे. अशावेळी मला तर मृणाल गोरे ह्यांची आठवण येते. येथील बंगाली स्त्रिया अगदीच हालचाल करीत नाहीत. मृणाल गोरेसारखी तडफदार स्त्री एकही आढळत नाही, जी गृहिणींचे मोर्चे काढू शकेल व अन्यायाला वाचा फोडील. इतके जिवंत स्त्री-नेतृत्व बंगालमध्ये का आढळू नये हे एक कोडेच आहे!



पहाट नुकतीच उमलत होती. अंधाराचा प्रभाव अजून कायम होता. त्यामुळे दिवसा आकाशी रंगाचा दिसणारा समुद्र यावेळी हिरवट भासत होता. अशा वेळी एक जहाज लंडनजवळील एका किनाऱ्याला लागलं आहे व त्यातून बरीच माणसं उतरली आहेत. ह्यातल्याच एका माणसाच्या मागोमाग आपण जाणार आहोत. पण तो माणूस सहज ओळखू येण्यासारखा नाही व कोणाच्या नजरेत भरावं अशी त्याची धडपडही दिसत नाही. इतरांच्या व त्याच्या पोशाखात फारसा फरक दिसणार नाही. एक राखाडी रंगाचं जाकीट, पांढरटसर विजार व डोक्यावर चंदेरी रंगाची बांबूच्या कामट्यांची टोपी; बस्. मामला खतम्. पण त्याच्या चेहऱ्यावरील भाव मात्र सुटीवर निघालेल्या प्रवाशा-

सारखे नाहीत. ते आहेत कर्तव्यमग्न अधिकाऱ्याचे. हे भाव धारण करणारा त्याचा चेहरा काळसर असून त्याची शरीरयष्टी सडपातळ आहे. त्याच्या दाढीच्या विशिष्ट टोकदारपणामुळे तो स्पॅनिश असावा की काय, असा भास होतो. नकताच प्रवास संपल्यामळे की काय, तो जरा आळसावल्यासारखा सिगरेट ओढीत आहे. त्याच्याकडे यावेळी बघताना त्याच्या त्या जाकीटात एखादं भरलेलं पिस्तूल असेल किंवा त्याच्या विजारीच्या खिशात पोलीस कार्ड सापडेल अशी कल्पनाही कोणाला येणार नाही. किंवा त्याने आपली टोपी

श्रेष्ठ कामगिरी होती त्याच्याकडे.

कारण लंडनमधे फ्लँबो अवतीर्ण झाला होता. तीन देशांच्या पोलिसांनी त्याचा माग सतत धरून ठेवण्याचा प्रयत्न केला होता आणि अखेर ब्रूसेल्स-मार्गे हॉलंडपर्यंत ते पोहोचले होते. लंडनमध्ये ह्याच सुमारास युकॅरिस्टिक काँग्रेस भरणार होती आणि त्या गोंध-ळाचा फायदा घेण्याचा प्रयत्न फ्लँबो करणार हे कळायला फार मोठ्या बुद्धिची आवश्यकता नव्हती. तो कदा-चित एखाद्या पाद्र्याच्या वेषात वावरला असता. पण तशी खात्री कोणाचीच नव्हती. व्हॅलेंटिनचीसुद्धा. फ्लँबोबद्दल

# टवाळांशी पादरीबाबा!

मूळ लेखक : जी. के. चेस्टरटन अनुवाद : उल्हास देवधर

ज्या डोक्यावर ठेवली आहे ते जगातल्या एका अत्यंत बुद्धिमान माणसाचं डोकं आहे हे एखाद्याला सांगूनही खरं वाट-णार नाही. पण ते खरं आहे. कारण ती व्यक्ती म्हणजे दस्तुरखुद्द व्हॅलेंटिनच होय. पॅरिस पोलीसदलाचा प्रमुख व जगप्रसिद्ध गुप्तहेर व्हॅलेंटिन ह्याला ब्रूसेल्सहून लंडनला ह्यावेळी येण्यासाठी तसंच कारण आहे. या शतकातली सर्व-

खात्रीपूर्वक कुणीच, काहीच सांगू शकत नव्हतं.

ऐन भरात असताना प्रसिद्धी आणि भव्यता ह्या बाबतीत फ्लँबोच्या तुलनेत जर्मन सम्राट कैसरच काय तो टिकला असता. (विसाव्या शतकाच्या सुरुवा-तीचा तो काळ.) जवळजवळ दररोज वृत्तपत्रातून त्याचं नाव झळकायचं ते एका गुन्ह्यासाठी झालेल्या अटकेतून

दुसराच गुन्हा करून तो पसार व्हायचा ह्याबद्दल. एकदा तर त्याला दोन पोलिसांनी पकडले असता एकेकाला एकेका बगलेत धरून त्याने त्यांच्यासकट पळ काढला होता. त्याची ताकद तशीच अजस्त्र होती. पण सहसा तो रक्तपात टाळीत असे. त्याचं वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या धूर्तपणे आखलेल्या व अंमलात आणलेल्या लुबाडणुकी. एकदा त्याने कैक दिवस दुधाचा धंदा केला होता. अर्थातच गाई, गाड्या, दुकान ह्यापैकी काहीच त्याच्याकडे नव्हतं. सभासद मात्र बरेच होते त्याचे. (त्याचा भाव मोठा आकर्षक होता.) ते काय करायचा—अर्थात् हे नंतर उघडकीस आलं—इतरांच्या घराबाहेरील बाटल्या आपल्या सभासदांच्या घरी पोहोचवायचा. एकदा त्याने एका साधारण कमी रहदारीच्या रस्त्यावरील क्रमांकाच्या पाट्या रातोरात वेगळ्याप्रकारे रंगवल्या होत्या जेणे करून त्याचे गिऱ्हाईक नेमके जाळ्यात सापडावे. एका उपनगरात एक उचलून नेण्याजोगी पोस्टाची पेटी स्थापन करून त्याने किती एक जणांना फसवले होते. अशा एक ना दोन कितीतरी आख्यायिका प्रसिद्ध होत्या त्याच्याबद्दल. तो प्रचंड शरीराचा आणि उंचनीच होता हे वर सांगितलंच आहे पण तरीही एखाद्या डोंबाऱ्यालाही लाजवील अशी चपळता त्याच्या अंगात होती. ह्या ह्या म्हणता एखाद्या टारझनप्रमाणे भिंतीवरून, झाडावरून उड्या मारून अदृष्य व्हायचा तो. म्हणूनच प्रख्यात गुप्तहेर व्हॅलेंटिन जेव्हा फ्लँबोच्या तपासावर निघाला तेव्हा त्याला पूर्ण कल्पना होती की फ्लँबोचा निव्वळ शोध लावून त्याची साहसी कामगिरी संपणार नव्हती.

पण त्याचा शोध तरी तो कसा काय लावणार होता? ह्याबद्दल कोणतीच योजना अद्याप त्याने निश्चित केली नव्हती.

एका गोष्टीचा व्हॅलेंटिनला फायदा मिळणार होता. वेषभूषेत कितीही प्रवीण असला तरी आपली अद्वितीय उंची फ्लँबो झाला तरी लपवू शकणार नव्हता. म्हणूनच आपल्या प्रवासात व्हॅलेंटिनला एखादी जरी उंच व्यक्ती आढळली असती—मग ती कुणीही असो, फळ विकणारी बाई असो, की एखादा शिपाई असो. अगदी एखादी सरदारकन्या असती तरी चाललं असतं—तर आपल्या खास अधिकारात व्हॅलेंटिनने त्या व्यक्तीला जागच्या जागी अटक केली असती. पण सर्व प्रवासभर त्याला अशीच माणसं भेटत गेली, की ज्यांच्याबद्दल संशय घेणं म्हणजे एखाद्या मांजरावर वेष बदललेला जिराफ असल्याचा संशय घेण्यासारखं दिसलं असतं. निघताना बोटीवर असलेल्या माणसांबद्दल त्याने प्रथमच आपली खात्री करून घेतली होती व नंतरच्या प्रवासात फक्त सहाजणच काय ते वाढले होते. पैकी एक होता एक बुटकासा अधिकारी. तिघेजण—मध्यम उंचीचे—बागकामगार दिसत होते. पाचवी एक अशीच बुटकीशी विधवा बाई होती आणि सहावा एक कॅथॉलिक पाद्री. ह्या पाद्र्याशी गाठ

पडल्यावर बोटीवर फ्लँबो सापडण्याची आशाच व्हॅलेंटिनने सोडून दिली होती. आतासुद्धा त्याची आठवण झाल्यावर त्याला हसू आल्याशिवाय राहिलं नाही. गोल चेहऱ्याचा तो पाद्री कमालीचा मठ्ठ दिसायचा. त्याच्या डोळयात कसलंच तेज नव्हतं, अगदी शुष्क-कोरडे होते ते. बरीचशी ब्राऊन पेपरची पार्सलं घेऊन चालला होता तो. पण ती सांभाळताना त्याची अगदी पुरेवाट व्हायची. नक्कीच त्या युकॅरिस्टिक काँग्रेसमुळे तो लंडनला येत असणार. व्हॅलेंटिन जातिवंत फ्रेंच माणसाप्रमाणे अगदी नास्तिक होता. पाद्र्यांबद्दल त्याला जराही प्रेम नव्हतं. हां, त्यांची कीव करायला तो सदैव तयार असे आणि ह्या विशिष्ट पाद्र्याबद्दल त्यालाच काय कुणालाही कीव वाटली असती. त्याच्याकडे एक कायच्या काय मोठी व जुनाट छत्री होती. ती सारखी त्याच्या हातातून पडायची. झालंच तर आपल्या परतीच्या तिकिटाचा कोणता भाग राखून ठेवायचा (आणि अर्थातच कोणचा लंडनला पोचल्यावर फाडून टाकला तरी चालेल) हे त्याच्या कितीही जणांनी सांगूनदेखील शेवटपर्यंत लक्षात राहिलं नाही. ह्या सगळयावर कळस म्हणजे तो ज्याला त्याला सांगत सुटला होता की, त्याला फार काळजी घेणं आवश्यक आहे कारण 'माझ्याकडे असलेल्या पार्सलात चांदीची, हिरे बसवलेली एक अत्यंत मौल्यवान वस्तू आहे.' त्याच्या मठ्ठ व बालसदृश चेहऱ्याने व अखंड बडबडीमुळे व्हॅलेंटिनची खरोखरच करमणूक झाली होती आणि म्हणून उतरायच्या ठिकाणी जेव्हा तो पाद्री कसाबसा येऊन पोहोचला—आपल्या पार्सलांसकट—तेव्हा निरोप घेताना व्हॅलेंटिनने मोठ्या दयाळूपणे त्याला एवढंही सांगितलं की, "बाबारे, तुझ्या त्या मौल्यवान वस्तूंची तुला खरोखरच जर काळजी असेल तर इथून पुढें कोणाजवळ त्याबद्दल बोलू नकोस." ते असो, पण कोणाशीही प्रत्यक्ष बोलत असला तरी व्हॅलेंटिनची नजर कोणा दुसऱ्यालाच हुडकत असायची. स्त्री, पुरुष, गरीब, श्रीमंत कोणातही तो फरक करायचा नाही. फक्त उंची निरखायचा. सहा फुटांच्या आसपास असलेली प्रत्येक व्यक्ती त्याच्या दृष्टीने संशयीत असायची. कारण फ्लँबो सहा फुटांवर चार इंच उंच होता.

व्हॅलेंटिन लिव्हरपूल स्टेशनवर जेव्हा उतरला तेव्हा फ्लँबोचा शोध जरी त्याला लागलेला नव्हता तरी त्याने आपल्याला चकवा दिलेला नाही याबद्दल त्याची खात्री होती. तिथून तडक स्कॉटलंड यार्डला जाऊन त्याने आपली ओळख पटविली व गरज लागल्यास मदतीचं आश्वासन मिळविलं. मग एक सिगरेट पेटवून तो पायीच निघाला. काही वेळ चालल्यावर अचानक एके ठिकाणी तो दचकून उभा राहिला. लंडनच्या परंपरेला शोभेल असाच तो भाग होता. आजूबाजूची घरं श्रीमंती थाटाची पण आत कुणीच रहात नसल्याप्रमाणे ओसाड वाटत होती. चुकून कधीकधी पडते तशी शांतता चोहीकडे पडली होती. दृश्य सर्वसाधारणच होतं.

पण एका फारच पॉश हॉटेलने त्याचं लक्ष वेधून घेतलं. भारीच विचित्र होतं ते. इजिप्तसारख्या प्राचीन परंपरेला शोभेल असा शाही रुबाब दिसत होता त्या हॉटेलचा. काही म्हणा, येणाऱ्याजाणाऱ्याचं लक्ष वेधल्याशिवाय राहिलं नसतं त्याकडे. अगदी रस्त्यापासून ते प्रवेशद्वारापर्यंत पायऱ्या होत्या त्याला.

चमत्काराकडे कोणीही झालं तरी अविश्वासाच्याच नजरेने पहातो. पण चमत्कार घडून यावेत हीच किती अजब गोष्ट आहे याकडे सहसा त्याचं लक्ष जात नाही. चमत्कारिक गोष्टींनी तर हे विश्व ठासून भरलेलं आहे. पण सर्वसामान्य माणसाची ह्या जगाकडे बघण्याची दृष्टी अगदीच गद्य असते. साध्या डोळ्यांना दिसेल तेच तो सत्य मानत असतो. त्या पलीकडे खोलवर पहाण्याची त्याची ना तयारी असते, ना कुवत.

पण व्हलेंटिन काही सर्वसामान्यांमधे मोडणाऱ्यांपैकी नव्हता. एकतर तो फ्रेंच होता; पुनः बुद्धिमान. एवढं म्हटल्यावर त्याच्या दूरगामी विचारशक्तीबद्दल शंका यायचं कारण नव्हतं. तो म्हणजे काही एखादं 'विचार करणारं यंत्र' नव्हता – कारण यंत्राला 'यंत्र' एवढ्याचकरता म्हणतात की ते विचार करू शकत नाही. त्याच्या तर्कशुद्ध विचारसरणीच्या बळावरच अद्भुत भासेल असं यश त्याने कमावलं होतं. पण तर्काची ताकद अशाप्रकारे माहित असल्यामुळेच तर्काची मर्यादाही त्याला माहित होती. ना शेंडा, ना बुडखा अशा अवस्थेत तर्क कसले कपाळाचे करणार! अशा परिस्थितीत तपास करण्याची व्हॅलेंटिनची पद्धत म्हणजे खास त्याची होती.

अशावेळी तो आपले चर्मचक्षू जणू बंद ठेवायचा आणि ज्ञानचक्षूंवर विसंबायचा. 'तर्कशुद्ध विचारसरणीचा राजमार्ग मोकळा नाहीयेना चलातर मग योगायोगाच्या आड रस्त्यावरून', अशी त्याची विचारसरणी होती. बँका, पोलीस-स्टेशन, सभासंमेलनं अशी गुन्हेगारांना हुडकायची नेहेमीची ठिकाणं सोडून तो भलत्याच ठिकाणी जाई. कोणचंही बंद दार ठोठावं, कोणी काही बातमी दिली – पडताळून बघ, दरिद्री वसाहतीतून हिंड, असे एक ना दोन, अनेक मार्ग होते त्याचे. कोणी ह्याच्या योग्यायोग्यतेबद्दल शंका घेतली तर आपल्या या पद्धतीची मोठ्या हिरिरीने तो वकिली करायचा. 'पुराव्याच्या साखळीचा एक जरी दुवा तुमच्याकडे असेल', तो म्हणायचा, तर 'हा मार्ग सर्वथा त्याज्य होय. पण अन्यथा केवळ या पद्धतीनेच–अनपेक्षित का होईना – काही यश मिळण्याचा संभव.' कारण संशयित इसम जर हुषार असेल–आणि फ्लँबो निर्विवादपणे हुषार होता – तर तुम्ही ज्या संभाव्य ठिकाणी त्याचा तपास करणार त्यांची त्याला अगोदरच कल्पना असणार. पण कुठूनतरी सुरुवात तर करायलाच पाहिजे, मग ती अशा ठिकाणापासून का न करा की जिथे साधारण कोणीही तपास करणार नाही? म्हणूनच त्या शांत ठिकाणच्या ऐटबाज

हॉटेलने व्हॅलेंटिनचे लक्ष वेधून घेतले. अनुभवाने तरल बनलेल्या त्याच्या संवेदनाक्षम मनाला साहसाची साद ऐकू आली. लगेच रस्त्यापर्यंत पोचलेल्या पायऱ्या चढून तो आत गेला व तेथील खिडकीशेजारील जागेवर बसून त्याने कॉफीची ऑर्डर दिली.

त्याने सकाळची न्याहारी अजून केली नव्हती म्हणून त्याने एका उकडलेल्या अंड्यांची ऑर्डर दिली व शांतपणे तो कॉफीत साखर मिसळू लागला. त्याचे विचार मात्र सतत फ्लँबोबद्दलच चालले होते. अनेकवेळा ठिकठिकाणच्या पोलिसांच्या हाती सापडूनही प्रत्येक वेळी त्याने कशी हुलकावणी दिली त्याच्या हकिकती व्हॅलेंटिनला तोंडपाठ होत्या. आपण फ्लँबोएवढे तरी नक्कीच हुषार आहोत ह्याबद्दल त्याला विश्वास होता व तो अनाठायी नव्हता. पण पहिली हालचाल करण्याचा फायदा गुन्हेगाराला नेहमीच मिळतो याची त्याला कल्पना होती. अशा विचारतंद्रीतच सावकाशपणे त्याने कॉफीचा कप ओठाला लावला आणि तितक्याच त्वरेने तो खाली ठेवला. साखरेऐवजी मीठ टाकलं होतं त्याने कॉफीत.

अशा प्रकारची तंद्री एखाद्या न्यूटनला शोभून दिसते; आपण अजून तितके 'पोचलेले' नाही याची व्हॅलेंटिनला पूर्ण जाणीव होती. म्हणूनच ज्यातून साखरेऐवजी मीठ निघालं त्या पात्राकडे त्याने निरखून पाहिलं. साखरेचंच पात्र होतं ते. इकडेतिकडे पहाता त्याला मीठ ठेवण्याचं पात्र दिसलं. मोठ्या कुतुहलाने त्याने त्यातील वस्तूची चव बघितली. ती साखर निघाली. त्याला जरा गंमत वाटली. ज्या डोक्यातून ही अभिनव कल्पना निघाली असेल त्याची आणखी काही करामत सभोवार दिसते का ते तो पाहू लागला. पण एका बाजूच्या भिंतीवरील कसल्याशा काळसर द्रवाचा सपकारा सोडला तर बाकी सगळं ठाकठीक दिसत होतं. तेव्हा मग त्याने घंटी वाजवून वेटरला बोलावलं. इतक्या सकाळी त्रास दिल्याबद्दल तो वेटर आधीच वैतागला होता. अजून त्याच्या डोळ्यावरची झोप नीटशी गेली नव्हती. व्हॅलेंटिनने शर्करापात्राकडे बोट दाखवून 'हॉटेलच्या इतर रुबाबाच्या मानाने त्यातील पदार्थाची गुणवत्ता हवी तेवढी नाही" असं आपलं मत व्यक्त केलं. वेटरने ती चव घेतली मात्र, क्षणार्धात तो जागा झाला.

व्हॅलेंटिन म्हणाला, "सकाळी-सकाळी येणाऱ्या भवानीच्या गिऱ्हाइकाचं स्वागत करण्याची तुमची ही कल्पना मोठी नामी आहे ह्यात शंका नाही. किती वर्षांचा परिपाठ आहे हा तुमचा ?"

सगळी भानगड लक्षात यायला त्या वेटरला थोडा वेळ लागला. पण मग मात्र त्याने सांगितलं की ही नित्याची गोष्ट मुळीच नाही. नक्कीच काहीतरी गफलत दिसते. थोड्या वेळ त्या पात्रांकडे त्याने निरखून पाहिलं पण काहीच कळेना तेव्हा तो व्यवस्थापकाला बोलवायला गेला. व्यवस्थापक आल्यावरही तोच प्रकार. त्यालाही काही स्पष्टीकरण देता येईना.

एकाएकी त्या वेटरचा चेहरा फुलला. तो घाईघाईने म्हणाला,

"खात्रीने हे त्या दोघा पाद्रयांचं काम !"

"कोणचे दोन पाद्री ?"

"ते मगाचेच; ज्यांनी ते सूप भिंतीवर फेकलं ते."

प्रथम व्हॅलेंटिनला काही कळलंच नाही. 'सूप भिंतीवर फेकलं ?' तो उद्गारला, त्याला ती एखादी इटालियन म्हणच वाटली.

"हो, हो." वेटर उत्तेजित स्वरात म्हणाला व त्याने त्या भिंतीवरील डागाकडे बोट दाखविलं.

ह्यावर अधिक स्पष्टीकरणासाठी व्हॅलेंटिनने व्यवस्थापकाकडे पाहिलं. व्यवस्थापकाने सांगितलं की वेटर म्हणतो ते खरं आहे. पण, "त्याचा ह्या साखर-मीठ अदलाबदलीशी काही संबंध आहे असं मला वाटत नाही. दोन पाद्री सकाळी-सकाळीच आले व त्यांनी सूप मागितलं. हॉटेल नुकतंच उघडलं होतं तेव्हा. दोघेही शांत आणि सभ्य गृहस्थ दिसत होते. एकजण त्यातला बिल देऊन बाहेर पडला, पण दुसरा जरा रेंगाळत होता. एकंदरितच तो जरा वेंधळा वाटत होता. आपल्या वस्तू गोळा करण्यासाठी थांबला होता तो. अर्थात् त्यानेच जाता जाता आपल्या वाटीतलं सूप – मुद्दामच उडवलं होतंन् की काय नकळे – त्या भिंतीवर फेकलं. बिल घेतलेलं असल्यामुळे मी व हा वेटरही आतल्या बाजूला गेलो होतो. त्यामुळे आवाज ऐकून बाहेर येतो तो ते पसार झाले होते. पलीकडच्या कोपऱ्यावर वळताना दिसले चुटपुटते."

हे ऐकता–ऐकता व्हॅलेंटिन उठलाही होता. आपली टोपी डोक्यावर बसवून काठीही हातात घेतली होती त्याने. फारच विचित्र घटना दिसत होती ही. आणि त्याच्या अंतर्मनाने त्याला सूचना दिली होती की या मोहिमेतील पहिली मार्गदर्शक घटना असेल तर ती हीच. ह्या घटनेत काही रहस्य दडलं होतं खास. पण ते काय असेल त्यावर विचार करीत बसण्यापेक्षा त्याचा पिच्छा पुरवणंच त्याने पसंत केलं व आपलं बिल देऊन तो त्या विशिष्ट दिशेने निघाला.

मनाच्या अशा उत्तेजित अवस्थेतही व्हॅलेंटिनने आपले डोळे उघडे ठेवले होते हे सुदैवच म्हणायचं. म्हणूनच एका दुकानासमोरून पुढे गेल्यावर काहीतरी विचित्र पाहिल्याचा भास त्याला झाला व तो मागे फिरला. ते एक प्रसिद्ध फळविक्याचं दुकान होतं. दुकानात तऱ्हेतऱ्हेची फळं हारीनं मांडलेली होती व वर त्यांची-त्यांची किंमत लिहिलेली लेबलं लटकावलेली होती. अग्रभागी दोन मोठे ढीग होते. पैकी एकात संत्री होती व एकात काजू होते. काजूंच्या टोपलीवरील किंमतीच्या फलकावर लिहिलं होतं, "खास रसदार संत्री ताजा माल" तर संत्र्यांच्या टोपलीवर असाच स्वच्छ शब्दात लिहिलेला फलक होता, "ब्राझीलचे सुप्रसिद्ध काजू, खात्रीलायक, चवदार." इ. ह्या विसंगतीनेच व्हॅलेंटिनचे पाय मागे वळले

होते. चेष्टेचा हा अभिनव प्रकार ह्यापूर्वी नुकताच आपण अनुभवला आहे हे व्हॅलेंटिन विसरला नव्हता. त्याने दुकानदाराचं लक्ष जेव्हा ह्या गोष्टीकडे वेधलं तेव्हा तो रस्त्यावर चौफेर माना वळवून बघत होता. त्याने लागलीच ते फलक योग्य जागी लावले पण तो बोलला काहीच नाही. तरीही व्हॅलेंटिन आपल्या काठीवर ओळंबून उभा राहून त्या दुकानाची पाहणी करीतच राहिला. शेवटी त्या फळविक्रेत्याला उद्देशून तो म्हणाला, "तुम्हाला जरा चमत्कारिक वाटेल पण प्रायोगिक मानसशास्त्र आणि कल्पनांची सांगड ह्यासंबंधी एकदोन प्रश्न मला तुम्हाला विचारायचेत."

तो दुकानदार त्याच्याकडे विचित्र नजरेने पाहू लागला. पण तिकडे दुर्लक्ष करून मोठ्या मजेत आपली काठी हवेत फिरवत व्हॅलेंटिन बोलतच राहिला, "काजूंच्या टोपलीवर ती मोसंबी असल्याचा फलक लावणं ही कल्पना व एक उंच तर एक बुटका अशा दोघा पाद्र्यांची जोड गोळी ह्यांचा परस्पर संबंध काय असू शकेल?"

गोळी अचूक लागू पडली. त्या दुकानदाराचे डोळे क्षणभर फारच वटारल्यासारखे दिसले व तो व्हॅलेंटिनच्या अंगावर उडी तर घेणार नाही असा भास झाला. पण अखेर रागीट स्वरात तो एवढंच म्हणाला, "हे पहा, तुम्ही जर त्यांचे मित्र असाल तर त्यांना माझा निरोप सांगा की पुन: जर माझी संत्र्यांची करंडी उधळायचा त्यांनी प्रयत्न केला तर मग ते पाद्री असोत की कोणी असोत मी एकेकाला लंबे केल्याशिवाय राहणार नाही."

"म्हणता काय? त्यांनी तुमची संत्री उधळली?"

त्यांच्यापैकी एकाने. तेव्हाच मी लंबे केलं असतं त्याला पण ही संत्री गोळा करण्याकडे लक्ष द्यावं लागलं आधी म्हणून—

"कोणच्या रस्त्याने पळाले ते?"

"त्या पलीकडच्या दोन नंबरच्या."

त्या दुकानदाराचे घाईघाईत पण मन:पूर्वक आभार मानून व्हॅलेंटिन धावतच निघाला. वाटेत दिसलेल्या पहिल्याच पोलिसाला हटकून त्याने विचारलं, "हे पहा, फार महत्वाची बाब आहे ही. एवढ्यात दोन पाद्र्यांना इकडून जातांना तुम्ही पाहिलं काय?"

'हो, हो', तो पोलीस मोठ्या उत्साहाने म्हणाला, "आणि माझ्या मते त्यांच्यापैकी एकजण नक्कीच दारू प्यायला असणार. त्या एका माणसाला—"

पण त्याला मधेच थांबवून व्हॅलेंटिनने विचारलं, "कुठे गेले ते?"


"त्यांनी ती पिवळी बस पकडली. व्हॅम्पस्टेडला जाणारी."

आता पंचाईत आली. बसचा पाठलाग पायी करणं म्हणजे मूर्खपणाच. ताबडतोब आपलं अधिकारपत्र दाखवून व्हॅलेंटिनने त्याला हुकूम केला की, "ताबडतोब एक सहाय्यक व एक गाडी चालवू शकणाऱ्या इसमाला घेऊन ये", आणि तो घाईघाईने रस्त्यापलीकडील पोलिसगाडीकडे गेला. त्याच्या हुद्या-

# डोकं दुखतंय् ?



## प्रभावी आणि विश्वसनीय ॲनासिन त्वरित आराम देते



"माझं डोकं पुष्कळदा दुखतं. ॲनॅसिनपासून मला खराखुरा आराम मिळतो." बँकेत अधिकाराच्या जागेवर काम करणारे श्री. सुरेश देसाई यांचं हे मत.

**प्रभावी :** जगभर डॉक्टर्स ज्याची शिफारस करतात असे वेदनाशामक द्रव्य ॲनासिनमध्ये अधिक प्रमाणात असते. ॲनासिनमुळे वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.


**विश्वसनीय :** श्री सुरेश देसाई सारख्या लक्षावधि व्यक्तींचा ॲनासिनवर विश्वास आहे. डॉक्टरांच्या बिनधोक औषधांसारखेच अनेक औषधींचे मिश्रण त्यात असते.

सर्दी-पडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायूदुखी आणि दातदुखी यांवर परिणामकारक.

प्रभावी आणि विश्वसनीय

**ॲनासिन**

भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक



(Regd. User of TM : Geoffrey Manners & Co. Ltd.

पेक्षाही त्याच्या घाईचा अधिक परिणाम होऊन व्हॅलेंटिनच्या जवळजवळ पाठोपाठच तो पोलीस आणखी दोघांसकट तिथे हजर झाला.

"आता बोला साहेब, कोणच्या मोहिमेवर निघालो आहोत आपण?" त्याने व्हॅलेंटिनला विचारलं.

"आधी मार्गस्थ होऊ या आपण, मग सांगतो."

"या गाडीपेक्षा खाजगी वाहनाने अधिक जलदी जाऊ शकू आपण."

"बरोबर आहे, पण उपयोग काय!" व्हॅलेंटिन म्हणाला, "नक्की कुठे जाणार ते माहीत असेल तर वेगाने जाण्यात फायदा!"

यावर व्हॅलेंटिन ताबडतोब काहीच बोलला नाही. शांतपणे सिगरेट ओढीत राहिला; थोड्यावेळाने सिगरेट बाजूला करून तो म्हणाला, "गुन्हेगाराची बित्तंबातमी माहीत असेल तर अवश्य तुम्ही त्याच्या पुढे गेलं पाहिजे, पण जर केवळ तर्क करणंच तुमच्या हातात असेल तर मात्र त्याच्या मागे राहणं तुम्हाला भाग आहे. तो वळला की तुम्ही वळायचं, तो थांबला की तुम्ही थांबायचं. आणि त्याच्याइतकाच सावकाश प्रवास करायचा. तरच तुम्हाला त्याने जे पाहिलं ते दिसण्याचा संभव आहे आणि तरच तुम्ही तो जसा वागला असेल तसे वागू शकाल; यावेळी आपल्या हातात फक्त एकच गोष्ट आहे ती म्हणजे कुठेही काही चमत्कारिक—नेहमीपेक्षा वेगळी—गोष्ट आढळतेय का ते पाहणं."

"चमत्कारिक गोष्ट? म्हणजे नेमकी कशी?"

"कोणत्याही प्रकारची. नेहमीपेक्षा वेगळी असली म्हणजे झालं."

ती पोलिसगाडी तशीच बराचकाळ जात राहिली, हळूहळू त्या पोलिसांच्या मनात त्या मोहिमेबद्दल वाढता संशय येऊ लागला. कदाचित् त्यांना होणाऱ्या भुकेच्या वाढत्या जाणीवेचा तो परिणाम असेल. एव्हांना दुपारच्या जेवणाची वेळ कधीच टळून गेली होती. मुख्य लंडन शहर मागे टाकून आता ते उपनगरांतून जात होते. करता-करता कामडेन नामक गावाशी आले तेव्हा ते दोघे पोलीस बहुधा निद्राधीन असावेत. एरवी त्यांच्या खांद्यावर एकेक हात टाकून व्हॅलेंटिन उडी मारून उतरला तेव्हा ते एवढे दचकते ना.

आपल्या कुठे व का उतरवण्यात येत आहे ह्याची काहीच कल्पना नसल्यामुळे ते अडखळत उतरले व इकडे-तिकडे बघता त्यांना आढळलं की व्हॅलेंटिन मोठ्या विजयी मुद्रेने कोपऱ्यावरच्या हॉटेलच्या एका खिडकीकडे बोट दाखवीत आहे. इतर अनेक खिडक्यासारखीच होती ती—जराशी मोठी म्हणा हवं तर. पण एक फरक होता. ह्या खिडकीच्या कांचेच्या मधोमध एक भलं मोठं भोक पडलं होतं.

"आपण शोधीत असलेली चमत्कारिक गोष्ट ती हीच." व्हॅलेंटिन म्हणाला, "ती काच फुटलेली खिडकी."

"हो दिसतेय खरी. पण आपल्या केसशी तिचा संबंध आहे ह्याला पुरावा काय?"

" बापरे, तुम्ही पुराव्याची काळजी करीत बसणार तर!" व्हॅलेंटिन म्हणाला, "होय, नसेल कदाचित काहीही संबंध. पण दुसरं आपण करणार तरी काय? तुमच्या हे लक्षात कसं येत नाही की आपण ह्या एका शक्यतेचा तरी पाठपुरावा केला पाहिजे किंवा घरी आपल्या बिछान्यावर जाऊन तरी पडलं पाहिजे." एवढं बोलून व्हॅलेंटिन चटकन् त्या हॉटेलात शिरला व त्याने एक टेबल पटकावले. आता ती मोडकी खिडकी त्यांना आतून दिसत होती पण अर्थातच त्यामुळे त्यांना अधिक कसलीच माहिती मिळाली नाही.

शांतपणे जेवण झाल्यावर वेटर जेव्हा बिलाचे पैसे गोळा करायला लागला तेव्हा व्हॅलेंटिनने हळूच सुरुवात केली.

" तुमच्या खिडकीची काच फुटलेली दिसतेय!"

" हं, " सुटे पैसे गोळा करता-करता तो वेटर म्हणाला. पण तेवढ्यात व्हॅलें-टिनने त्यात एक नोट सरकावली. त्याचा अपेक्षित परिणाम झाला.

"होय साहेब," आता तो म्हणाला, " मोठीच चमत्कारिक गोष्ट."

" असं?" फारशी उत्सुकता न दर्शविता व्हॅलेंटिन म्हणाला.

"दोन पाद्री आले होते मगाशी.– ह्या काँग्रेसमुळे सुळसुळाटच झालाय हल्ली त्यांचा. दोघेही तसे सभ्य दिसत होते. आपलं जेवण त्यांनी सावकाशपणे संपविलं. एकाने बिल माझ्या हाती दिलं व तो बाहेर पडला. दुसरा जरा मागे होता. इकडे मी त्यांनी दिलेल्या पैशा-कडे पाहतोय तो माझ्या लक्षात आलं की त्याने जवळ जवळ तिपटीहून जास्त पैसे दिले आहेत. मी लगेच त्या मागच्या पाद्र्याच्या लक्षात ती गोष्ट आणून दिली. तो थंडपणे मला म्हणाला, " खरोखरच की काय?" त्याच्या स्वरामुळे मी दचकून बिलाकडे पाहिलं तो मला आश्चर्याचा धक्काच बसला.

" तो कसा काय?"–व्हॅलेंटिन म्हणाला.

" मी अजून देवाची शपथ सांगेन की मी बिल ४ शिलींग लिहिलं होतं. पण आता पहातो तो चक्क १४ शिलींग दिसत होते.

" असं? मग पुढे काय झालं?"

तो दाराजवळ उभा असलेला पाद्री पुन: शांतपणे म्हणाला, " तुमच्या हिशे-बात घोटाळा केल्याबद्दल माफ करा हं. पण त्या जास्त पैशांचा उपयोग ह्या खिडकी पायी होईल. " कोणची खिडकी?" मी चकित होऊन विचारलं. " जिची काच मी आता फोडणार आहे ती." असे म्हणून ताडकन् आपल्या छत्रीने त्याने 'ती' काच फोडलीन्.

हे ऐकल्यावर व्हॅलेंटिनसकट सगळेच दचकले. तो पहिला पोलीस तर म्हणा-लाच, " आपण कोणा वेड्याच्या पाठ-लागावर तर नाहीना?"

वेटर पुढे सांगू लागला. क्षणभर मी इतका काही चकित झालो की काहीच करू शकलो नाही, तेवढ्यात माझ्या डोळ्यादेखत तो पाद्री पळाला व आपल्या सहकाऱ्याला जाऊन मिळाला.

मग मी धावलो पण बुलकस्ट्रीटवरून ते इतक्या वेगाने गेले की पकडू शकलो नाही.

" बुलकस्ट्रीट, " व्हॅलेंटिन ओरडला, " चला तर मग. "

यावेळचा त्यांचा रस्ता अरुन्द गल्लीबोळातून चालला होता. सभोवार दाटीवाटीने विटांची घरं होती. वातावरण धुकट झालेलं होतं. आपण कुठं चाललो आहोत ते त्या सराइत इंग्लिश पोलिसांना ही कळत नव्हतं. पण व्हॅलेंटिनला खात्री होती की अखेर ते हॅम्प्स्टेड येथे पोहोचणार.

अचानक एक मिठाईचं दुकान त्यांच्या समोर आलं. आतून चांगलं प्रकाशित केलेलं होतं ते. त्यामुळेच उठून दिसत होतं. व्हॅलेंटिन काहीशा संशयानेच त्या दुकानात शिरला. गोड वस्तूंचा विशिष्ट वास त्याच्या नाकात शिरला. त्याने तेथील खरेदी काहीशा हेतुपूर्वकच लांबविली. चौकशीची सुरुवात करायला काही धागा त्याला पाहिजे होता. पण तशी जरूरच पडली नाही.

व्हॅलेंटिनचं स्वागत नेहेमीप्रमाणेच करणारी दुकानातली ती बाई गणवेषातील पोलीस आत आले तेव्हा दचकली.

" अरेच्या, " ती म्हणाली, " तुम्ही जर पार्सलाची चौकशी करायला आला असाल तर–, पण मी ते कधीच पाठवून दिलं. "

" पार्सल ?" व्हॅलेंटिन उद्‌गारला.

" त्या पाद्रयाने इथे ठेवून दिलं ते पार्सल म्हणायचंय मला. "

" कृपा करून काय घडलं ते सविस्तर सांगा, " व्हॅलेंटिन प्रथमच अस्वस्थतेने म्हणाला.

काहीशा संशयानेच ती बाई बोलायला लागली. " दोघे पाद्री, बघा साधारण अर्ध्या तासापूर्वी दुकानात आले. काही पेपरमिंटच्या गोळ्या त्यांनी खरेदी केल्या थोडावेळ बोलत राहिले. पाचेक मिनिटांनी गेले ते. पण नंतर काही क्षणातच त्यांच्यातला एकजण परत आला व म्हणाला, " मी काही पार्सल विसरलोय का बघा बरं जरा. " मी बघितलं, पण काही कुठे दिसलं नाही पार्सल. तेव्हा तो म्हणाला, " हरकत नाही, पण नंतर जर आढळलंच तर ह्या –त्याने तोंडीच सांगितलं–पत्त्यावर कृपा करून पाठवून द्या ते. " असं म्हणून व मला त्रास दिल्याबद्दल एक शिलींग देऊन तो निघून गेला.–तो गेल्यावर मी सहज म्हणून पुनः बघितलं तो खरंच होतं की एक पार्सल तिथे. मग मी सरळ ते त्याने दिलेल्या पत्त्यावर रवाना केलं. नीट आठवत नाही मला आता पण वेस्ट मिन्स्टर भागातला होता तो पत्ता. जरा चमत्कारिकच वाटलं ते सगळं मला व म्हणून पोलीस बघितले तेव्हा म्हटलं त्यासाठीच आले असावेत बहुधा.

' योग्य होता तुमचा कयास, ' व्हॅलेंटिन म्हणाला, ' हॅम्प्स्टेड टेकडीकडचा भाग येथून किती दूर आहे बरं ? तिकडेच गेले ना ते ?

" हो, जवळच आहे इथून, पंधरा मिनिटं चाललात की एकदम मोकळयावरच जाल तुम्ही. "

चालत जाण्याइतका धीर व्हॅलेंटिनला नव्हता. तो पळतच निघाला. बाकीचे दोघे काहीश्या नाइलाजानेच त्याच्यामागे थांबले. आतापर्यंतचा त्यांचा रस्ता इतका अरुंद व अंधारलेला होता की दहा मिनिटं धावून ते जेव्हा मोकळ्यावर आले तेव्हा संध्याकाळचा प्रकाश अजून कायम आहे हे पाहून ते चकितच झाले. समोर मोठा बागवजा माळ पसरलेला होता. व पुढे टेकडी दिसत होती. झाडी बरीच होती. हा भाग लोकांचा फिरायला येण्याचा होता. अनेक जोडपी अजूनही कुठेकुठे बाकावर बसलेली दिसत होती. अशा त्या वातावरणात व्हॅलेंटिनची दृष्टी एकदम तो शोधत असलेल्या दुकलीवर स्थिर झाली.

बऱ्याच अंतरावर असल्याने जरी ते अस्पष्ट दिसत होते तरी त्यापैकी एक दुसऱ्याहून बराच उंच होता ही मुद्याची गोष्ट व्हॅलेंटिनच्या नजरेतून सुटली नाही. एक प्रकारच्या उत्तेजितपणामुळे त्याने ओठ आवळले व तो पुढे निघाला. जसजसे ते जवळ जवळ गेले व त्या दोघांचे आकार स्पष्ट होऊ लागले तसतशी व्हॅलेंटिनच्या मनात सतत डाचत असलेल्या संशयाची अखेर निवृत्ती झाली. तो उंचाडचा पाद्री नेमका कोण आहे हे सावकाश ठरविता येईल पण तो दुसरा बुटका पाद्री म्हणजे आपल्याला बोटीवर भेटलेला गबाळग्रंथी फादर ब्राऊनच होय ह्याबद्दल व्हॅलेंटिनला आता शंका उरली नव्हती.

येथपर्यंत सगळं ठीक होतं. व्हॅलेंटिनला चौकशी करता हे कळलेलंच होतं की कोणी एक फादरब्राऊन लंडनमधल्या मुख्यांना दाखवायला चांदीचा, हिऱ्यांनी मढविलेला क्रॉस आणणार आहे. आणि जे व्हॅलेंटिनला कळलं होतं ते फ्लँबोलाही कळलं होतं ह्यातही नवलाची गोष्ट काहीच नव्हती. फ्लँबोला अशा गोष्टींची बातमी हमखास कळायची. पुनः इतकी मौल्यवान वस्तू म्हटल्यावर फ्लँबो ती चोरायचा प्रयत्न करणार हे अगदीच उघड होतं. आणि फादर ब्राऊनसारख्या अगदीच बावळट इसमाला पाद्र्याच्या वेषात ओळख काढून फसवणं म्हणजे बहुरुपी फ्लँबोच्या हातचा मळ होता. व्हॅलेंटिनला फादर ब्राऊनची पुनः कीव वाटली पण असा क्षुद्र फसवणुकीत भाग घेतल्याबद्दल फ्लँबोची चीडही आली. इथपर्यंत सारं ठीक होतं. पण नंतर जे घडलं–किंबहुना पाठलागाची सुरुवात आणि आता संभाव्य अंत ह्याच्या मध्यंतरी जे घडलं होतं त्यामुळे व्हॅलेंटिनचं डोकं अजूनही चक्रावलेलं होतं. त्याला त्यात तर्क सुसंगती म्हणून कुठे आढळत नव्हती. एक मौल्यवान क्रॉस चोरण्याचा भिंतीवर सूप फेकण्याशी कुठे मेळ बसत होता ? किंवा काजूंना संत्री म्हणण्याशी तरी ? आधी काच फुटण्याबद्दल पैसे देऊन मागाहून ती फोडणं ह्यात तर चमत्कारिकपणाची हद्दच झाली. व्हॅलेंटिनचा पाठलाग आता संपत आला होता पण तरी तो नेमका कसा पार पडला ते त्याला समजलेलं नव्हतं. ह्यापूर्वी ज्या काही थोडया वेळा त्याला अपयश आलेलं होतं तेव्हा सर्व दुवे

सापडूनही आरोपी पळालेला होता. आणि आता आरोपी त्याच्या तावडीत सापडलेला होता तर मधले दुवे सापडत नव्हते.

आता पाठलागाचं शेवटचं पर्व सुरू झालं होतं. अचानक ती दुक्कल उठली व व झाडीच्या रस्त्यावरून टेकडीकडे जाऊ लागली. एव्हाना बहुतेक मुशाफिर गेलेले असल्याने पाठलाग करताना विशेष काळजी घ्यावी लागत होती. अर्थात मधे अंतरही अधिक ठेवावं लागत होतं. एकदा ह्याचमुळे ती दुक्कल जी दिसेनाशी झाली ती तब्बल पाच मिनिटांनी परत दृष्टीपथात आली. अखेर टेकडीच्या पलीकडल्या बाजूस झाडाखालच्या एका भागावर ते दोघे बसले. अत्यंत काळजीपूर्वक व्हॅलेंटिन व दोघे पोलीस त्यांच्या जवळ जवळ पाठीमागे जाऊन उभे राहिले. दोघे पाद्री संभाषणात अगदी मग्न होते. त्यांनी ऐकलेलं पहिलं वाक्य म्हणजे फादर ब्राऊनच्या संभाषणातील अखेरचं–तेही अर्धवट होतं

"–मध्ययुगीन माणसं जे म्हणायची की स्वर्गाला पापाचा स्पर्शही होऊ शकणार नाही त्याचा खरा अर्थ हा आहे."

त्याच्या उंचाडचा सहकाऱ्याने मान डोलावली, पण तो म्हणाला, ते असं होतं,

"आणि तरीही ह्या अफाट विश्वाकडे पाहिल्यावर असं कुणाला वाटणार नाही की निदान काही ठिकाणी सदसद्विवेक, कार्यकारणभाव ह्यांना थाराच नसेल ?"

"छे, छे, सदसद्विवेक हे नैसर्गिक चिरंतन सत्य आहे. आपल्या चर्चसंस्थेवर असा आक्षेप घेतला जातो की चर्चने श्रद्धेचं महत्त्व वाढवून तर्काचं कमी केलं. पण मला हे मान्य नाही. चर्च तर म्हणतं की ईश्वरही कार्यकारण भावाने बांधलेला आहे."–इति फादर ब्राऊन.

उंच पाद्री आकाशाकडे नजर वळवून म्हणाला,

"तरी पण ह्या अफाट विश्वात –,"

"हे विश्व अफाट आहे ते केवळ स्थळ, काळ सापेक्षत:". फादर ब्राऊन त्याचे वाक्य तोडून म्हणाला, पण म्हणून सत्यासत्याच्या नियमांपलिकडे ते जातं असं समजू नको.

हे सर्व ऐकून व्हॅलेंटिन मोठ्या रागाने आपल्या हाताची नखं चावू लागला होता. कुठून ह्या पोलीसांच्या साक्षीने हा वेडेपणा आपण केला व ह्या निरुपद्रवी माणसांच्या मागे लागलो असं त्याला झालं. तो इतका अस्वस्थ झाला होता की त्या भरात त्या उंच पाद्र्याने दिलेलं उत्तर त्याच्या कानावर पडलंच नाही. तो लक्षपूर्वक ऐकू लागला तेव्हा पुन: फादर ब्राऊनच बोलत होता.

"सदसद्विवेक व न्यायान्याय ह्यांची सत्ता अतिदूरच्या तारकामंडलावरही चालते. ते तारे पहा. चकाकणारे हिरेच वाटताहेत नाही का ? प्रत्येक तारा म्हणजे एकेक स्वतंत्र रत्नंच आहे असं नाही वाटत ? अर्थात् त्याबद्दल कोणीही कसलीही कल्पना करू शकतो.

पण कल्पना कितीही अफाट केल्या म्हणून न्याय व सदसद्विवेक ह्या कल्पना नष्ट होणार नाहीत. ह्या विश्वात जिथे जाल तिथे 'चोरी करू नये,' हा फलक आढळेलच.

व्हॅलेंटिन आता मात्र अगदी चुपचाप निघून जाण्याच्या बेतात होता. पण तो दुसरा उंच पाद्री ज्या चमत्कारिक तऱ्हेने शांत बसला होता त्यामुळे त्याची उत्सुकता वाढली व त्याचं बोलणं ऐकेपर्यंत थांबायचं त्याने ठरविलं.

अखेर आपले हात गुडघ्यांवर ठेवून व डोकं खाली करून तो म्हणाला, "आणि तरी मला अजूनही वाटतं की या विश्वात कुठेतरी अशी जागा असेल की जिथे सद्सद्बुद्धी व न्याय ह्यांना थारा नसेल. विश्वाचं गूढ अगम्य आहे व मी तरी निदान त्यापुढे मान तुकवण्यावाचून काही करू शकत नाही." एवढं बोलून त्याने आपलं मस्तक आणखी झुकवलं. क्षण दोन क्षणच तसे स्तब्धतेत गेले असतील. मग पुनः त्याच संयत आवाजात तो म्हणाला,

"तेवढा तो किंमतवान् क्रॉस तुमच्याकडे आहे, तो देऊन टाका पाहू झटपट. आपल्याशिवाय दुसरं कोणीही नाही इथे आणि तुम्हाला पार जमीनदोस्त करून टाकायला मला वेळ लागणार नाही."

त्याच्या शांतपणामुळे त्या धमकीला वेगळंच एक क्रौर्य प्राप्त झालं होतं. पण फादर ब्राऊनने आपलं मस्तक जरासं हलवलं असेल इतकंच. तो पूर्वीसारखाच बावळटपणे आकाशाकडे पहात होता. बहुधा त्याला वस्तुस्थितीचं आकलन झालं नसावं. की ते झाल्यामुळेंच तो भितीने निःशब्द झाला होता?

तो उंच पाद्रीच पुनः बोलला. त्याच स्वरात.

"होय, फ्लँबो, फ्लँबो म्हणतात तोच मी."

आणि जरा थांबून पुनः

"तर मग देता की नाही तो क्रॉस?"

'नाही', एकाच शब्दात फादर ब्राऊन उत्तरला. पण त्या शब्दाला वेगळीच धार होती.

एकाएकी फ्लँबोने आपलं उसनं गांभीर्य सोडून दिलं. बाकावर तो रेलून बसला व हळू आवाजात पण बराच वेळ तो हसत राहिला.

'नाही?' तो म्हणाला, 'तू तो क्रॉस मला देणार नाहीस नाही का गर्विष्ठ माणसा? पण कसा देऊ शकणार तू तरी? मूर्ख माणसा, ऐक. तू तो क्रॉस मला देणार नाहीस कारण कधीचाच तो माझ्या खिशात आहे."

'तुला–तुला खात्री आहे?' फादर ब्राऊन चाचरत म्हणाला. संभाव्य चुकीच्या भीतीमुळे वैयक्तिक चिटणीस साहेबाशी बोलताना घाबरतो तसा.

"होय, विदुषकी माणसा, मला पूर्ण खात्री आहे. तुझ्याजवळ त्या ब्राऊन-पार्सलाची नक्कल करून मी त्यांची कधीच अदलाबदल केली होती. आता तुझ्याकडे ते नकली पार्सल आहे तर माझ्याकडे अस्सल हिरे आहेत. फार फार जुनी युक्ती आहे ही, फादर ब्राऊन,

फार जुनी."

"हं, मी ऐकलं आहे त्याबद्दल," आपल्या केसातून हात फिरवीत फादर-ब्राऊन उत्तरले.

हे ऐकून गुन्हेगारांच्या त्या बाद-शहालाही कुतूहल वाटलं.

"तुम्ही ऐकलं आहे ह्याबद्दल ? कुठे ऐकलं तुम्ही ते ?"

"त्याचं नाव फोडणं अर्थातच योग्य नव्हे," फादर ब्राऊन सहजपणे म्हणाले. 'कारण अखेर त्याला पश्चात्ताप झाला. जवळ-जवळ वीस वर्षं त्याने ह्याच प्रकारे आरामात काढली होती. आणि म्हणून जेव्हा मी तुझा संशय घेतला तेव्हा प्रथम ह्या माणसाच्या पद्धतीची मला आठवण झाली."

"संशय घेतला ?", फ्लँबो अधिकच मोठ्याने म्हणाला. 'केवळ ह्या निर्जन ठिकाणी आणल्यामुळे माझ्याबद्दल संशय घेण्याइतकी विचारशक्ती तुझ्यात आहे काय ?

"छे, छे." फादर ब्राऊन काहींशा अजीजीच्या स्वरात म्हणाले, "आपण प्रथम भेटलो तेव्हापासूनच मी तुझा संशय घेण्यास सुरुवात केली. तुम्ही लोक शर्टाच्या बाहीत ते शस्त्र लपवीत नाही का ? त्याचा फुगवटा मला दिसला."

'काय ?' फ्लँबो जवळजवळ ओरड-लाच. "ते तुम्हाला माहित्येय."

"लोक आपणहून सांगतात त्याला इलाज नाही." भुंवया निरर्थकपणे हलवून फादर ब्राऊन म्हणाला. "हार्टल-पूल विभागात मुख्य पाद्रीमहाशयांचा सहाय्यक म्हणून मी जेव्हा काम करीत होतो तेव्हा (कबुलीजबाब देण्यासाठी आलेल्यात) तिघेजण तसं शस्त्र बाळग-णारे मला भेटले होते. त्यामुळे सुरुवातीपासूनच मी तुझा संशय घेतला. आलं ना लक्षात ?" त्याचा स्वर सम-जावणीचा होता. "साहजिकच क्रॉस सुरक्षित पोहचला याची काळजी मी घेऊ लागलो. तुझ्यावर माझी नजर होती त्यामुळे अखेर पार्सलांची अदला-बदल करताना तुला मी पाहिलं. मग अर्थातच (नाही का ?) मी त्यांची पुनः एकदा अदलाबदल केली, आणि आता खरं पार्सल मी मागे ठेवून आलो आहे.

"मागे ठेवून आलो ?" फ्लँबो म्हणाला. यावेळी त्याच्या आवाजात विजयाच्या उन्मादाहून वेगळं काहीतरी होतं.

"हो. त्याचं असं झालं,–", फादर महाशयांचा स्वर कायम होता. "त्या मिठाईच्या दुकानात मी परत गेलो (ते तुला आठवत असेलच) तेव्हा मी विचारलं की मी एखादं पार्सल विसरलो आहे की काय, अर्थातच ते खरं नव्हतं. तेव्हा मी त्या बाईला एक शिलींग देवून सांगितलं की जर मागाहून आढळलं तर अमुक अमुक पत्त्यावर पाठवून द्या, आणि निघताना गुपचूप ते पार्सल ठेवून मी आलो. साहजिकच नंतर ते पार्सल बाईला दिसलं असणार व एव्हाना ते सुरक्षित स्थळी रवानाही झालं असेल." क्षणभर थांबून फादर ब्राऊन पुढे म्हणाला, "ही युक्तिसुद्धा मला अशाच एका माणसाने सांगितली.

तो स्टेशनावर चोरलेल्या बॅगांबद्दल ही युक्ति वापरायचा. अर्थात त्यालाही पुढे पश्चाताप झाला व तो आता एका मठात राहिला आहे. काय करणार, पाद्री झाल्यामुळे नाईलाजच आहे, आमचा. लोक आपणहूनच सांगतात त्यांची पापं, कळल्याशिवाय कशा राहतील या साऱ्या गोष्टी ;"

क्षणार्धात फ्लँबोने आपल्या कोटाच्या खिशातून एक ब्राऊन पेपरचं पार्सल काढलं व फाडून त्याचे तुकडे तुकडे केले कागदांचे कपटे व शिसपेन्सिलींची शिसं ह्याशिवाय काहीही निघालं नाही त्यातून. (त्याचंच नकली पार्सल होतं ते.) एक उडी मारून तो उभा राहिला व ओरडला.

"अशक्य, तुझ्यासारखा बावळट इसम इतकं सगळं करू शकेल ह्यावर माझा विश्वास बसत नाही. मला खात्री आहे की खरं पार्सल अजून तुझ्या खिशात आहे. आणि जर ते तू आता मला दिलं नाहीस तर मी पुन: सांगतो की आपणा दोघांशिवाय इथे कुणीही नाही आणि बळाचा उपयोग करायला मी कचरणार नाही."

"थांब, बळजबरी करून काही उपयोग होणार नाही. कारण एकतर खरोखरच ते पार्सल माझेजवळ नाही. आणि दुसरं म्हणजे आपण इथे एकटे आहोत ही तुझी समजूत चुकीची आहे."

वातावरणात नि:स्तब्धता इतकी पसरलेली होती की सबंध जगच फ्लँबोच्या उडीची वाट बघतंय असा भास होत होता पण कसल्याशा दुर्दम्य प्रेरणेने त्याला रोखून धरलं. फादर ब्राऊन पुढे बोलू लागला.

"त्या झाडामागे दोन बळकट पोलीस उभे आहेत व त्यांच्यासह सध्याचा सर्वश्रेष्ठ गुप्तहेर स्वत: हजर आहे. ते इथे कसे आले असा प्रश्न पडला असेल नाही तुला? उत्तर सोपं आहे. मी आणलं त्यांना. कसं काय जमविलं मी हे? ठीक आहे, तुझी इच्छाच असेल तर सांगतो. सुरुवातीला मला तुझ्याबद्दल नुसताच संशय होता; खात्री नव्हती. म्हणून मग मी तुझी परीक्षा घेतली. सर्वसामान्य माणूस, जर त्याची कॉफी खारट झाली तर आरडा-ओरडा करेल, होय की नाही? पण तू गप्प राहिलास. हॉटेलमधे बिल जर जरा जास्त आलं तरी लोक संशय व्यक्त करतात; मग जर ते तिप्पट वगैरे असेल तर हलकल्लोळच. पण ज्याला आपल्याबद्दल गवगवा होऊ नये अशी इच्छा असेल तो मात्र मुकाट्याने ते बिल भरेल. मी तुझं बिल तिपटीने वाढवलं पण तू काही न बोलता ते भरलंस."

त्या आठवणीने की काय फ्लँबो चरफडला. पण तसाच उभा राहिला.

"जेव्हा माझ्या लक्षात आलं की तू मागे काही माग ठेवायला उत्सुक नाहीस तेव्हा ते काम माझ्यावर पडलं. म्हणून मग जिथे जिथे आपण गेलो तिथे तिथे तुझ्या नकळत मी असे काही उपद्व्याप केले की त्यामुळे दिवसभर त्या लोकांना आपली आठवण रहावी. कुणाचं फारसं नुकसान केलं नाही मी. एके ठिकाणी

भिंत खराब केली, एकाची संत्री उधळली. एकाच्या खिडकीची काच फोडली. बस्स्. पण मी क्रॉस सुरक्षित ठेवला. एव्हाना वेस्ट मिन्स्टर येथे पोचलाही असेल तो. मला जरा भीतीच वाटत होती की कदाचित 'गर्दभ लकेरीचा ('डाँकीज् व्हिसल'चा) अवलंब करून ते पार्सल तू वाटेतच अडवितोस की काय ?'

कशाचा अवलंब करून ? '

"तुला ते माहीत नाही वाटतं ?" फादर ब्राऊन समाधानाने म्हणाला. "म्हणजे तू अजून तितकासा बिघडला नाहीस तर. अर्थात त्यावरही तोड माहीत आहे मला. पण ती अमलात आणण्याइतकी ताकद माझ्यात नाही."

"बोलताहात तरी कशाबद्दल तुम्ही ?" फ्लँबो आश्चर्याने म्हणाला.

"काय तुला तेही माहीत नाही ? मला वाटलं नव्हतं तसं."

"गुन्हेगार जगतातली ही पापं तुम्हाला कशी काय माहीत ?" वैतागून फ्लँबो म्हणाला.

"कारण मी एक बावळट, मूर्ख, विदूषक आहे ना, म्हणून." फादर ब्राऊन हसत म्हणाला, मगाशीच नाही का सांगितलं की दुसऱ्यांची पापं ऐकण्यावाचून काहीच करत नाही मी म्हणून. अशा माणसाला जगात चालणाऱ्या पापांची अगदीच माहिती नसणं कसं शक्य आहे ? ते राहू दे. पण माझ्या व्यवसायाशी निगडीत अशा आणखीही एका गोष्टीमुळे मला कळून चुकलं की तू खरा पाद्री नाहीयेस."

"ती कोणती ?" फ्लँबोने उत्कंठेने विचारलं.

"कारण तू न्यायान्याय व सदसद्विवेकबुद्धीवर हल्ला चढविलास."

एवढं बोलून आपल्या वस्तू गोळा करण्यासाठी फादर ब्राऊन वाकताहेत तोच मागून व्हॅलेंटिन व दोघे पोलीस पुढे झाले. फ्लँबो गुन्हेगार असला तरी अखेर एक कलाकार होता व खिलाडू वृत्तीचा होता. त्याने व्हॅलेंटिनला अभिवादन केलं. पण त्याचा स्वीकार न करता व्हॅलेंटिन म्हणाला.

"छे, छे, मला कसले अभिवादन करतोस. आपण दोघेही मिळून आपल्या गुरूला प्रणाम करूया."

ते दोघे तसे उभे असताना इकडे फादर ब्राऊन आपली पडलेली छत्री शोधीत होते. ● ● ●


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

## पुस्तके

# पोस्टमन श्रीहरी

जयवंत चुनेकर

काही पुस्तके वाचल्यानंतर मन अत्यंत अस्वस्थ होते; जीवनाच्या विलक्षण गुंतागुंतीच्या स्वरूपाविषयी ती अनेक प्रश्न मनात निर्माण करतात.

काही पुस्तकांच्या वाचनानंतर बऱ्यापैकी मनरंजन झाले, असे समजता येते आणि त्यांचा विचार बाजूला सारता येतो.

काही पुस्तके वाचून संपल्यावर मात्र त्यांचा काडीमात्र परिणाम मनावर होत नाही. "हे पुस्तक आपण कशासाठी वाचले ?" असा प्रश्न मात्र मनात उद्भवतो ! (लेखकाने ते लिहिलेच कशासाठी, हे विचारायचा हक्क वाचकाला नसतो, म्हणून तो प्रश्न मनात उद्भवू द्यायचा नाही ! )

पहिल्या प्रकारच्या पुस्तकांविषयी ते वाचत असतानाच आपल्याही काही विचार प्रक्रिया सुरू होतात; त्याच्या भलेबुरेपणाविषयी आपणही काही विचार मांडावे असे आपापतःच वाटू लागते. दुसऱ्या प्रकारच्या पुस्तकांच्या बाबतही आपल्या मनाला भावेल ते लिहिता येते. थोडेफार लिहायला सुचतेही. तिसऱ्या प्रकारची पुस्तके मात्र फारच पंचाईत करतात. एका निराळ्याच अर्थाने मती कुंठित करतात. पण परीक्षणासाठी पुस्तक हाती धरले, म्हणजे काही टळत नाही. मग अशा पुस्तकांवर काय लिहावे ? त्याचे थोडक्यात कथानक सांगावे, इतकेच.

तर ही 'पोस्टमन श्रीहरी' नावाची कादंबरी पण त्यात या श्रीहरीबद्दल जेमतेम दोन-तीन प्रकरणांचा मजकूर (एकूण प्रकरणे दहा), बाकी कादंबरीत वर्णन आहे, ते दोन जोडप्यांच्या संसाराचे; छापखानेवाल्या लिमयांच्या दोन मुलींच्या—यमु आणि सुषमा—यांच्या संसाराचे एकीचा नवरा समाजसेवक म्हणून तिचा संसार काळजीचा झालेला. दुसरीचा नवरा—परदेशी गेलेला आणि तिकडेच कुणा जेनीशी सूत जमवून सुषमेपासून 'जुडिशिअल सेपरेशन'चा अर्ज पाठवणारा आणि म्हणून तिचाही संसार काळजीचा झालेला. शेवटी अर्थात सर्वच गोडगोड ! मध्यंतरी आपल्या त्या पोस्टमन श्रीहरीचेही लग्न झाले, त्याची संपामुळे नोकरी गेली आणि संसारही अस्ताव्यस्त झाला. पण अखेरीस त्याचेही गोडगोड.

या कादंबरीत ट्रेड युनियनबद्दल चर्चा आहे; लोकशाहीची चर्चा आहे; भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृतीची चर्चा आहे. आणि तरीही ही कादंबरी श्रीहरीचीच आहे. का ते लेखकाने प्रस्तावनेत सांगून टाकलेच आहे.

तर अशी ही बाळबोध वळणाची, तशाच वृत्तीच्या वाचकांसाठी लिहिलेली कादंबरी, जाणकारांचे मन रिझवायला वा त्याला आवाहन करायला असमर्थ आहे, वगैरे काही म्हणणे म्हणजे कादंबरीकारावर अन्यायच की हो ! अस्तू. ☐

**पोस्टमन श्रीहरी**

लेखक, प्रकाशक
श्री. अ. तु. वाळके
' श्रमप्रतीक, ' ६९४, सदाशिव पेठ,
पुणे ३०; मूल्य ४ रु.

# कादंबरी

संस्कृत वाङ्मयाशी परिचय असणाऱ्या वाचकाला बाणभट्टाच्या ' कादंबरी '-विषयी आवर्जून सांगायला नको. बाणभट्टाची विलक्षण कल्पनाशक्ती आणि प्रतिभाप्य यांचा उन्मत्त विलास म्हणजे कादंबरी, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही. खेरीज मूळ संस्कृतातून (परीक्षेच्या अभ्यासाच्या निमित्ताने जी काय थोडीबहुत वाचनात येते) कादंबरी वाचताना तिच्यातले ध्वनिनर्तन हाही एक अनुभवून पाहाण्याचा भाग आहे. या अनुभवाचा ठसा सहसा मनावरून पुसला जात नाही.

श्री. ग. वि. अकोलकर यांनी काही निमित्ताने जरी या ' कादंबरी ' चा अनुवाद केला असला, तरी त्यामुळे संस्कृत न जाणणाऱ्या वा त्याच्याशी फारसा परिचय नसणाऱ्या रसिक वाचकाला संस्कृत वाङ्मयातील एका श्रेष्ठ पुस्तकाचा परिचय करवून देण्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. मात्र हा अनुवाद संपूर्ण नव्हे, तर साररूप आहे, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

पानामागून पाने विशेषणयुक्त, पल्लेदार, दीर्घ वाक्य रचना हे बाणाच्या कादंबरीचे ठळक वैशिष्टय आहे. अनुवादात ते राखणे सोयीस्कर झाले नसते. त्यामुळे ध्वनिनर्तनाचा पूर्वोक्त अनुभव मिळण्यात उणेपणा येतो, हे खरे असले, तरी तशाच प्रकारच्या मराठी रचनेमुळे आणि संस्कृत शब्दांच्या मुक्त वापराने अनुवाद विरूप बोजड झाला असता. श्री. अकोलकर यांनी मूळ स्वरूपाला धक्का न लावता गाभ्याशी प्रामाणिक राहून सोपेपणा आणला आहे व अनुवाद आकर्षक वाटेल याची काळजी घेतली आहे.

कुमार मित्रांचे या अनुवादामुळे मनरंजन होईलच. पण संस्कृतानभिज्ञ वाचकानाही ती वाचण्यात रस वाटेल असे निश्चितपणे म्हणता येईल. ☐

**' कादंबरी '**

श्री. ग. वि. अकोलकर
प्रकाशक–श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य,
५५७ सदाशिव पेठ, पुणे ३०;
मूल्य : पाच रुपये

# आम्ही तरुण

## प्राणपणाने आता लीगला विरोध करू

काका वडके

दि. २१ जुलै १९७३ च्या साप्ताहिक माणूसमधील श्री. अनिल अवचट ह्यांचा 'दंगल १६ मे पुणे' हा लेख वाचला.

अनिल अवचट यांची लिहिण्याची शैली ठरून गेलेली आहे. लेखन कसरतीने आपल्याला हवे त्याचा गौरव व विरोधी विचारांची खिल्ली उडवणे हा त्यांचा नेहमीचा खेळ आहे. पूर्वग्रहदूषित अशा त्यांच्या लेखांची काय दखल घ्यायची ? म्हणून त्यांनी आजवर लिहिलेल्या अनेक लेखातील आक्षेपांना आम्ही किंमत दिली नाही, पण १६ मेची दंगल हा महत्वाचा विषय असून त्यांच्या लिखाणातील बेजबाबदार विधानाने गैरसमज होऊ नये म्हणून हा प्रपंच:

१ : ह्या लेख प्रसिद्ध झाला तेव्हा त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दंगलीला तीन महिने झाले नसून दोनच महिने झाले आहेत.

२ : 'पुण्यात नसला तरी महाराष्ट्रात सर्वत्र दुष्काळ पडला आहे' हे विधान अवचटांच्या पोरकट बुद्धिचे प्रतीक आहे. गेले वर्षभर पुणे शहरातील विशेषत: पूर्व भागातील जनता दुष्काळाचे दुष्परिणाम सहन करीत रेशनवरचा अपुरा मिलो खाऊन मे महिन्याच्या रणरणत्या उन्हात मुलाबाळांना भर उन्हात घेऊन गव्हासाठी रांगेत उभी राहत होती. स्टोव्हला रॉकेल मिळत नाही म्हणून चुलीमध्ये स्वस्ताचे सरपण वापरल्यामुळे फुंकून फुंकून डोळे सुजवून कसेबसे जीवन जगत होती व आहे. अर्थात् फक्त वर्तमानपत्री लेख लिहून परोपदेशे पांडित्य करणाऱ्या अवचटांना ह्यातल्या कुठल्याही गैरसोयी जाणवणाऱ्या नसतील आणि म्हणूनच त्यांनी हे विधान केले असावे.

३ : 'दंगलीच्या आधी पेपरमध्ये कोपऱ्यात कुठेतरी येऊन गेलेल्या अर्धा एक इंची बातम्यांच्या कॉलमाआड एवढी प्रचंड खळबळ दडली असे वाटले नव्हते' –बरोबर आहे. जो माणूस फक्त वर्तमानपत्री बातम्यांवर विसंबून विचार

करतो व प्रत्यक्ष दंगलीच्या काळात ज्याचे पाऊल घराबाहेर पडू शकले नाही आणि सर्व ठाकठीक झाल्यावर लेखणी सरसावून बाहेर पडलेल्या या बोरुबहाद्दराला यापेक्षा वेगळे काय वाटणार ? आणि समजा वाटले तरी लिहिणार तरी कसे ? हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही जमातीतील कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेऊन त्या छापताना मात्र फक्त मुस्लिमांच्या प्रतिक्रिया देऊन हिंदूंनी दाखविलेली वास्तवता ज्यांनी आड केली त्यांना काय बोलणार ?

४ : 'चार दिवसांनी शिवसेनेची सवाद्य.........स्वागतही केले होते.'

—हा सारा वृत्तांत १०१ टक्के चुकीचा आहे, एवढेच नव्हे तर तो शिवसेनेची बदनामी करणारा आहे. ज्या दिवशी मिरवणूक काढली त्याच दिवशी शनिवारवाड्यावर मुंबईचे महापौर सुधीर जोशी ह्यांचा बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार होता. बाळासाहेब त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता पुण्यात आले. सत्कार सभेचा आणि मिरवणुकीचा काहीही संबंध नाही. केवळ दोन दिवस आधी मिरवणूक, पुन्हा सभा हे व्यवहारतः गैरसोयीचे होते. म्हणून शुक्रवारी काढण्यात येणारी मिरवणूक रविवारी काढली. मिरवणूक काढण्याचे प्रयोजन आम्ही स्पष्टपणे जाहीर केले होते. सवाद्य मिरवणूक काढणे हा हिंदूंचा हक्क आहे आणि लीगवादी मुस्लिम पुन्हा डोके वर काढू पहात असून पुन्हा वाद्यबंदीचा प्रश्न काढू पहात आहेत. तेव्हा त्याला उत्तर देण्यासाठी ही सवाद्य मिरवणूक आम्ही काढली. अर्थात् गुलाल उधळणे यात गैर काहीच नाही. परंतु मशिदीवर गुलालाच्या पुड्या फेकल्या वगैरे वृत्तांत संपूर्ण खोटा आहे.

तसेच मिरवणुकीत एक मुसलमान पात्र असे वगैरे भागही कपोलकल्पित आहे. आम्ही काढलेल्या सवाद्य मिरवणुकीत छत्रपतींच्या प्रतिमेच्या रथाशिवाय एकही फ्लोट नव्हता वा वरील प्रकारचे दृष्यही नव्हते. उलट अवचट म्हणतात, 'त्यानंतर १५ दिवस मध्ये जाऊन ४ मेला शिवजयंती आली. पुन्हा सवाद्य मिरवणूक, घोषणाबाजी, गुलाल उधळणे या पलीकडे फारसे झाले नाही—" वगैरे. हेही असत्य आहे. उलट शिवसेनेच्या सवाद्य मिरवणुकीत पुण्याचे शिवसेनाप्रमुख नंदू घाटे, डॉ. तोडकर, उल्हास काळोखे, बाबूराव रजपूत व मी स्वतः प्रयत्नांची शिकस्त करून मिरवणूक शांतपणे पार पाडली, याचा निर्वाळा पोलीस अधिकारीही देतील. परंतु शिवजयंतीची मिरवणूक सर्वपक्षीय होती. त्यात पुण्यातील अनेक पक्षीय विचारांची मंडळे सामील झाली होती. शिवजयंतीच्या अगोदर मा. महापौर व कमिशनर श्री. कदमबांडेसाहेबांनी बैठकी आयोजित केल्या होत्या. सर्वांनी कसे वागावे, काय घोषणा द्याव्यात हे सर्व ठरले होते. मिरवणूक दुपारी चारला सुरू झाली आणि एकदा भवानी मातेला व महाराजांना हार घालून त्यांचा जयजयकार झाल्यावर लीग-

विरोधी घोषणांचा जो गदारोळ उडाला तो शेवटपर्यंत थांबला नाही. परंतु पुण्यातील कुठल्याही मान्यवर नेत्याने त्यांना आवरण घालण्याचा प्रयत्न केला नाही. उलट शिवसेना ग्रुप अर्ध्या वाटेत सामील झाला. सर्व प्रतिष्ठित म्हणवणारे पुढारी महानगरपालिकेच्या हत्तीमागे महापौरांबरोबर जे सुरुवातीला डुलत निघाले, त्यांनी शेवटपर्यंत मागे वळूनही पाहिले नाही. आम्ही शिवसेनेचे लोक मात्र शेवटपर्यंत शिवसेनेच्या जथ्या-बरोबर होतो. कारण आम्हाला ठाऊक होते, की दुसरेच काहीतरी करतील आणि शिवसेनेला बदनाम करतील. विशेष म्हणजे डुल्या मारुतीजवळ मी स्वतः पाहिले, की पुण्यातील एक मंडळ मुस्लिमांच्या नावाने अचकट शिमगा करीत होते आणि त्या मंडळाच्या अग्र-भागी पुण्यातले एक कॉंग्रेस आमदार होते. पण त्यांनी आवरायचा प्रयत्न केल्याचे मला दिसले नाही. शिवसेनेच्या मिरवणुकीत नव्हता त्याच्या कितीतरी पट लीगविरोधाचा जोर शिवजयंतीच्या मिरवणुकीत होता. पण अवचटांना कसे दिसणार ! कारण सवाद्य मिरवणूक शिवसेनेची होती ना ?

५ : नामदेव पवारवर हल्ला होण्याचे जे कारण आम्ही पाहिले ते हेच की, ' तू शिवाजी झालास काय ? थांब, ज्या शिवाजीने पुण्यात शाहिस्तेखानाची बोटे तोडली त्याच पुण्यात शिवाजी बन-णाऱ्यांकडे आम्ही बघून घेतो. ' ही त्या मुस्लिमांची जिद्द होती. आता त्याला पोलीस अथवा अवचट कुठलेही घरगुती अथवा व्यावसायिक कारण देवोत.

६ : नामदेव पवारांचे घर मी पाहिले. प्रचंड नाही पण दोन स्टील कपाटे आणि भांडी आहेत. हे सत्य. पण दलितांचा वेळीअवेळी कैवार घेणाऱ्या या अवचटांनी एका दलिताचा भरलेला संसार पाहून त्याचे कुत्सितपणे वर्णन करावे, यासारखी शरमेची गोष्ट नाही. स्टीलची कपाटे काय फक्त जिम-खान्यावरील बंगलेवाल्यांनीच ठेवावीत काय ? आणि भांडी म्हणाल तर अवच-टांनी माझ्या बरोबर पूर्वभागात घरोघर हिंडावे. मी त्यांना दाखवून देतो, की इथल्या गरीब स्त्रियांचा सर्वानंद म्हणजे घरात खूप भांडी असणे. अर्थात नवीन नवीन सुधारकांच्या संस्कृतीत घरात भांडी कमी, बायकांच्या अंगावर कपडे कमी, फक्त मद्यपानासाठी लागणारी क्रॉकरी आणि बेडरुम्स् तेवढ्या आलि-शान, हे वेगळे.

७ : ' ह्या आधीच्या घटना घडत असताना तिकडे नव्याने स्थापन झालेली शिवसेना त्याला योग्य ते वळण देत होतीच. शिवाजी जसे मावळ्यांमध्ये स्फुरण निर्माण करीत तसे हे करीत. ' ह्यात अवचटांना काय अभिप्रेत आहे ? आम्ही लीगला प्रखर विरोध करतो आहोत ते काय चूक आहे ? उलट तेच म्हणतात ना की नव्याने स्थापन झालेली शिवसेना म्हणून. मग पूर्वी काय दंगली होत नव्हत्या ? का फक्त शिवसेनेमुळेच झाल्या ? उलट शिवसेना फक्त व्याख्या-नातूनच लीगचे राष्ट्रद्रोही विचार उघडे करते. परंतु मुस्लिम मात्र पूर्ण तयारीत

होते. त्यांचे जवळ जंबिये, सुरे, गुप्त्या, गज, ट्रकच्या स्प्रिंगच्या पाटयाच्या तलवारी, खाटकांचे कोयते असली शस्त्रे होती. ते जमावाने फिरत होते व दहशत घालीत. त्यांच्या प्रतिकारामुळे हिंदू त्यांच्या वस्तीत येऊ शकले नाहीत. अवचट म्हणतात तसे खतपाणी शिवसेनेने पूर्वी घातले असते तर, मला नाही वाटत मुस्लिमांची इतकी सशस्त्र दहशत निर्माण करायची हिंमत झाली असती.

८ : हिरोलीच्या घरी इतकी पद्धतशीर तयारी कशी होती ? याचाच अर्थ त्यांना दंगलीची पूर्वकल्पना होती.

९ : कसब्यात जेव्हा धारियांना फार मोठ्या प्रमाणात विरोध दिसून आला, तेव्हा समाजवादी नगरसेवक श्री. रामभाऊ वडके हे धारियांच्या गाडीत आधीच जाऊन बसले होते. अर्थात चूक रामभाऊंची नव्हती. तर संतप्त तरुणांना आवर घालणे हे त्यांना खरोखर अशक्य होते. उलट श्री. नंदू घाटे व मी स्वतः अत्यंत परिश्रमपूर्वक श्री. धारियांना कसब्यातून व्यवस्थित जाण्यास मदत केली. याची ग्वाही ते स्वतः देतील. यावेळी अजिबात गोळीबार झाला नाही.

१० : वातमीदार मंडळी भले स्वतःची मते मिसळून बातम्या तयार करून देत असतील. परंतु दंगल काळात निदान स्वतःचा जीव धोक्यात घालून प्रत्यक्ष परिस्थितीत वावरत होते. अवचट त्यावेळी कोठे होते ?


११ : अवचटांना फक्त आपल्या मतलबांच्याच घटना दिसल्या. दंगलीच्या दुसऱ्या दिवशी कसबा पेठेत साततोटी चौकाजवळ एक मुसलमानांचा वाडा हिंदू तरुणांनी घेरून पेटविण्याचा प्रयत्न चालविला होता. दगडफेक चालू होती, वाड्यात अंदाजे स्त्री-पुरुष-मुले धरून ७५ माणसे होती. मी व नंदू घाटे तेथून जाताना एका मुस्लिम नागरीकाने तो प्रकार आमच्या कानावर घातला. आम्ही दोघे लगेच घटनास्थळी गेलो. वाड्यात बायका-मुले धाय मोकलून रडत होती. परिस्थिती क्षणाक्षणाला स्फोटक होत होती. आम्ही आवरण्याचा प्रयत्न केल्यावर आमच्यावरही दगडफेक सुरू झाली. नंदू घाटे वाड्याच्या दरवाज्यात दगडाचा मार सहन करीत उभे होते. मी लगेच पळत जाऊन सात-तोटी पोलीस चौकीवरून कंट्रोलला फोन करून पोलीस मदत मागविली व होणारा एक भीषण प्रकार टाळला. याची साक्ष त्या दिवशीचे पोलीस अधिकारी व त्या वाड्यातील मुस्लिम नागरिक आजही देतील. पण फक्त एसेम, निळूभाऊ, बाबा आढाव, अरुण लिमये यांचीच टिमकी ज्याला वडवायची आहे, त्याला हे कसे दिसणार ? आणि समक्ष मुलाखतीत मी जरी सांगितले तरी ते कसे लिहिणार ? कारण त्यांची साधनशुचिता आडवी येते ना !'

असो. या दंगलीची खरी मीमांसा अशी आहे की, या राष्ट्रात प्रत्येकाला धर्म स्वातंत्र्य आहे. मी कट्टर हिंदुत्वनिष्ठ आहे. पण मी असे मानतो की, प्रत्येकाने आपला धर्म खाजगी जीवनात

व चार भिंतीच्या आत ठेवावा. जेव्हा आपण रस्त्यावर येऊ, तेव्हा सर्वजण भारतीय असू. परंतु दुर्दैवाने आम्हा तरुण पिढीला असे पदोपदी जाणवते की, बहुसंख्य मुस्लिम अजून भारतीय जीवनाशी एकरूप होत नाहीत. त्यांच्या डोक्यातील लीगचे भूत जात नाही. उलट लीग वाढू लागली आहे. आम्ही तरुण आता प्राणपणाने लीगला विरोध करू. कारण आम्ही असे मानतो की, जे स्वातंत्र्य आम्ही आज उपभोगत आहोत ते स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आमच्या पिढीला काही त्याग करावा लागला नाही. परंतु त्या दरम्यान जन्माला आलेली आमची पिढी हे स्वातंत्र्य प्राणपणाने अबाधित ठेवील. भारतमातेचे एकदा तुकडे झाले. आता यापुढे तिचे आणखी तुकडे होऊ देणार नाही. हा आमचा निर्धार आहे आणि त्याला प्रचंड प्रमाणावर साथ मिळत आहे.

काही मुस्लिम नेते असे म्हणतात की, 'त्यांनी स्वसंरक्षणासाठी घरात शस्त्रे ठेवली. कारण त्यांना वाटते की, हिंदू आमच्यावर हल्ला करतील.' खरी गोम येथेच आहे. असे म्हणणाऱ्यांच्या मनात पाप आहे. म्हणून त्यांना भीती वाटते. पण राष्ट्रवादी मुस्लिम सत्य-शोधक मंडळाचे सय्यदभाई यांच्या घरी साधी काठीही सापडणार नाही. कारण त्यांना ठाऊक आहे, की आपण या मातेचे पुत्र आहोत. इथे जन्मलो आणि इथल्याच मातीत मिसळणार. त्यामुळे आपल्याला धोका नाही. आणि म्हणून शिवसेनेची प्रत्येक सभा ही मुस्लिम सत्यशोधक मंडळाची प्रचार सभा ठरते. मुस्लिम सत्यशोधक समाज ज्या वेगाने वाढेल, त्या वेगाने या देशातील जातीय तणावाचे वीष कमी होईल. अन्यथा हे सारे अटळ आहे. पूर्वी शिवसेना नव्हती. पुढे कदाचित असेल अगर नसेल. पण जोपर्यंत मुस्लिम या देशातील मातीशी समरस होत नाही तोपर्यंत या कटकटी कमी होणार नाहीत. उलट मागे एकदा अटलबिहारी वाजपेयी यांनी म्हटल्या-प्रमाणे 'हिंदू यापुढे मार खाणार नाहीत.' हाच विचार विशेषतः तरुणां-मध्ये बळावू लागला आहे. याची मुस्लिम जात्यंधांनी दखल घ्यावी. तसेच मतासाठी लाचारी पत्करणाऱ्यां-नीही याची दखल घ्यावी हे बरे! मुस्लिमांनाही विनंती आहे, की त्यांनी आता लीगचे पिल्लू फेकून द्यावे व या देशाच्या विकासासाठी वाहून घ्यावे.

● ● ●




# सखाराम बाइंडर

## गुजराती : हिंदी : इंग्रजी आणि मराठीसुद्धा

एखाद्या नाटयसंहितेचे विविध भाषेतील प्रयोग पाहणे हे नाटयकलेचा अभ्यास करणाऱ्या कोणालाही अनेकदृष्टींनी स्वारस्यपूर्ण वाटते. विविध भाषांमधील प्रयोग असे म्हणताना कोणाही विचक्षण रसिकाला केवळ भाषांतर अभिप्रेत नसते. एखाद्या भाषेमध्ये व्यक्त होणारा नाटयानुभव त्या भाषेत प्रतिबिंबित झालेल्या समाजमानसाशी अन्वय साधणारा असतो. त्यामुळे या अनुभवाचा नव्या समाजमनाशी संभोग कसा होतो या कुतुहलाने आपण भाषांतराकडे पाहतो.प्रयोगदृष्टया विचार करता एकच नाटयानुभव वेगवेगळया सामाजिक वातावरणात, वेगवेगळया दिग्दर्शकांच्या संकल्पनातून, वेगवेगळया कलावंतांच्या अभिनयातून कसा व्यक्त होतो याविषयीचे कुतुहल असते. 'सखाराम बाईंडर' या तेंडुलकरांच्या नाटकाचे विविध भाषांतील प्रयोग पाहायला जाताना सत्यदेव दुबे अरुण सचदेव, सुलभा देशपांडे, कमलाकर सारंग या दिग्दर्शकांनी ही नाटयकृती कशी हाताळली असेल याविषयी विशेष कुतूहल होतेच. मराठी 'सखाराम'चे अनेक प्रयोग झाल्यानंतर गुजराती व हिंदी प्रयोग निर्माण झाले. हे दोन्ही प्रयोग तालमींच्या अवस्थेत असतानाच सखारामचे 'संयत योग' 'वेगळा अर्थ' अशी वाऱ्यावर बातमी होती. या वाऱ्यावरच्या वार्ता ऐकत असताना मनात अनेक शंका निर्माण होत होत्या. कारण अलीकडे विजय तेंडुलकरांचे नाटयसंहितालेखन रंगमंचाचे इतके भान राखणारे आहे की नंतर दिग्दर्शकाला खूप वेगळे काही करता येईल असा वाव नसतो. तरी सत्यदेव दुबे आणि सुलभा देशपांडे हे दिग्दर्शक काही नवे करू शकतील, अशीही शक्यता होती. शिवाय दुब्यांनी दिग्दर्शित केलेल्या प्रयोगात तरला मेहता या तरबेज नटीने चंपाची आणि दीना गांधीने लक्ष्मीची भूमिका केली होती !

गुजराती 'सखाराम बाईंडर'चा पडदा उघडण्यापूर्वीच -- सखारामच्या प्रवेशापूर्वी, पोरांचा गलका अत्यंत तीव्र स्वरात योजला होता. मूळ नाटकांत त्याचा सूचक वापर आहे. किंबहुना मराठी नाटयप्रयोगाचे दिग्दर्शक कमलाकर सारंग यांनी पार्श्वसंकेत जाणीवपूर्वक योजलेले नाहीत. गुजराती प्रयोगात सखारामची भूमिका गिरीश देसाई यांनी केली आहे. गिरीश देसाई ही गुजराती रंगभूमीवरील नायक प्रतिमा आहे. अशा सांकेतिक नायका-

पेक्षा सखारामच्या भूमिकेचा सूर-तोल वेगळाच आहे. गिरीश देसाई सखारामची भूमिका रासवटपणे करण्याचा यत्न करीत होते. तो यत्न करतानाच त्या भूमिकेतील थंड अलिप्तपणाचा त्यांना व दुब्यांनाही विसर पडला होता. दीना गांधी यांना तर लक्ष्मीच्या भूमिकेचा अर्थच सापडत नव्हता. लक्ष्मी वरवर कनवाळू-गरीब वाटली तरी आत घट्ट पिळाची आहे. दुसऱ्यावर हुकमत गाजवणारी आहे; तिच्याविषयीच्या आकर्षणाचे स्पष्टीकरण सखारामलाही कळत नाही. हे गूढत्व दीना गांधी निर्माण करू शकल्या नाहीत. ज्या हसण्याला या नाटचानुभवात विशेष स्थान आहे ते त्यांचे हसणे कृत्रिम होते. दिग्दर्शकाने त्याचा पार्श्वसंकेतासाठी अतिरिक्त वापर करून त्या कृत्रिमतेत भर टाकली. दुसऱ्या अंकामध्ये चंपाने प्रवेश केला तोच भडक गुलाबी रंगाची साडी नेसून. ती साडी आणि चंपाचा एकूण ढंग विशिष्ट वर्गातील स्त्रीचे स्मरण करून देणारा आहे. प्रथमदर्शनीच चंपाविषयी अशी भडक कल्पना करून देण्याची गरज नव्हती. तरला मेहता यांनी ही भूमिका ढंगदारपणे करण्याचा यत्न केला पण त्यात स्वतःच्या 'नटी' प्रतिमेचे प्रक्षेपण आत्यंतिक होते. फौजदार शिंदे तर विदूषकी चाळे करून प्रेक्षकांना हसवत होता. दुब्यांच्या कोणत्याही निर्मितीत दिसणाऱ्या सफाईचा या नाटचप्रयोगात अभाव होता.

भाषांतरकाराने गुजरातीची बोली वापरून भाषेत खटका आणण्याचा केलेला यत्न यशस्वी झाला आहे. नेपथ्यकाराने सखारामची जागा अनेक कोनांची करून मर्यादित जागेत स्वतःचे विश्व निर्माण करण्याची कल्पना नाहिशी केली आहे. सत्यदेव दुबे जसे या नाटचप्रयोगात जाणवले नाहीत तसेच विजय तेंडुलकरांचे 'सखाराम बाईंडर' या प्रयोगात सापडले नाही. यांत्रिकपणे सादर झालेल्या या नाटचप्रयोगात विविध दृश्यांतील अंतःसंबंध नाहिसे झाले होते.

गुजराती नाटचप्रयोगाची निराशा ही तशी जाणवली नाही; कारण अमरीश पुरी आणि सुलभा देशपांडे यांचा हिंदी 'सखाराम बाइंडर' नंतर पाहावयाचा होता. काही कारणांमुळे पहिला प्रयोग पाहावयास जमले नाही. वृत्तपत्रातील परीक्षणातून अमरीश पुरी व सुलभा देशपांडे यांच्या अभिनयातील सूक्ष्म भावछटांचे कौतुक वाचले; अधोरेखीत केलेले प्रयोगाचे संयम स्वरूप डोळचांसमोर आणले आणि या प्रयोगाविषयी मन अधिक उत्सुक झाले.

हिंदी 'सखाराम बाइंडर'चा पडदा उघडतानाही मुलांचा गलका नको तितका वापरला होता. पडदा उघडला आणि सखाराम बाइंडरचे घर दिसले ते एखाद्या पाटलाच्या चौसोपी वाड्यासारखे! प्रथमच नेपथ्यानेच मनाचा विरस केला. सखाराम-लक्ष्मी-दाऊद या पात्रांचा पहिला अंकच सपाट झाला. कारण अमरीश पुरी यांनी अभिनयाचा सूर प्रथमतःच वरचा लावला होता.

अच्युत पोतदारांचा दाऊद फारच नागर व नखरेल वाटत होता. प्रेमा साखरदांडे 'लक्ष्मी'मधील आगळे व्यक्तिमत्त्व निर्माण करू शकत नव्हत्या त्यामुळे त्यांनी उभी केलेली लक्ष्मी–कौटुंबिक नाटकातील रडवी स्त्री वाटत होती. पहिल्या अंकातील सखारामने लक्ष्मीला मारण्याचे प्रसंग एखाद्या उंचवट्याच्या आड घेऊन दिग्दर्शिकेने प्रयोग संयत पातळीवर ठेवण्याचा यत्न केला. पण अमरीश पुरींनी सखारामचा त्वेष इतका अतिरिक्त दर्शविला की ते प्रसंग संयत होण्याऐवजी भडक झाले. दुसऱ्या अंकात सुलभा देशपांडे चंपाच्या भूमिकेत आल्या, त्या तरला मेहताप्रमाणे भडक गुलाबी रंगाची साडी नेसून नंतरच्या त्यांच्या प्रत्येक हालचालीत मी-सुलभा देशपांडे ही भूमिका करीत आहे ही जाणीव पुरेपूर होती. कृत्रिम हातवारे, शब्दांची उडती फेक, यामुळे त्या तेंडूलकरांच्या नाटकातील चंपा उभी करू शकल्या नाहीत. सुलभा देशपांडे आणि तेंडुलकरांच्या नायिका यांचा इतक्या वर्षाचा सहवास लक्षात घेता हा अनुभव चमत्कारिक वाटला. अलीकडे 'अवध्य' मधील त्यांची भूमिका पाहतानाही असे वाटले की सुलभाबाईंचा अभिनय निश्चेतन होऊ लागला आहे.

दिग्दर्शिका म्हणूनही सुलभा देशपांडे कमी पडल्या. सखाराम बाइंडर चिरचिऱ्या, तिरसट उभा करून त्यांनी त्या नाटकातील मुख्य भूमिकेचे वेगळेपण नाहीसे केले. प्रयोगाच्या संकल्पनात त्यांनी लक्ष्मीला दिलेले महत्त्व पटले; परंतु प्रेमा साखरदांडे यांच्या भावविवश अभिनयामुळे जो अर्थ सुलभाबाईंना अभिप्रेत होता तो व्यक्त होऊ शकला नाही. त्रिविध दृश्यातील हळूहळू मंदावणारा प्रकाश मात्र दिग्दर्शिका व प्रकाशयोजनाकार यांनी चांगला योजला होता. प्रयोगात सफाई कमीच होती. पण या सर्वांपेक्षाही नाटककाराचा अर्थ गमावलेला पोकळ प्रयोग सुलभा देशपांडे आणि अमरीश पुरी यांनी सादर करावा याचे आश्चर्य व विषाद दोन्हीही मनात होती.

या अनुभवानंतर इंग्रजी प्रयोगाला जाण्याचा फारसा उत्साह नव्हता. पण विचार पुरा करावा म्हणून सचदेवांनी दिग्दर्शित केलेला प्रयोग पाहायला गले. (इंग्रजी प्रयोगाची श्रेयनामावली समोर नसल्यामुळे कलावंतांच्या नावांचा उल्लेख करीत नाही.) इंग्रजी 'सखाराम बाइंडर'मधील कलावंत नवशिके होते आणि ते प्रयोगात स्पष्ट होत होते. विशेषत: त्यांनी निवडलेली लक्ष्मी एखाद्या शाळकरी मुलीने नऊवारी नेसावे तशी दिसत होती. तिचे तुरूतुरू चालणे, शब्दांचे वजन लक्षात न घेता उच्चार करणे, विचित्र हातवारे करणे, यामुळे लक्ष्मीची व्यक्तिरेखा विनोदी वाटत होती. चंपाची भूमिका करणाऱ्या गीताने खूप मेहनतीने अभिनय उभा केला होता. पण या इंग्रजी प्रयोगातही सखारामचे संकलन योग्य न झाल्यामुळे कंटाळवाणे नाटक पाहिल्याचा अनुभव आला.

मराठी 'सखाराम बाइंडर'च्या प्रयोगाचे बलस्थान सखारामच्या भूमिकेसाठी झालेली अचूक निवड हे आहे. निळू फुले neutral अभिनय करूनही लेखकाचा अर्थ प्रेक्षकापर्यंत पोचवू शक-

तात. यामुळे फुल्यांनी उभा केलेला सखाराम स्वतःच्या अनुभवापासून दूर होऊ शकतो; तेंडुलकरांना अभिप्रेत असलेला अलिप्ततेचा भाव व्यक्त करू शकतो. त्यामुळेच इतर प्रयोगात भडक वाटणाऱ्या जागा मराठी प्रयोगात तशा वाटत नाहीत. मराठी नाट्यप्रयोगातील स्त्री कलावंत नटीप्रतिमेपासून दूर असल्यामुळे, नागर संस्कारापासून अलग असणारी व्यक्तिमत्त्वे उभी करणे त्यांना सहज शक्य झाले आहे. कुसुम कुळकर्णी यांची लक्ष्मी पहिल्या अंकात गरीब दिसते, पण दीनवाणी दिसत नाही; तिला निश्चित व्यक्तिमत्व आहे. तिच्या हसण्याला, अनुनासिक स्वराला अर्थ प्राप्त होतो. लालन सारंग हिने निर्माण केलेली चंपा अनेकांना भडक वाटते. पण खरे पाहिले असता कोणताही प्रेक्षकसंवाद न साधता, शरीर लकबीतून, आवाजाच्या हेलकाव्यातून त्यांनी ती भूमिका सादर केली आहे. सखाराम भावे व नारायण पै या दोन नटांनीही नाटकाचे वजन ओळखून अभिनय साधल्यामुळे संपूर्ण कलाकृतीचा तोल साधला गेला.

नाटकातील अनुभवाच्या स्वरूपाला न दचकता कमलाकर सारंग यांनी ज्या समंजसपणे या नाटकाचे संकल्पन केले त्यामुळेच सत्यदेव दुबेही हे नाटक सादर करताना फार वेगळे काही करू शकले नाहीत. कमलाकर सारंग यांनी हे नाटक सनसनाटी पद्धतीने सादर केले आहे असे मानून ज्यांनी संयत प्रयोग सादर करण्याचा निर्णय जाहीर केला होता त्यांचेच प्रयोग अधिक भडक झाले. कारण विशिष्ट शब्द-वाक्य-दृश्य भडक वा अश्लील नसते; त्या विशिष्ट दृश्यांचा तोल कलाकृतीशी साधला गेला नाही की ते भडक होते. गुजराती, हिंदी प्रयोगात नेमके हेच झाले

आपल्या नाट्यकृतीचे भाषांतर विविध भाषांमधे झालेले वाचण्याचे वा विविध भाषिक रंगभूमीवरील त्याचे प्रयोग पाहण्याचे भाग्य फार थोड्या नाटककारांच्या भाग्यात असते. तेंडुलकरांना 'शांतता, कोर्ट चालू आहे' 'व सखाराम बाइंडर' या नाटकांच्या संदर्भात हे भाग्य लाभले. परंतु 'बाइंडर'ला नामवंत दिग्दर्शक लाभूनही वेगवेगळ्या प्रयोगातून काही वेगळे श्रेय लाभले नाही. एखाद्या कवितेचे भाषांतर करताना शब्द व शब्दक्रमाचे भान ठेवावे आणि रचनात्मक अन्वय आणि त्यापलीकडचे काव्यत्व विसरावे, तसे काहीसे बाइंडरच्या अमराठी प्रयोगांचे झाले आहे. निळू फुले – लालन सारंग–कुसुम कुळकर्णी आणि दिग्दर्शक कमलाकर सारंग हे इतर काही नामवंतांइतके प्रसिद्ध नाहीत म्हणून त्यांचे श्रेय नाकारण्याचा जो यत्न अलीकडे होत आहे तो इष्ट नाही. एका नाटककाराच्या अर्थाचे योग्य प्रक्षेपण करण्यापासून त्याच्या अविष्कार स्वातंत्र्यासाठी लढा देण्यापर्यंत जी अपार मेहनत मराठी प्रयोगाचा दिग्दर्शक, निर्माता व कलावंत यांनी घेतली ती अजोडच आहे : 'ओरिजनल' 'सखाराम बाइंडर' या जाहिरातीचे पूर्ण समर्थन करणारी आहे.


**–पुष्पा भावे**

# रस्टन ग्रीव्हज ऑफिसर्स क्लब । मंजू मंजू

नाट्यगृहावर गर्दी तुफानी उसळली होती. तथापी जमलेल्या प्रेक्षकांच्या तोंडावर नवीन नाटक पहावयास येणाऱ्या पुणेरी प्रेक्षकांच्या तोंडावर जो एक उत्तुकतापूर्ण, चिकित्सक भाव असतो, तसला प्रकार आजच्या प्रेक्षकांच्या बाबतीत आढळत नव्हता. 'आपुलकीचा' भाव चेहऱ्यावर ठेऊन आलेली ही मंडळी जे नाटक सादर होणार त्याचे स्वागतच करायला उत्सुक असल्याचे स्पष्ट दिसत होते.

बरोबर आहे मंडळी – तुम्ही समजून चुकला आहात, त्या प्रमाणे नाटक महोत्सवी स्वरुपाचे आहे. दाद देणारा असा प्रेक्षक वर्ग असला म्हणजे हौशी कलाकारही जीव ओतून काम करतात. आणि प्रयोग बहुतेकवेळा रंगतो. बालगंधर्वमध्ये रस्टन ग्रीव्हज ऑफिसर्स क्लबने २५ जुलैला सादर केलेला 'मंजू मंजू'चा प्रयोगही असाच छान रंगला, खुललेल्या प्रसंगांना प्रेक्षकांनी मनमुराद दाद दिली. बारीकसारीक दोषांकडे डोळेझाक केली.

मंजू–मंजू हे मूळ गुजराथी नाटक. शं. ना. नवरे यांनी त्याचे केलेले रुपांतर व्यवसायिक रंगभूमीवर येऊन गेले



मंजू (सौ. वागळे), प्रेमकुमार (रंगा मराठे), प्रकाश (श्याम पटवर्धन)

आहे. सतीष दुभाषी आणि गुजराथी रंगभूमीवरील सरिता नावाची स्त्री कलाकार यांच्या या नाटकामध्ये भूमिका होत्या. तथापी ते नाटक अल्पजिवी ठरले.

कलाकारांची मर्यादित संख्या, आणि कथेचे विनोदी स्वरुप पाहून बहुधा रस्टनच्या कलाकारांनी हे नाटक निवडले असावे. केवळ महिन्याभराच्या तालमी मिळूनही या कलाकारांनी ज्या सफाईने प्रयोग केला त्याचे कौतुक वाटले. तथापी नाटकाचा जीव लहान. प्रसंग खुरटे आणि व्यक्तिचित्रणही सदोष. अपवाद फक्त मंजू या मिस्किल व्यक्तिरेखेचा– लेखनाच्या बाजूने पडणाऱ्या या मर्यादांचे सावट प्रयोगावरही पडल्याचे जाणवले. सुदैवाने सर्व कलाकारांचे अभिनयसामर्थ्य जवळ जवळ सारख्या तोलामोलाचे असल्याने एक संघ म्हणून उभे राहण्यात या कलाकार मंडळींनी जे कौशल्य दाखवले त्यामुळे लेखन दोष पुष्कळसे झाकले गेले.

प्रयोगाचे दिग्दर्शन शाम पटवर्धन यांनी केले होते. बाकीच्या कलाकारांकडून त्यांनी चांगली कामे करून घेतली. तरी 'प्रकाश'ची मध्यवर्ती भूमिका ते चांगल्या प्रकारे खुलवू शकले नाहीत. एकमेकांवर जीव असलेले एक मध्यमवयीन जोडपे बारिकसारीक कटकटींना कंटाळून घटस्फोट घेण्यापर्यंत मजल मारते. त्यात घटस्फोटित नवऱ्याला एक प्रेयसी मिळते. नवीन प्रेयसीबरोबर सुत जमून, विवाह वेदीवर चढण्यापूर्वीच प्रकाशबाबू आणि मंजू यांना समजून चुकले, एकमेकांवाचून आपले जमू शकणार नाही. आणि प्रेयसी बाजूला जाऊन हे घटस्फोटित जोडपे पुन्हा एकत्र येते.

कथाविषय चोख परकीय. आपल्याकडे घटस्फोट हा प्रकार अत्यल्प. एखाद्या जोडप्याच्या बाबतीत उद्‌भवलाच तर त्याचे स्वरूप ॲटमबॉम्बच्या स्फोटासारखे. अशा देशी परिस्थितीमध्ये मंजू मंजू, एक परकीय विषय म्हणूनच पाहिले जाते. स्वाभाविकपणे प्रकाशचे वर्तन – या परकीय कल्पनेशी जवळीक करणारे असणे अत्यंत आवश्यक. शाम पटवर्धन यांचा प्रकाश – एखादा भरतीय नवरा घटस्फोट प्रकरणी जसा वागेल, तसा वाटला. आणि त्यामुळेच तो पटू शकला नाही.

विषयाला अनुरुप असा अभिनय आविष्कार प्रियंवदा (सौ. शैलजा गदगकर) आणि त्याही पेक्षा मंजू (सौ. पुष्पा वागळे) व प्रेमकुमार (रंगा मराठे) या कलाकारांकडून पहावयास मिळाला.

कुमार साठे शशीकांतच्या भूमिकेमध्ये गोंधळल्यासारखे दिसले, पण त्यांचा हा गोंधळच – त्यांची भूमिका सरस ठरण्यास कारणीभूत ठरला.

निर्मितीची बाजू व्यवस्थित संभाळण्यात आली होती.

परकीय कल्पनेवरील एका मिस्किल नाटकाचा रंजक प्रंजक प्रयोग सादर केल्याचे श्रेय रस्टनच्या कलाकारांना आवर्जून दिले पाहिजे.

**–शरद गोखले**

विदेशी चित्रपट

# इर्मा ला डुस

## एक गिर्रेबाज कॉमेडी

शर्ले मॅक्लेनसारखी बनेल पण लाजवाब वेश्या आणि जॅक लेमनसारखा भाबडा सखाराम. (बाईंडर नव्हे हवालदार सखाराम) त्यात गाव पडलं पॅरिस. म्हणजे बारा भानगडी. ह्या साऱ्यांच्या जोडीला दिग्दर्शक बिली वायल्डरच अफलातून डोकं. आयला! मग काय विचारता. नुसती धमालच धमाल. खोटं वाटत असेल तर इंग्रजी चित्रपट 'इर्मा ला डुस' हा बघाच. कारण 'इर्मा ला डुस' ही फार्सचा बाज असलेली एक मस्त गिर्रेबाज कॉमेडी आहे.

टायटल्स दाखविताना इर्मा नावाची वेश्या गिऱ्हाइकांना कसे बनविते हा मजेशीर भाग सोडला तर चित्राची सुरुवात 'धिस इज पॅरिस' अशा डाक्युमेंटरी पद्धतीनं अगदी कॉमेंटरीसहीत होतं. पॅरिसमधील गुलाबी पहाट. आर्च द ट्रायंफ दिसते. मग एफेल टॉवर दिसतो. पण भल्या पहाटे तुम्हाला त्याच्यावरून उडी टाकून आत्महत्या करता येणार नाही. कारण तोच अजून झोपेत आहे. तोच का, सारं पॅरिसच गुलाबी साखरझोपेत आहे. अपवाद फक्त पॅरिसचं 'पोट.' ते जागं आहे. पॅरिसचं पोट म्हणजे प्रचंड मार्केट. मटन, बीफ, पोर्क, फिश आणि नाना देशांतून आलेला नाना तऱ्हेचा खास भाजीपाला–फळफळावळ. अमक्या खास देशातून तमका खास माल. या चालीवरच एका देशातून आलेली खास कोबी. सुंदर मनोऱ्याची रचना असलेला खास कोब्यांचा भला मोठा ढीग. हो, पण नुसते कोबी खाऊन पोट भरत नाही महाराजा. माणसाला दुसरीही भूक आहे. मग त्यासाठी पॅरिसमधील एक रंगेल गल्ली आहेच. ह्या गल्लीत एका हॉटेलात बेकायदा वेश्याव्यवसाय चालतो. हॉटेलच्या समोर बार आहे. ह्या बारचा मालक, मुस्टाश त्याचं नाव. बडा अर्थशास्त्रज्ञ. आपण याला मानलं. ह्याच्या बारमध्ये वेश्या, वेश्यांचे दलाल, बॉयफ्रेंडस् तळ ठोकून असतात. ड्यूटीवरचा पोलीसही 'लिव्ह अँड लेट लिव्ह' करीत हप्ता खायला या बारमध्येच येत असतो. फुकटचा पेग मारताना पाठीमागे उघडी हॅट ठेवायची. वेश्यावाले सारे क्यू लावून त्यात हप्ता टाकतात. हॅट डोक्यात घालायची, चालू पडायचं. तेरी भी चूप मेरी भी चूप. पण एक दिवस ह्या लफडेबाज जगात एक भलताच हवालदार बदलून येतो. हो जॅक लेमन. नाव असतं नेस्टर. नेस्टर फाकडा भलताच भाबडा. नीतिबाज तितकाच आयडियाबाज. तो येतो आणि 'इर्मा ला डुस' नावाच्या खमंग

कॉमेडीला खरी सुरुवात होते.

नेस्टर हवालदार खरंच भाबडा आणि पापभिरू. फेरीवाल्याकडून खायला म्हणून एक सफरचंद घेतो आणि चक्क त्याला पैसे मोजतो. आयला! याला कोण हवालदार म्हणेल. अशा ह्या निष्पाप माणसाची इर्मा नावाच्या एका वनेल वेश्येशी गाठ पडते. रस्त्यावरल्या तसल्या बायका पाहून तो इर्माला विचारतो, त्या इथे का उभ्या आहेत. इर्माची मांडी उघडी दिसते म्हणून हळूच तिच्या कानात ती झाकायला सांगतो. इर्मा त्याला बनवून एका गिऱ्हाइका-बरोबर जाते. याला संशय येतो. समोरच्या बारमध्ये घुसतो. पेग घेतो, अर्थात पैसे देऊन. हॅट पाठीमागे उघडी ठेवतो. त्याला नकळत नित्याप्रमणे हॅट-मध्ये 'हप्ते' भरले जातात. मुस्टाश वेश्यांचा खरा प्रकार सांगतो. ड्यूटी म्हणजे ड्यूटी. सरळ फोन करून पोलीस-व्हॅन बोलावतो. हॉटेलमधील आग लागल्याची धोक्याची बेल वाजविण्याची आयडिया करतो. साऱ्या वेश्या गिऱ्हा-इकांसह उघड्यानागड्या घाबरून खाली येतात. 'यू आर अंडर अरेस्ट' म्हणून साऱ्या वेश्या व्हॅनमध्ये कोंबून पोलीस स्टेशनवर हजर करतो. गिऱ्हाइकांत त्याचा बॉस असतो. प्रमुख पोलीस इन्स्पेक्टर. पण ते ह्या वेड्याच्या गावीच नसते. पोलीस स्टेशनवर उलटाच प्रकार होतो. बॉसच्या समोर हॅट काढायला जातो तो तीमधून नोटांचा पाऊस पडतो. बापरे! म्हणजे लाच खाल्ली. डिसमिस्ड. वेश्या सुटतात. ह्याची नोकरी सुटते.

बेकार होऊन हॅट आणि डगल्यानिशी बिचारा बेकार होऊन जॉबच्या शोधात पुन्हा त्याच वेश्यांच्या गल्लीत येतो. बार मालक मुस्टाश त्याला धीर देतो आणि तसला धंदा करायला सांगतो. त्याला ते पसंत नसते. एवढ्यात इर्मा येते. तो तिला ड्रिंक्स देतो. हा व्यवसाय चांगला नाही असं तिला सांगतो. तेवढ्यात इर्माचा बॉयफ्रेंड येऊन तिला मारझोड करून धंद्याला जा म्हणतो. हे त्याला सहन होत नाही. दोघांची फाईट होते. फाईट म्हणजे गंमतच. कारण नेस्टर म्हणजे डॉन क्विक्झोट. दैवाची साथ म्हणून शत्रू खलास होतो — सगळे नेस्टरला मानतात. इर्मा तर एकदम खुश. त्याला आपल्या घरी आणते. दोघांचे एकमेकांवर प्रेम बसते. हा व्यवसाय सोड म्हणून नेस्टर तिला परोपरीनं सांगतो पण ती ऐकत नाही. एखादं मोठं गिऱ्हाईक मिळालं तर आपण सुखात राहू असं ती म्हणते. नेस्टर आयडियाबाज. तिला ह्यातून सोडविण्यासाठी मुस्टाशच्या सहाय्याने एक आयडिया लढवितो. आपणच लंडनचा मोठा श्रीमंत रईस बनून तिच्या कडे जातो. आणि केवळ कंपनीसाठी एका वेळेस पाचशे डॉलर्स देतो. (अर्थात मुस्टाशकडून उसने घेतलेले.) इर्माचा आनंद गगनात मावत नाही. बस हे एकच गिऱ्हाईक ठेवायचे असे ती ठरविते. आनंदाच्या भरात पैसे खर्च होतात. मुस्टाश उसने पैसे देत नाही. दरखेपेस पाचशे डॉलर्स कुठून आणणार. पण

तिच्या प्रेमापायी तो तिच्या नकळत पहाटेचा त्या प्रचंड मार्केटमध्ये हमाली करतो. झाडूदेखील मारतो. (म्हणजे सुरुवातीची ती मार्केटची डाक्युमेंटरी नव्हती तर मार्केटचा ह्या कथेशी संबंध आहे तर हे पाश्चात्य सिनेमावाले फिल्मचा थोडासुद्धा भाग फुकट घालवीत नाहीत) आणि पैसा जमा करतो. अक्षरशः घाम गाळून. पण एक दिवस मध्येच इर्मा जागी होते. बघते तर नेस्टर नाही. तिला संशय येतो. दुसऱ्या बाई-कडे जातो म्हणून. ती त्याची निर्भत्सना करते. तरीही तो खरे कारण सांगत नाही. बरोबर आणलेली हॅट आणि डगला घेऊन चालता हो म्हणून ती सांगते. तिच्या मनातून तो उतरतो. इंग्रजी रईसाने लंडन घेऊन जाईन असं सांगितलेले असते. ती त्याच्याबरोबर जाण्याचे ठरविते. नेस्टर आपल्याऐवजी ती त्या इंग्रजी गिऱ्हाईकावर लुब्ध झाली म्हणून चिडतो आणि मुस्टाशला सारा प्रकार सांगून इंग्रजी गिऱ्हाईकाचे सारे सोंग नदीत फेकून देतो. पण उलट त्या इंग्रजी माणसाचा खून केल्याचा आळ त्याच्यावर येतो. त्याला अटक होते. मुस्टाश त्याची वकिली करतो. केवळ इर्माच्या प्रेमासाठीच माझ्या अशीलाने खून केला म्हणून तो सांगतो. हे कळल्या-वर इर्माचे मन पालटते. तिला त्याच्या प्रेमाची खात्री पटते. मुस्टाश आयडिया करून त्याला तुरुंगातून पळून जायला मदत करतो. त्याआधी इर्मा गरोदर आहे हे त्याला सांगतो. तो त्या आनं-दाच्या भरात तिच्याशी लग्न करायला तयार होतो. इर्मा म्हणते पण मूल त्या इंग्रज गिऱ्हाईकाचे आहे, तो आनंदून म्हणतो चालेल. मी ती सारी जबाब-दारी घेतो. तेवढयात पोलिस येतात. तेथेही तो पोलिसाचा डगला नि हॅट घालून त्यांना बनवितो. (म्हणजे येथेही ती हॅट व डगला कामाला येतो तर) तिथून सटकल्यावर पुन्हा त्या इंग्रज रईसाचं सोंग घेऊन पोलिसांच्यादेखत नदीतून वर येतो. पोलिस चक्रावतात. म्हणजे गेले नऊ महिने ज्याच्या खुना-बद्दल एवढी भागंभाग तोच जिवंत. इकडे नऊ महिन्याच्या गरोदर इर्माचं आणि नेस्टरचं चर्चमध्ये लग्न. नववधू प्रसूती वेदनांनी व्याकूळ. ऐनवेळी नेस्टर येतो. नववधूची अवस्था बघून विवाह घाईघाईत उरकला जातो. पण तरी चर्चमध्येच वधू बाळंत होते. बाजूच्या खोलीत आपले बाळ बघायला नेस्टर आत जातो. चर्च रिकामं होतं. उरलेली एक व्यक्ती मुस्टाशकडे येते. बापरे! हा तर तो इंग्रज रईस. तो इंग्रज मुस्टाशला म्हणतो, 'ही लाईड' म्हणजे नेस्टर खोटं बोलला! छे! आता ही गोष्ट वाढवायची तरी किती. 'इनफ ऑफ स्टोरी' असं मुस्टाश म्हणतो आणि चित्रपट संपतो.

ह्या चित्रपटातील एकेक प्रसंग दिग्द-र्शक बिली वायल्डर याने असे काही घेतले की चित्रपटाबरोबर आपणही पुरात वाहून जातो. वेश्या पकडण्याचा प्रसंग, नेस्टरचा मारामारीचा प्रसंग, नेस्टरचे इंग्रज गिऱ्हाईकाचे सोंग, तुरुं-गातून पळून जाण्याचा प्रसंग, मार्केटमधे

मरमर राबण्याचा प्रसंग, तसेच इर्माच्या खोलीत पोलिस नेस्टरला शोधतात तो प्रसंग. सारेच प्रसंग अप्रतिम फार्सचा बाज असलेले. येथे आपल्याला बिली वायल्डरचे आयडियाबाज डोके दिसते. तुरुंगातून पळून जाण्याचा प्रसंग आणि नेस्टरला पोलीस शोधतात हा प्रसंग म्हणजे ह्या कॉमेडीचा कळस होय.

या चित्रातील प्रमुख पात्रे तीन. इर्माला डुस, नेस्टर आणि मुस्टाश. शर्लेप्रक्लेनने इर्मा अशी काही बनेलपणे सादर केलीय की जवाब नाही. वेश्या जीवनाची सारी बेछूट बेदरकारी तिनें साकार केलीय. शँपेनच्या पार्टीत तिने केलेले वेफाट ईस्टनृत्य पाहून डोळ्याचे पारणे फिटते. शर्ले येथे जणू काय रबराची होते. शर्ले अजूनही फॉर्मात आहे. म्हणून तर तिला नेल्टर म्हणतो, 'मेक-अप' विना तू १४ वर्षाची दिसतेस. आणि ते खरं आहे. तिला सारेच इर्मालाडुस म्हणतात. इर्मालाडुस म्हणजे इर्मा दी ब्यूटीफूल.

जॅक लेमनचा नेस्टर भलताच अफलातून झालाय. स्त्री समोर लाजणारा, विशेषत: स्वत:चे स्टॉकींग काढताना इर्माला डोळे झाकायला लावणारा, इर्माचे कुत्रे बघतेय म्हणून त्याला खोलीबाहेर पिटाळणारा नेस्टर, तसेच पोलिसाचा डगला चढवून पोलिसांना बनविणारा नेस्टर व इंग्रज श्रीमंत रईसचे आणलेले सोंग म्हणजे त्यांच्या अभिनयाची जुगलबंदी.

पण साऱ्यात लक्षात राहतो तो बार मालक मुस्टाश. बडा अर्थशास्त्रज्ञ. साऱ्या जगाचं शहाणपण कोळून प्यालेला. त्याच्या प्रत्येक वाक्याला दाद मिळते. मुस्टाशचे स्थितप्रज्ञासारखं वागणं पाहून वाटतं 'जीवन ह्याला कळले हो' वेश्याचं समर्थन करताना तो नेस्टरला सांगतो. श्रीमंत वेश्यांना पैसे देतात, वेश्या आपल्या दलालांना देतात, दलाल पोलिसांना देतात, पोलीस आपल्या पोराबाळांना, म्हणजे पैसा खेळता राहतो. त्याच्या खुसखुशीत संवादातून ढोंगी समाजाला चांगल्याच कोपरखळ्या मारल्यायेत. त्याचे म्हणणे ज्याला मान्य नाही ते सारे बूर्ज्वा लेकाचे. आपण त्याला मानतो. नेस्टरला पकडताच तो त्याची वकिली करतो. म्हणजे आहे की नाही महाबिलंदर. इर्माच्या लग्नाच्या वेळी तो तिचा वधूपिता होतो. पण नेस्टरला यायला उशीर होतो तेव्हा इर्माला तो चक्क सांगतो 'घाबरू नकोस, नेस्टर नाही आला तर मी तुझ्याशी लग्न करीन.' असा मुस्टाश, शेवटी इंग्रज श्रीमंत रईसला त्याच्यापुढे आणून दिग्दर्शकानेही मुस्टाशची फिरकी घेतलीय.

इर्माला डुसच्या अनेक गंमतीजमती सांगितल्या तर आणखी चार पाने लागतील. पण एक गोष्ट खरी 'इर्माला डुस' हा चित्रपट खरोखरच 'ला डुस' म्हणजे 'द ब्युटीफुल' आहे.

**–ह. शि. खरात**

# नव्या अभ्यासक्रमाबाबत कंधारचा परिसंवाद

महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन एक तप उलटले तरी विदर्भ-मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र या निरनिराळ्या विभागात माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीतही एकरूपता अजूनपर्यंत आली नव्हती. १९७५ सालच्या मॅट्रिक परीक्षेपासून ही एकरूपता साध्य होणार आहे. पदवीपरीक्षेपर्यंत १०+२+३ असा १५ वर्षांचा शिक्षणविषयक आकृतीबंध अस्तित्वात येत आहे. आमदार प्रा. ग. प्र. प्रधान व इतर काही तज्ज्ञांनी नियोजित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी काही काळ तरी स्थगित करावी अशी वक्तव्ये दिली. इतरांनी नवा अभ्यासक्रम ठरल्याप्रमाणेच अंमलात आणावा असे सुचविले आहे. या बाबत सर्वांगीण स्वरूपाची चर्चा करणारे परिसंवाद फारसे झाले नाहीत.

नांदेड जिल्ह्यातील कंधारच्या श्री. शिवाजी कॉलेजने 'तरुणांची दुष्काळाशी झुंज' शिबिर आयोजित केले होते. त्यांच्यातर्फे उद्याचा नवा अभ्यासक्रम या विषयावर नुकताच एक परिसंवाद आयोजित केला. अध्यक्ष प्राचार्य सहस्रबुद्धे व उद्घाटक गोदातीर दैनिकाचे संपादक श्री. दे. गं. रसाळ यांच्याखेरीज इतर अनेकांनी आपआपले विचार व्यक्त केले.

**नववीचे मराठी :** नववीच्या मराठी पुस्तकाबाबत श्री. तुकाराम रणभीडकर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की या पुस्तकात पश्चिम महाराष्ट्र विदर्भ आणि मराठवाडा या विभागातील सर्व लेखकांना योग्य प्रतिनिधित्व दिलेले नाही. मराठवाड्यातील लेखकांचे अधिक साहित्य देणे तसेच संत तुकारामाच्या वाङ्मयाला प्राधान्य देणे आवश्यक होते. ते देण्यात न आल्याने उणीव राहून गेली आहे.

श्री. देशमुख एस जी. यांनी इंग्रजी विषयाच्या अध्यापनाबद्दल बोलताना सांगितले की Structural method अवलंबून मातृभाषेच्या अध्यापनाप्रमाणेच इंग्रजी पूर्णतः इंग्रजीतूनच शिकविणे व सतत त्यावेळी इंग्रजी शब्दच ऐकविणे श्रेयस्कर आहे असे अनेकांचे मत आहे. परंतु पूर्वीची Grammar and Translation Method अंशतः उपयोगी ठरू शकेल. एका परीक्षेतील काही उत्तर पत्रिका तपासल्यानंतर त्यात ४५ हजार चुका आढळल्या. म्हणजे जवळ जवळ प्रत्येक शब्दात इंग्रजीच्या चुका झाल्या होत्या. इंग्रजीचा निकाल

नेहमीच असमाधानकारक का लागतो याचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे.

**नवे गणित :** नव्या गणितासंबंधी य. जी देशमुखांनी सांगितले की पूर्वी पाढे पाठ करवून घेण्यात येत असत. उदाहरण 'कसे' सोडवायचे याची पद्धत शिकवण्यात येई. आता उदाहरण 'असे' 'का' सोडवावे याच्यामागील तर्कपद्धती समजावून देण्यावर भर दिला जातो. यूक्लीडने काही गृहिते गृहितच धरली होती. कॅलक्युलस, डिजिट सिस्टीम यासंबंधीही देशमुखांनी माहिती देवून नव्या गणितामागील तात्त्विक अधिष्ठान पटवून दिले.

**कार्यानुभव :** शाळेतून कार्यानुभव का अयशस्वी होतो याची कारणमीमासा करून श्री. पाटील एम. एल. यांनी कंधारच्या त्यांच्या शाळेत कार्यानुभव यशस्वी झाला व मराठवाडचाचे उपशिक्षण संचालक श्री. पी. टी. महाजन यांनीही त्याबाबतीत प्रशंसोद्‌गार काढले असे सांगितले. बुद्धी आणि हात या दोघांनाही चालना देणारा कार्यानुभव विद्यार्थ्यांना आवडतो पण अनेकदा कार्यानुभावाची 'थिअरी' शिकविण्यात येते पण त्याचे प्रॅक्टिकल होत नाही म्हणून मूळ उद्दिष्टच विफल होते. उद्योग धंदे उत्पादन दळणवळण वहातूक इत्यादीमध्ये जी आधुनिकीकरणाची प्रक्रिया घडत आहे त्याच्यासाठी 'कार्यानुभव' विषय महत्त्वाचा आहे.

**प्राध्यापकांचे भवितव्य** १०+२+३ हा आकृतीबंध अंमलात आला की महाविद्यालयातील पी. यू. सी. (म्हणजे प्रिडीग्री) चे वर्ग कॉलेजमधून बंद होतील व कॉलेजातील सुमारे अर्धे विद्यार्थी याच वर्गात असतात. त्यामुळे कॉलेजापुढे आर्थिक समस्या निर्माण होतील व काही प्राध्यापकांना कमी करावे लागेल. ह्या प्राध्यापकांना ज्युनिअर कॉलेजमध्ये नोकरी मिळाली तरी १५ ऐवजी ३० पिरियडस् घ्यावे लागतील. प्रिडिग्री ऐवजी ११ व १२ च्या वर्गांना ३० पिरियडस घ्यावे लागल्याने गुणवत्ता ढासळण्याची भीती आहे असे सांगून शाळेच्या अपुऱ्या इमारती, तुटपुंजी साधनसामुग्री यामुळेही गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होईलच असे प्रा. ढोके यांनी प्रतिपादन केले.

इंग्रजीचे प्राध्यापक शाज अलि यांनी शिक्षणक्षेत्रात नवे प्रयोग होतच असतात, नव्या अभ्यासक्रमाचा प्रयोग होत आहे, काही काळानंतरच त्याचे इष्टानिष्ट परिणाम दिसतील असे सांगितले. आगलावे, खरात यांनीही इतिहास व गणित या विषयांसंबंधी विचार व्यक्त केले.

प्राचार्य सहस्रबुद्धे यांनी नव्या अभ्यासक्रमातील मराठी, हिंदी इतिहास या विषयावरील पाठ्यपुस्तके कशी सदोष आहेत हे उदाहरणासहित समजावून दिले. मराठी पुस्तकात गद्याचा कालानुक्रमे विकास दाखविणारे धडे नाहीत, खाडीलकर, परांजपे, केळकर यांचे साहित्य देण्यात आलेले नाही, गोविंदाग्रजांची साहित्यगुण असलेल्या कवितेऐवजी अप्रसिद्ध कविता देण्यात

आली आहे अशी टीका केली. हिंदी पुस्तकांत प्रेमचंदाच्या श्रेष्ठ कथांपैकी एखादी निवडायला हवी होती, जयशंकर प्रसादसारख्या महाकवीचे साहित्य देण्यात आलेले नाही, इतिहासाचा अभ्यासक्रम अत्यंत बोजड, विद्यार्थ्यांवर अधिक बोजा टाकणारा आहे अशी टीका केली. मराठवाड्यात H. S. M. P. चा कोर्स होता. त्यात १०० विद्यार्थीसुद्धा बसत नव्हते पण आता नव्या स्वरूपात थोडा फेरबदल करून तोच कोर्स विद्यार्थ्यांवर लादला जात आहे असे सांगून १० + २ + ३ हा आकृतीबंध सध्याच्या परिस्थितीत सोयीस्कर होणार नाही असे सांगितले.

दैनिक गोदातीरचे संपादक श्री. दे. गं. रसाळ यांनी उद्घाटनपर भाषणात जीवनाभिमुख तांत्रिक शिक्षण अधिक महत्त्वाचे आहे व सुशिक्षित बेकारांची समस्या अंशतः सोडविण्यासाठी पदवी (डिग्री)चे आकर्षण कमी केले पाहिजे व त्या दृष्टीने मॅट्रीकनंतर व्यावसायिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांना वळविले पाहिजे असे प्रतिपादन केले.

शिबिर संयोजक प्रा. मा. वि. शेंडगे यांनी आभारप्रदर्शन केल्यावर 'वंदेमातरम्' राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपला.

परिसंवादास उपस्थित असलेले कॉलेजचे संस्थापक आमदार केशवराव धोंडगे यांनी या दृष्टीने विधानसभेत आवाज उठवावा अशी त्यांना विनंती करण्यात आली,

—देवदत्त तुंगार

## श्री. नखाते यांचा खुलासा

पृष्ठ २ वरून

करण्यात आला होता व गहू फक्त एक-दीड क्विंटल लागला तो घरचाच होता. लग्नानिमित्त निमंत्रण पत्रिका ज्या छापण्यात आल्या त्या अवघ्या ७०० होत्या. व त्यास फक्त १५० रुपये छपाई खर्च आला.

लग्नाला परभणीतील अनेक छोटे मोठे अधिकारी आले होते कारण त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. कोणत्याही अधिकाऱ्यांना कोणत्याही लग्नसमारंभात इतर कोणी निमंत्रित केल्यास ते त्या कार्यास व्यवहार व शिष्टाचार म्हणून उपस्थित राहतात. तदवत माझेही मुलीचे लग्नात ते उपस्थित राहिले. त्यात विपरित असे काय घडले ? नांदेडचे शामराव कदम आणि माजी उपमंत्री वामनराव नायक हे माझे मुलीचे लग्नास उपस्थित होते. कारण यापूर्वीच त्यांच्या इथेही झालेल्या लग्नकार्यात मी उपस्थित राहिलो होतो. एकमेकांनी एकमेकांच्या लग्नकार्यात उपस्थित राहणे हा व्यवहार आहे. त्यात वावगे असे काय आहे ?

लग्नपत्रिकेवर आहेर आणू नये अशी सूचना होती त्यानुसार मी कोणाकडूनही एका कर्दपिकेचाही वा अन्य वस्तुरूपाने असा आहेर मुळीच स्वीकारला नाही. मला जर खरोखरच आहेर स्वीकारावयाचा असता तर त्यात

कोणाची अडकाठी होती ? पत्रिकेवर आहेर आणू नये असे जेव्हा मी लिहिले होते व या उपरही मला कोणी आहेर करण्याची इच्छा प्रदर्शित केली असती तर तो मी भर मंडपात सर्वांदेखत उघडपणे न स्वीकारता तो अंधारात गुपचुपपणे स्वीकारण्याची व्यवस्था केली असती. नवरदेव आणि नवरी मुलगी यांना मात्र त्यांचे निरनिराळे आप्तेष्ट व मित्र मैत्रिणींकडून भेट म्हणून स्टीलच्या वस्तूंचा आहेर सर्व सामान्य प्रथेस अनुसरून करण्यात आला. तसा आहेर कोण्याही लग्नात केला जातो.

लग्नात माझे मुलीचे अंगावर वर पक्षाकडून फक्त १६–१७ तोळयाचे सोन्याचे दागिने घालण्यात आले. हिरे आणि मोत्याचे दागदागिने मुळीच नव्हते.

तसेच या लग्नात वरास तीस हजार रुपये हुंडा व एक ॲम्बॅसेडर कार दिली हे ही वृत्तपत्र प्रतिनिधीचे विधान निखालस असत्य आहे.

मुक्ताजिनिंगमध्ये वरपक्षाकडून फक्त त्यांचेच १२० माणसांचे जेवण्याची व्यवस्था करण्यात आली व माझेकडे जी पाहुणे मंडळी आली होती त्या पंचाहत्तर पाहुण्यांचे जेवण्याची सोय मी स्वतःचे बंगल्यातच केली होती. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या बंगल्यात मुळीच करण्यात आली नाही. तसेच ४००–५०० माणसांचे जेवणाची मी व्यवस्था केली होती हे विधानही असत्य आहे.

लग्न सोहळयाचे वर्णनानंतर माणूसच्या प्रतिनिधीने माझ्या एकंदर जायदादीचे जे वर्णन केले आहे तेही असेच वस्तुस्थितीला सर्वस्वी सोडून आहे. माझे एकंदर स्थावर मालमत्तेचा तपशील येणेप्रमाणे :

आम्ही एकूण तीन बंधूंपैकी दोन हयात आहेत. सन १९५५ सालात आम्ही सर्व बंधू एकत्र कुटुंब पद्धतीने राहत होतो. त्यावेळी आमचे कुटुंबियांचे नावावर एकूण दोनशे पन्नास एकर जमीन होती. पुढे १९५५ सालात त्याची वाटणी झाली व पुढीलप्रमाणे जमीन प्रत्येक बंधूचे वाट्यास आली. स. ग. नखाते यांचे नावे ९० एकर. तुकाराम गोपाळराव नखाते यांचे नावे ९० एकर व विठ्ठल सुभाष नखाते यांचे नावे ७० एकर. १९५७ सालानंतर मी आपले मुलाचे नावाने सन १९५८–५९ साली फक्त १८ एकर कोरडवाहू जमीन विकत घेतली. वरील जमिनीत पुरातन अशा तीन विहिरी आहेत. त्यापैकी स. ग. नखाते यांचे वाट्यास एक आली व दोन विहिरी वरील दोन बंधूंच्या वाटणीस गेल्या. मी एक नवीन विहिर बांधावयास काढली आहे. अद्यापही तिचे काम पूर्ण झाले नाही. सन १९६६–६७ सालापासून आज मितीपर्यंत मी माझे वरील जमिनीत ज्वारी, बाजरी व एच –४ हे सीड प्लॉटस घेत आलो आहे व त्यातून मला दरसाल खर्च वजा जाता २५ हजार रुपयाचे निव्वळ उत्पन्न होते. मौजे हदगावला मला किंवा कोणाही बंधूस बंगलाच नाही तर आमची वंशपरंपरागत जुनी घरे आहेत व त्यापैकी

माझे बंधू तुकाराम यांचे वाटणीस एक घर गेले आहे व मी व माझा पुतण्या पंजाबराव यांचे वाटणीस फक्त बैलाचे वाडे आले आहेत. हदगावला मी ३५ हजार रुपये खर्चून बंगला बांधला असल्याबद्दलचे वृत निराधार आहे. परभणीला माझा जो दुमजली बंगला आहे त्याचे बांधणीसाठी एकूण मला ६३ हजार रुपये खर्च आला. हा सर्व खर्च मी माझे शेतीचे उत्पन्नातून केला आहे व त्याबद्दलचे इन्कमटॅक्स खात्याचे बाजाप्ता प्रशस्तीपत्रक मजपाशी उपलब्ध आहे.

एकूण वस्तुस्थिती वरप्रमाणे असता माणूसच्या प्रतिनिधीने मुद्दाम त्याकडे दुर्लक्ष करून परभणी येथील माझे राजकीय विरोधक व विरोधी पक्षाचे एक पुढारी, जे स्वतःस महान् मार्क्सवादी म्हणवितात, त्यांच्याशी संगनमत करून, केवळ आकसाने व सूडबुद्धीने मला बदनाम करण्यासाठी वरील असत्य वृत्तांत प्रसिद्ध केला आहे. कारण माझे मुलीचे लग्नसमारंभाचे काळात माणूसच्या प्रतिनिधीचे वास्तव्य वरील महान मार्क्सवादी गरीब पुढाऱ्याच्या, स्वतः त्यांनी अवघे ७५ हजार रुपये खर्च करून बांधलेल्या दुमजली झोपडीत अहर्निश त्यांचे सानिध्यात होते. वस्तुतः जर सत्य माहिती प्रकाशित करण्याचा माणूसच्या प्रतिनिधीचा सद्हेतू असता तर इतर कोणत्याही ऐकीव माहितीवर वा चियावणीस बळी पडून तो प्रकाशित न करता प्रत्यक्ष त्यांनी मला भेटून खरा वृत्तांत मिळविण्याचा प्रयत्न केला असता पण त्यांनी तशी तसदी हेतुपुरःसर घेतली नाही कारण तसा प्रयत्न त्यांनी केला असता तर मला येन्केन् प्रकारेण बदनाम करण्याचा त्यांचा व त्यांचे कंपूचा कुटील हेतू साध्य झाला नसता. सत्य व निर्भेळ सत्य याचा प्रामाणिक शोध घेऊन मगच कोणताही वृतांत प्रकाशित करणे व असत्याला थारा न देणे ही सर्वमान्य वृत्तपत्रीय नीती असताना माणूसच्या वृत्तपत्र प्रतिनिधीने त्यास तिलांजली देऊन साफ काळिमा फासला असल्याबद्दलचे माझे स्पष्ट मत आहे.

आपला विश्वासू
**स. गो. नखाते, आमदार**
तालुका पाथ्री, जिल्हा परभणी.

[ नखात्यांचा खुलासा कळला. अनेक मुद्दे वादग्रस्त आहेत, लिहिण्यासारखे आहेत. माझा नखात्यांचा व्यक्तिगत संबंध नाही. तेथे जाण्यापूर्वी मला त्यांची काही माहिती नव्हती. एका लोकनिर्वाचित प्रतिनिधीने, सार्वजनिक कार्यकर्त्याने कसे वागावे ह्या बाबत समाजात काही कसोट्या ठराव्यात म्हणून सतत धडपड मी करत असतो. शंकरराव मोहिते पाटील, भाऊसाहेब झाडबुके किंवा वसंतराव नाईक (शिकारवाले) स्वतः चुकलो असे कधीच कबूल करत नाहीत आणि त्यांच्याजवळ त्यांचेच म्हणणे बरोबर असल्याचे सिद्ध करण्याची साधने असतात. हा अनुभव माझ्या व प्रत्येक सामान्य माणसाच्या गाठी आहे ह्याची नोंद राहावी एवढीच इच्छा.

**निळू दामले ]**

# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे
पृष्ठे सुमारे ३५० । किमत सुमारे वीस रुपये
'माणूस' मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये
पुस्तक रुपाने प्रसिद्ध होत आहे.

---

* १०० रुपयाची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

* सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळींच दिले जाईल. या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने ठराविक नोंदणी होताच ही ठेवयोजना स्थगित होईल.
* ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणूस'ची वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.
* पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.
* पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.
* ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.
* रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ पुणे ३०**


---


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

# माझ्या घरी माझी पुस्तके

# वि ना मू ल्य



- **बॉम्बे बुक क्लबची** पहिल्या महिन्याची वर्गणी पाठविताच **काव्यदर्शन** किंवा **स्मृतिचित्रे** यापैकी आपल्या आवडीचे एक भेटपुस्तक पोस्टाने घरपोच.

- सोबत बॉम्बे बुक क्लब मधून सध्या उपलब्ध असलेल्या २५० निवडक पारितोषिक विजेत्या पुस्तकांची यादी–पुढील निवड करण्यासाठी–व प्लॅस्टिक वेष्टनातील सभासद प्रमाणपत्र.

- दरमहा रु. १० प्रमाणे वर्षाकाठी रु. १२० भरून वर्षभरात रु. १३० ची तुमच्या पसंतीची पुस्तके, दोन भेट पुस्तके विनामूल्य शिवाय '**पुस्तक पंढरी**' मासिकाचे १२ अंक दरमहा आपल्या दारी–म्हणजेच **एकूण रु. १६० चा लाभ.**

- अधिक तपशिलासाठी '**माणूस**' साप्ताहिकाचा ता. १६ जून चा अंक पहा. अगर सविस्तर माहिती पत्रक मागवा.

बॉम्बे बुक डेपो संचालित

# बॉम्बे बुक क्लब

**२१७, राजा राममोहन रॉय मार्ग, मुंबई-४०० ००४**